१९५८
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. नं. ७७०८




REFBK-0009482

— के. रा. जोशी

केदार प्रकाशन–दुसरें पुष्प

# सम्राट् श्रीहर्ष

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें
२१२८७
अनुक्रम ................ दि: ................
क्रमांक ....७७७८..... नों दि ५४
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९४८२
ग्रं. क्र.

लेखक

के. रा. जोशी, बी. ए. (ऑ.) एस्. टी. सी.

शिक्षक

भारत हायस्कूल, पुणें २

REFBK-0009482

केदार प्रकाशन, पुणें २.

# प्रवेशापूर्वी

प्राचीन भारतीय सम्राटांची एक चरित्र माला लिहावी अशी कल्पना आहे. त्याप्रमाणें केलेली ही सुरवांत आहे. त्यांतील पहिलें चरित्र आपण वाचणार आहांत ! भारत देशाची संस्कृति श्रेष्ठ, परंपरा उत्तुंग आणि इतिहास पुरातन आहे. त्या इतिहासाची कांहीं पानें वाचकांच्या दृष्टिसमोर उभी करण्याचा हा प्रयत्न आहे.

यांत शुष्क सनावळ्या आणि निरस तहनामे नाहींत. तर इतिहासाची शुद्धता व सत्यता कायम राखून गोष्टीरूपानें सांगितलेला हा इतिहास आहे.

श्रीहर्षाबद्दल आपण ऐकतो पण प्रत्यक्षांत त्याच्याबद्दल माहिती मात्र थोडी असते. ती जास्त प्रमाणांत व्हावी ही एक इच्छा आहे.

आतां आभार मानतो ! हें पुस्तक मी लिहिलें एवढेंच ! बाकीचें सर्व श्रेय माझे परम स्नेही श्री. अरविंद दुबळे व त्यांच्या पत्नी सौ. सुनीति दुबळे यांचे आहे. अधिक शब्दांत विवेचन करीत नाहीं कारण त्यामुळें त्या श्रेयाला बांध पडण्याचा संभव अधिक !

त्याचप्रमाणें माझे दुसरे परमस्नेही चित्रकार श्री. गंगाधर ताटके यांनीं आपल्या कलेनें हें पुस्तक सजविलें आहे. त्यांनीं अतिशय थोड्या वेळांत हें काम केलें एवढें सांगितलें म्हणजे पुरे आहे.

या पुस्तकांतील ब्लाक्सहि श्री. आगाशे यांनीं त्यांचे कामगार मोहिते व गोरिवले यांच्या साहाय्यानें अतिशय लवकर दिलें त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

शेवटी आम्हांला योग्य मार्गदर्शन करणारे व वेळोवेळीं अमोल सहाय्य देणारे श्री. राजगुरु यांचे आभार मानावेत तितके थोडेच आहेत. त्यांनीं आमचें काम अतिशय लवकर व त्वरेनें करून दिलें त्याबद्दल त्यांचे व त्यांच्या कामगारांचें आम्हीं ऋणी आहोंत.

पुस्तक प्रवेशापूर्वी थोडावेळ घेतल्याबद्दल क्षमस्व ! आम्ही तुमचेच ही जाणीव असों द्यावी.

**केशव रामचंद्र जोशी**

तीर्थरूप

सौ. लक्ष्मीबाई जोशी

व

श्री. रामचंद्र शंकर जोशी

या मातापित्यांच्या चरणी ही कलाकृति सादर समर्पण.

# अनुक्रमणिका

काळाच्या ओघांत

शंभु महादेवाच्या देवळांत

महाराजाधिराज प्रभाकरवर्धन

भारतीय गौरवाचा किरण

राज्यश्री

महासती यशोमती

खून–खून

दिग्विजय

शिलादित्य

दक्षिणेकडे झेप

गुणी गुणं वेत्ति

उदार दाता

हर्षो हर्षः

काळाचा ओघ

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २१६०१ दि. ९।६।२२
क्रमांक ९०८१

# १. काळाच्या ओघांत

पांचव्या शतकाचा पूर्वार्ध शांततेनें मार्गक्रमण करीत होता. गुप्तांचें साम्राज्य त्या वेळीं वैभवाच्या शिखरावर विराजमान झालेलें होतें. भारताची भाग्यश्री म्हणजे सोन्याचा धूर होता ! सुवर्णाच्या युगाची ललकारी सर्वत्र निनादत होती ! सम्राट् समुद्रगुप्ताच्या दिग्विजयाच्या दुंदुभि अद्याप सर्वत्र घुमत होत्या. विक्रमादित्याच्या—त्या पराक्रमाच्या सूर्याच्या—विजयाच्या आणि संवत रूपानें चालू झालेल्या कालगणनेच्या विजयपताका पूर्वीच्या डौलानें फडकत होत्या आणि भारतांतील या नरश्रेष्ठांच्या कहाण्या पुढील पिढीला ऐकविण्याकरितां, त्यांच्यांत उत्साह उत्पन्न करण्याकरितां, मान उंच करून भविष्यकाळांतील सुखाच्या स्वप्नरूपी उदराचा ठाव घेण्याचा त्या प्रयत्न करीत होत्या !

व्यापार भरभराटीस आला होता ! वैदिक संस्कृतीचे प्रचारक आपलें कार्य अविरतपणें करीत होते. कलांची वाढ पूर्वीप्रमाणेंच होत होती ! परंतु अव्याहत चालू असणाऱ्या काळाला ह्या गोष्टी नवीन नव्हत्या ! राजे, राज्य, वैभव, पतन, उत्थान ह्या साऱ्या गोष्टी त्याच्या बाबतींत अत्यंत क्षुल्लक होत्या. अनंत राजे, अनेक राज्यें हीं त्यांच्या वैभवासह त्याच्या उदरांत गडप झालीं होतीं ! या अप्रतिहत संचार करणाऱ्या व अतिक्रमण करण्यास कठिण अशा त्या कालास गुप्तांचें साम्राज्य अपवाद ठरलें नाहीं. विक्रमादित्यानंतर त्याचा मुलगा कुमारगुप्त आला आणि त्यानंतर स्कंदगुप्त ( इ. स. ४५५–४६७ ) आला. हाच वास्तविक शेवटचा पराक्रमी असा गुप्त सम्राट् होय !

आणि यापुढील सम्राटांचें काय ? त्यांचें कांहीं सांगण्यासारखें नाहींच मुळीं ! कुमारगुप्ताच्या कारकीर्दीतील शेवटच्या वर्षी आलेल्या हूणांच्या प्रचंड स्वाऱ्यांखालीं आणि त्यांच्या क्रूर, दुष्ट व कृतघ्न कृत्यांनीं पुरगुप्त, नारसिंहगुप्त दुसरा कुमारगुप्त, विष्णुगुप्त, बुधगुप्त, भानुगुप्त, कृष्णगुप्त इ. साऱ्यांना पार चिरडून टाकलें, त्यांना खिळखिळें केलें ! त्यांची राजकीय घडण बदलवून टाकली आणि सामाजिक घडी पूर्णपणें विस्कटली !

हूण ! हूण ! या एकाच शब्दानें गुप्तांच्या राज्यावर भयानक धडक घेतली ! इतर जमातींहून निराळ्या असलेल्या या तथाकथित मानव प्राण्याचे खांदे रुंद होते, नाक सपाट बसकें होतें आणि त्यांतच बारीक काळे डोळे त्याच्या अमानुष व अघोरी अशा राक्षसी भुकेची साक्ष पटवीत होते ! पण एवढयानें कसें भागणार ? त्याच्या वाढलेल्या दाढींतून एक प्रकारचें रौद्ररूपच प्रकट होत होतें. ह्या बाह्यवेषांत आणखी भर म्हणून त्यानें तारुण्यांतील सुखाकडेहि पाठ वळविली होती ! संसाराच्या सुखाची, आप्तेष्टांची, बायकांची, मुलांची एवढेंच नव्हे तर कशाचीहि सात्त्विक इच्छा त्यांच्या अंतःकरणांत उरली नाहीं. विध्वंस व नाश ह्यांनीं त्यांना आपल्या पूर्णपणें कह्यांत घेतलें होतें. त्यांच्या डोळ्यासमोर सुंदरतेचा विध्वंस करणें, चांगल्याचें वाईट करणें, होत्याचें नव्हतें करणें एवढेंच नाचत होतें. आणि दैत्यांच्या भावनांनीं व्याप्त झालेले, आसुर संपत्तीनें युक्त असलेले हे तथाकथित मानव हिंदुस्थानवर येऊन धडकले.

भारतासारख्या सुवर्णभूमींत हूणांसारख्या या भटक्या लोकांनीं प्रवेश केल्यावर त्यांच्या भयानक अत्याचाराला ऊत आला ! युरोपभर तर त्यांनीं एवढा प्रचंड धुमाकूळ घातला कीं त्याला इतिहासांत तोड नाहीं !

मध्य आशियांतून निघालेल्या या लोकांनीं हिंदुस्थानांत भिक्षूंचा छळ केला. लोकांच्या क्रूरपणें कत्तली केल्या. मंदिरें उध्वस्त केलीं, पवित्रग्रंथ जाळून टाकले ! संस्कृति ही गोष्ट कशाशीं खातात हें त्यांना माहित नव्हतें ! आणि त्यामुळेंच वेदांचे पवित्र मंत्र ज्या जागीं घुमत होते तेथें कोल्हे व कुत्रे यांचा सुळसुळाट झाला ! पवित्र, चांगलें, सुंदर, भव्य या शब्दांशीं त्यांची ओळख झाली नव्हती ! विध्वंस हा एक मंत्र ते शिकले होते आणि त्याचें आचरण करणें एवढेंच त्यांना ठाऊक होतें !



आपल्या कृष्णकृत्यांनी हूणांनीं रात्रीला लाजविलें !

पण एवढ्यानें भागलें नाहीं ! आपल्या कृष्णकृत्यांनीं त्यांनीं रात्रीला लाजविलें ! आणि मानव हा किती अधमतम बनूं शकतो याच्या टोकाचें उदाहरण म्हणून ते स्वतः सिद्ध झाले. अस्मानाला भेदून जातील इतक्या भयानक किंकाळ्यांत, क्रूर कत्तलींत आणि जाळपोळींत जेव्हां तक्षशिला हें भव्य विश्वविद्यालय सांपडलें तेव्हां त्यांना जो आसुरी आनंद झाला असेल त्याचें शब्दांत वर्णन करणें केवळ अशक्य आहे ! ॲटिल आणि चेंगिझखान यांच्या ओळींत बसणाऱ्या मिहिरगुल या मानवी आकृति धारण केलेल्या सैतानानें त्या विश्वविद्यालयावरून अक्षरशः गाढवाचा नांगर फिरविला आणि तेथील ग्रंथांना अग्नीच्या भक्ष्यस्थानीं टाकून त्यानें कदाचित् त्यावर आपलें आंघोळीचें पाणीहि तापविलें असेल ! स्वतःच्या करमणुकीखातर हत्तींना डोंगरावरून ढकलून देऊन त्यांचे हाल मोठ्या मजेनें पाहणाऱ्या ह्या माणसानें कोणतेंहि भयानक कृत्य करण्याचें शिल्लक ठेवलें नाहीं. सत्य हें कल्पनेपेक्षां जास्त भयंकर असतें हेंच शेवटीं खरें !

वास्तविक सहस्रशीर्ष असलेला हा आर्यावर्त ! केवढा त्याचा देह ! किती विशाल, उदात्त आणि भव्य त्याचा इतिहास ! अशोक, चंद्रगुप्त, ह्यांच्या विचारांनीं आणि पराक्रमांनीं पुनीत झालेला, जगाला ललामभूत होईल असा ! हिमालयाच्या अत्युच्च अशा धवल शिखरांनीं त्याची मान पुनः पुनः उन्नत करण्याचा प्रयत्न करावा ! पण सारे प्रयत्न निष्फळ ठरले ! हूणांच्या प्रचंड झंझावाती व संस्कृतिहीन पाशवी अत्याचारांच्या प्रचंड टोळधाडीला यशस्वीपणें, संघटितपणें, एकीनें तोंड देण्याचें सामर्थ्य भारतीयांपाशीं उरलें नव्हतें ! आणि हीच उणीव, हाच दोष त्यांना सतत भेडसावीत होता !

काळाचा ओघ मात्र न थांबतां अविरतपणें वाहात होता............

● ● ●

## २. शंभु महादेवाच्या देवळांत

ॐ नमः शिवाय ! चिदानंदरूपः शिवोऽहं ऽ शिवोऽहं !! स्थानेश्वरापासून दूर आडरानांत झाडींत लपलेल्या त्या देवळांत वरील पवित्र मंत्राचा अखंड घोष करीत एक तेजस्वी मूर्ति बसली होती ! तिच्या तोंडावरील तेज पाहून हा कोणी मोठा राजर्षि असावा असें वाटत होतें. आणि दुसरीकडे त्याच्या डोळ्यांतील भाव पाहून हा एक श्रेष्ठ शिवभक्त असावा ह्याची पुरेपूर खात्री पटत होती. हळुहळू त्याचे डोळे मिटत चालले. एक प्रकारच्या भावसमाधींत तो निमग्न झाला !

आणि कांहीं वेळानें त्यानें डोळे उघडले. पाहतो तों समोर एक तजस्वी साधु बसलेला ! त्या साधूला पाहतांच ह्या शिवभक्ताचें हृदय त्याच्याकडे ओढ घेऊं लागलें. त्यानें त्या साधूला आपला गुरू मानलें.

ह्या शिवभक्ताचें नांव पुष्पभूति आणि साधूचें नांव भैरवाचार्य होय. हाच पुष्पभूति वर्धन घराण्याचा मूळ पुरुष होय !

भैरवाचार्य पुष्पभूतीचा स्वभाव पाहून अतिशय संतुष्ट झाला, व त्यानें त्याला आपला शिष्य करून घेतलें. या शिष्यावर भैरवाचार्यांची अतिशय मर्जी बसली आणि त्यांतून उद्भवलेल्या प्रेमामुळेंच एक अतिशय दिव्य अशी तलवार त्यांनीं पुष्पभूतीला भेट म्हणून दिली. त्या तलवारीचें नांव होतें अट्टहास ! ह्या तलवारीच्या पाठीमागें इतिहास होता. पातालस्वामी म्हणून एक भैरवाचार्यांचा शिष्य होता. त्याला एका ब्रह्मराक्षसानें त्रास देण्यास सुरवात केली. तेव्हां पातालस्वामीनें आपल्या सामर्थ्याच्या जोरावर त्या ब्रह्मराक्षसाचा पराभव केला व त्याच्याजवळ असलेली ती तलवार हिसकावून घेतली आणि ती भैरवाचार्याजवळ आणून दिली.



साधुसज्जनांचें रक्षणाकरितां व दुष्टांचें निर्दालन करण्याकरितां ती तलवार पुष्पभूतीला दिली.

अशा प्रकारें मिळालेली ती तलवार भैरवाचार्यांजवळ पडून होती. पराक्रमी आणि संपन्न अशा पुरुषश्रेष्ठाला वरण्याची ती वाट पहात होती आणि पुष्पभूतीच्या हातीं ती गेल्यावर समसमा संयोग झाल्यासारखाच झाला! साधुवृत्तीच्या, भैरवाचार्यांसारख्या क्षमेचें परमश्रेष्ठ हत्यार वापरणाऱ्या योग्यानें साधुसज्जनांचें रक्षण करण्याकरितां व दुष्टांचें निर्दालन करण्याकरितां ती तलवार पुष्पभूतीला दिली.

बराच काळ मध्यंतरीं लोटला. दिवस आणि रात्र यांचा पाठशिवणीचा खेळ चालू होता. भैरवाचार्य एका सिद्धीची प्राप्ति करण्याकरितां प्रयत्न करीत होते. पण त्या मार्गांत भूतपिशाच्चांचा इतका अडथळा होत होता कीं सिद्धीची प्राप्ति अत्यंत दुष्कर होत होती. अशा वेळीं त्यांनीं आपल्या शिष्याच्या साहाय्याची अपेक्षा केली आणि पुष्पभूतीनें ती पुरविलीहि!

ठरलेल्या वेळीं पुष्पभूति हा स्मशानामध्यें आपली तलवार परजून गुरुंच्या रक्षणार्थ सिद्ध झाला आणि भैरवाचार्यांनीं एका गुप्त स्थळीं आपली आराधना

सुरू केली! सहजासहजीं सिद्धि मिळूं नये हाच जणूं दैवाचा संकेत होता!

कारण–एक नाग सळसळ करीत आणि फूत्कार टाकीत विजेच्या वेगानें पुष्पभूतीवर चालून आला! श्रीकंठ हें त्याचें नांव! विश्वांतील सारें जहर आकंठ प्राशन करून तो भैरवाचार्यांच्या मार्गांत विघ्न आणण्यासाठीं एखाद्या धूमकेतूच्या वेगानें निघाला होता! त्याची चाल आणि डौल, नोक आणि झोक सारेंच और होतें! पण या साऱ्या डौलाचा व थाटाचा अपमान करण्यास पुष्पभूति वाटेंत सिद्ध होता! त्याला पाहतांच जहर कालकूट जवळ असलेला तो नाग स्मशानांतील भयानक वातावरणांत अधिकच रौद्रता उत्पन्न



**आणि श्रीकंठानें पुष्पभूतीवर प्रचंड हल्ला चढविला**

करूं लागला! त्यानें पुष्पभूतीवर प्रचंड हल्ला चढविला. तुंबळ युद्ध झालें! दोघेहि हटेनांत, पण–शेवटीं नाग हरला. त्याची श्री व कंठ हीं दोन स्वतंत्र स्थानावर शोभूं लागलीं.

इतक्यांत त्याच ठिकाणीं एक अत्यंत तेजस्वी व लावण्यवती स्त्री पुष्पभूतीच्या नजरेस पडली. तिचें सारें अंग सूर्याच्या तेजाप्रमाणें तेजस्वी होतें.

मुद्रेंतून जणूं चंद्राच्या शीतल पौर्णिमेप्रमाणें दुसऱ्याला आनंददायक असें हसूं ओसंडत होतें ! एक प्रकारचा दिव्य सुगंध तिच्या अंगांतून येत होता.

ती साक्षात् लक्ष्मी होती ! पुष्पभूतीच्या पराक्रमानें संतुष्ट होऊन त्याला वर देण्याकरितां ती त्या ठिकाणीं जातीनें प्रकट झाली होती. तिच्या डोळ्यांतील प्रसन्न व मधुर भाव पाहून पुष्पभूति मुग्ध झाला. तेवढ्यांत अत्यंत कर्णमधुर शब्दांत तिनें पुष्पभूतीला एखादा वर मागण्यास सांगितलें.

पण वर्धन घराण्यांतील तो राजर्षि होता ! निरपेक्ष, निरहंकार व उदारवृत्तीनें राहून दुसऱ्यांची सेवा करणें हेंच तर त्याचें ब्रीद होतें. आणि आज तर तो गुरूची सेवा करण्याकारितां उभा होता !

भारतीय परंपरेला साजेसेंच उत्तर त्याच्या मुखांतून बाहेर पडलें ! "हे देवी ! माझ्या गुरूला त्यानें आरंभिलेल्या कार्यांत यश येवो." साक्षात् लक्ष्मी पुढें प्रकट झाली असतांना सुद्धां स्वतःच्या स्वार्थाची यत्किंचितहि पर्वा न करणाऱ्या त्या नरवीराचें कौतुक कोणाला वाटणार नाहीं !

लक्ष्मी तर त्याच्यावर बेहद्द खूष झाली. मानवी मनाची ती उच्च पातळी पाहून तिचा आनंद गगनांत मावेना. त्याच्या असामान्य कृत्याचा गौरव म्हणूनच कीं काय तिनें त्याला आशीर्वाद दिला, "हे राजा, तुझ्या घराण्यांत महापराक्रमी असे नृपति निपजतील व ते स्वतःच्या पराक्रमानें, शौर्यानें व गुणांनीं तुझ्या वंशाची कीर्ति अजरामर करतील. यावच्चंद्रदिवाकरौ तुझ्या वंशाची कीर्ति दिक्कोण गर्जवीत शाश्वत स्थिरावेल." एवढें म्हणून देवी लक्ष्मी अंतर्धान पावली.

ह्या आशीर्वादानें पुष्पभूतीला आनंद झाला. पराक्रमानें आणि शौर्यानें त्याचें मन फुलून गेलें ! आणि ज्यावेळीं भैरवाचार्य बाहेर आले त्यावेळीं त्यानें हा सारा प्रकार त्यांना कथन केला. आपल्या शिष्यानें केलेल्या पराक्रमामुळें त्यांचाहि आनंद गगनांत मावेनासा झाला.

अशा प्रकारें वर्धन घराण्याला पुष्पभूतीनें आपल्या कृत्यानें महान् अधिष्ठान प्राप्त करून दिलें. त्यामुळें पुढें त्याच्या वंशांत एकामागून एक महाराज नरवर्धन, राज्यवर्धन, आदित्यवर्धन व प्रभाकरवर्धन यासारखे राजे उत्पन्न झाले. या सर्वांमध्यें प्रभाकरवर्धन हा जास्त पराक्रमी निपजला व त्यानें एका नव्या मनूचा प्रारंभ केला. ● ● ●

# ३. महाराजाधिराज प्रभाकरवर्धन

" परमभट्टारक महाराधिराज " या पदवीनें विभूषित झालेला प्रभाकरवर्धन हा एक अत्यंत महत्त्वाकांक्षी, शूर व पराक्रमी राजा होता. आपल्या पराक्रमाच्या व सामर्थ्याच्या जोरावर त्यानें वडिलांनीं आणि आजांनीं मिळविलेल्या महाराज या पदवीचा विस्तार केला. पण त्यासाठीं त्याला किती कष्ट पडले !

हूणांनीं आपल्या अत्याचारानें जो प्रचंड धुमाकूळ मांडला होता त्यास प्रभाकरवर्धनानें यशस्वीरणें पायबंद घातला. त्यांच्या आसुरी व राक्षसी वृत्तीला त्यानें सणसणीत चपराक दिली. पण एवढ्यानें महाराजाधिराजासारखी पदवी त्याला माळ घालण्यास सिद्ध नव्हती. सूर्यासारख्या प्रखर तेजोरूपी पराक्रमानें जेव्हां त्यानें पंजाब, गांधार, गुजरात व माळवा इत्यादि ठिकाणीं आपली अधिसत्ता स्थापन केली त्यावेळीं कीर्ति आपणहून त्याची दासी बनली. तिनें आपणहून यशाच्या दुंदुभी वाजविल्या ! आणि त्याचें टोपणनांव जें प्रतापशील तेंहि पूर्णपणें सार्थ केलें !!

खरोखर बाण कवीनें वर्णन केल्याप्रमाणें प्रभाकरवर्धन हा हूणरूप हरिणांना सिंहासारखा, सिंधुराजाला ज्वरासारखा, गुर्जरराजांना निद्रा घेऊं न देणारा, गांधाररूप मत्तगजांची मस्ती जिरविणारा, लाटराजाचा उच्छेद करणारा व मालवराजांच्या लक्ष्मीरूप लतेस केवळ परशुसमानच होता !

अशा नरश्रेष्ठाचा विवाह माळव्याचा राजा यशोधर्म याची मुलगी यशोमती इजबरोबर झाला. ती दिसायला अतिशय सुंदर होती. तिचे डोळे

हे चंद्राच्या रोहिणीप्रमाणें चमकणारे व तेजस्वी होते. आणि कमलांतील लक्ष्मीप्रमाणें तिची अंगकांति होती. ह्या सौंदर्याला तिच्या प्रजेवरील प्रेमामुळें अधिकच शोभा आली होती. वसिष्ठाला ज्याप्रमाणें अरुंधति, प्रजापतीला बुद्धि त्याचप्रमाणें प्रभाकरवर्धनाला यशोमती होती! भारतीय परंपरेला शोभेल असेंच तिचें प्रेम तिच्या पतीवर होतें! पति हाच देव! अन्य गोष्टी गौण, ह्याची पक्की समजूत तिला पटली होती! यामुळेंच ती प्रभाकरवर्धनाबरोबर जातीनें सूर्याची उपासना करीत असे. आपल्या वाडवडिलांप्रमाणेंच प्रभाकरवर्धन हा सूर्यदेवतेचा एकनिष्ठ भक्त होता!

ह्या त्याच्या एकनिष्ठ भक्तीमुळेंच पुढील प्रसंग घडला. उन्हाळ्यांत तो व यशोमती राजवाड्याच्या सौधावर कोचावर पडले होते. पिठासारखें शुभ्र चांदणें पडलें होतें. रात्रभर त्यांच्या गप्पा चालल्या होत्या आणि आतां पहांट होण्याची वेळ आली होती. तारे हळू हळू दृष्टिपथांतून नाहीसे होत होते. त्यांचें तेज उषेकडून हरण केलें जात होतें. आणि अशा वेळीं जागरणामुळें दोघांनाहि गाढ झोप लागली.

इतक्यांत नाथ! नाथ!! धांवा!! धांवा!! म्हणून यशोमती अत्यंत भयभीत अंतःकरणानें ओरडली व कोचावर उठून बसली. काळजाला भेदून जाणाऱ्या त्या करुण किंकाळीनें प्रभाकरवर्धन एकदम जागा झाला. त्यानें आपल्या उशाशीं असलेली तलवार सपकन उपसली आणि इकडे तिकडे पाहूं लागला.

परंतु सगळीकडे सामसूम होती! दंव पडल्यामुळें हवेंत अधिकच गारठा उत्पन्न झालेला होता तो अंगाला झोंबत होता. त्यानें आपल्या राणीचा हात धरला व तिला वाड्यांत नेलें. झालेल्या प्रकारामुळें ती अक्षरशः थरथर कांपत होती. तिला एका कोचावर बसवून राजानें तिला धीर दिला व विचारलें, "तूं कां ओरडलीस? काय झालें? कसली भीति वाटली तुला?"

तिनें उत्तर दिलें, "मला एक स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत भगवान् सूर्यापासून दोन मनुष्यासमान दिसणारे तेजोगोल निघालेले दिसले. त्यांचा प्रकाश इतका प्रखर व विलक्षण होता कीं त्यामुळें सारें गगनमंडळ उजळून निघालेलें दिसत होतें. त्यांनीं रत्नांनीं जडविलेले मुकुट डोक्यावर धारण केले होते. त्यांच्या कानांमध्यें तळपतीं कुंडलें होतीं. त्यांच्या हातांत जणूं विजेप्रमाणें

अनुक्रम २१८७ वि: ...
क्रमांक ५७८ नों: दि: ९५/५/७०





" तूं कां ओरडलीस ? काय झालें ? कसली भीति वाटली तुला ? " राजानें विचारलें

तळपणाऱ्या तलवारी होत्या. आणि याहिपेक्षां आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे ते दोघेहि पूर्णपणें रक्तांत न्हाल्यासारखे लाल दिसत होते. सगळे देवतागण त्यांना नमस्कार करीत आहेत असें दृश्य दिसत होतें.

इतक्यांत–अत्यंत वेगानें ते माझ्याकडे आले आणि निमिषमात्रांत ते माझ्या अंतःकरणामध्यें प्रविष्ट झाले. आणि त्यामुळें घाबरुन मी किंकाळी फोडली. "

हा सारा वृत्तांत ऐकुन राजा अतिशय आनंदित झाला. त्याचा आनंद गगनांत मावेना. सूर्यदेवतेनें आपल्या भक्तीचा अंतःकरणपूर्वक केलेला स्वीकार पाहून, आपल्याला पुत्रप्राप्ति होऊन आपल्या वाडवडिलांचे बोल खरे होणार असें त्याला वाटू लागलें.

' आपल्या वंशांत सम्राट् जन्मणार ' अशी जी त्याच्या घराण्याची धारणा होती ती दृश्यस्वरुपांत येणार व पुष्पभूतीला मिळालेला आशिर्वाद सफल होणार हें पाहून त्याचें मन आनंदानें फुलून गेलें. आणि आपल्या

पतीचा हा आनंद पाहून व आपल्याला सूर्यासारखा तेजस्वी, पराक्रमी व विश्वावर राज्य करणारा पुत्र होणार हें पाहून तर यशोमतीच्या आनंदाच्या भावनेला सीमा राहिली नाहीं.

• • •

# ४. भारतीय गौरवाचा किरण

राज्यवर्धनाचा जन्म होऊन पांच वर्षे लोटलीं आणि त्यानंतर पुन्हां एकदां यशोमती गर्भवती राहिली. या काळांतील तिची अवस्था अवर्णनीय अशीच होती! ज्याप्रमाणें देवकीच्या मुखावर कृष्णजन्माचे वेळीं भाग्याची आणि विश्वचैतन्याची प्रभा झळकत होती त्याचप्रमाणें यशोमतीचा चेहरा दिसत होता. तिच्या डोळ्यांतील शीतलता जणुं चंद्राच्या शीतलतेशीं स्पर्धा करीत होती!

हळूं हळूं गर्भ वाढत होता! यशोमतीच्या अंगकांतींत बदल होत होता. राजवाड्यांतील स्फटिकवत् भूमीवरून चालतांना तिच्या पदकमलांचें जें प्रतिबिंब पडत होतें तेंहि मोठें विलोभनीय होतें यांत शंका नाहीं! तिच्या त्या पदन्यासानें नमविली जाणारी भूमि मोठ्या आनंदानें तिच्या पावलांचा स्वीकार करीत होती, कारण तिचा उद्धार करणारा गौरवाचा किरण—त्या भरतभूमीच्या आशेचा भाग्यरवि—यशोमतीनें धारण केला होता.

आणि खरोखर या भाग्यवतीचे डोहाळेहि कांहीं अजब होते! यशोमतीला वाटे जगताच्या चारी दिशांना पसरलेल्या समुद्रांचें पाणी एकत्र करावें. त्यांत स्नान करावें. खंड परशूची पूजा करावी. सामान्य स्त्रीच्या अंतःकरणामध्यें उत्पन्न होणाऱ्या इच्छा त्या ठिकाणीं जवळ येण्यास धजावत नव्हत्या. आणि खरोखर त्यांचें तेथें कामहि नव्हतें! सम्राट् पत्नीस शोभतील अशाच त्या इच्छा आणि डोहाळे होते! स्वतःला दागदागिन्यांनीं मढवून आपलें प्रतिबिंब आरशांत पाहावें असें तिला कधींच वाटलें नाहीं. उलट दुधारी

तलवारीच्या चकाकत्या पात्यांतील प्रतिबिंबाचें आकर्षण तिच्या पराक्रमी अंतःकरणाला वाटत असे.

कर्णमधुर संगीतानें कानांना सुखवावें असें तिला वाटेना. त्याऐवजीं रणदुंदुभी ऐकण्याकरतां कान आतुर व्हावे इतकें तिचें चित्त बदलून गेलें. पण एवढ्यानें थोडेंच भागणार ! डोळ्यांची भूकहि अशीच तीव्रतर होती. वाघांना बघावें, सिंहांच्या डोळ्यांशीं डोळे भिडवावें असें तिला प्रतिक्षणीं वाटूं लागलें. या असल्या विलक्षण डोहाळ्यांमुळें राजवाड्यांतील दासदासी तर चकित होतच पण प्रजाजनसुद्धां आश्चर्यचकित होत असत ! प्रभाकरवर्धनाला मात्र यामुळें अतिशय आनंद होत असे. आपल्या पत्नीकडे पाहिल्यावर त्याला जणुं लक्ष्मी भूतलावर अवतरली आहे असें वाटे आणि आपल्या वंशांत पराक्रमी पुत्र जन्मणार या कल्पनेनें त्याचें अंतःकरण सुखावें ! सूर्यदेवतेनें दिलेला आशीर्वाद पुत्ररूपानें फळास येणार हें पाहून—सागरावर ज्याप्रमाणें वाऱ्याच्या मंदलहरींनीं लाटा निर्माण होतात त्याप्रमाणें त्याच्या मनःसरोवरावर पुत्रप्राप्तीच्या अपेक्षेमुळें आनंदाच्या अक्षरशः शतावधी लाटा निर्माण झाल्या. त्या आनंदी अंतःकरणाची जेव्हां यशोमतीला जास्त जास्त चाहूल लागत चालली तेव्हां त्यांत तीहि सामील झाली आणि द्विगुणित आनंदानें राजवाड्याचा कानाकोपरा उजळून निघाला.

संवत् ६४६ मधील (इ. स. ५९०) ज्येष्ठ महिना उजाडला. त्यानें शुद्ध पक्षाला मागें टाकलें. राणीला हालतां येणेंहि अशक्य झालें. ती आतां कोचावरच पडून असे. कृष्णपक्षांतील द्वादशी उजाडली ती सहस्त्ररश्मि सूर्याच्या अत्यंत मंगलकिरणांना आपल्या समवेत घेऊनच ! यशोमतीचें पोट दुखूं लागलें आणि त्यावेळेस सर्व ग्रह उत्तमांतल्या उत्तम जागीं गेले. अगदीं गोरज मुहूर्तावर श्रीहर्षाचा जन्म झाला. ही आनंदाची बातमी महाराजाधिराजांना कळविण्याकरितां यशोमतीच्या सुईणीची मुलगी सुयामा ही धांवत गेली आणि राजाच्या चरणावर मस्तक टेकून तिनें ही बातमी राजाला सांगितली.

महाराजाधिराज प्रभाकरवर्धन अत्यंत आनंदित झाला. आनंदाची बातमी सांगणाऱ्या सुयामेच्या गळ्यांत राजानें स्वतःच्या गळ्यांतील कंठा बांधला !

आणि नगरामध्यें जिकडे तिकडे ही आनंदाची बातमी पोहचविण्यासाठीं हत्तीवरील शर्करा वेगानें पुढें जाण्यास निघाल्या.

राजानें त्यावेळचा प्रसिद्ध ज्योतिषी तारक याला टांकोटांक आमंत्रण देऊन पाचारण केलें. आपल्या चिकाटीच्या जोरावर आणि अभ्यासूवृत्तीनें ज्यानें ज्योतिष शास्त्रामध्यें आपली विलक्षण गति चालवून अनेकांना अनेकवेळां चकित केलें होतें आणि ज्याचें त्या शास्त्रावरील प्रभुत्व अगाध होतें



तारक राजास भविष्य सांगूं लागला

असा तो तारक नवीन मुलाची पत्रिका करतांना अक्षरशः भानरहित होऊन गेला !

पत्रिकेंतील निरनिराळ्या ग्रहांचें विलक्षण सामर्थ्य पाहून चकित झालेला तारक राजास जेव्हां भविष्य सांगू लागला त्यावेळेस राजाचे कान त्या भविष्यरूपी अमृतवाणीनें भरून जाण्यासाठीं आतुर झाले.

"महाराजाधिराज," तारक सांगू लागला, "ह्या पुत्राच्या जन्माचा काल खरोखर दोषरहित असून कोणत्याहि प्रकारच्या दुष्टाव्यानें तो भरलेला नाहीं. सूर्य व चंद्राची कृपादृष्टि ह्या मुलावर सततची आहे. आणि ज्याप्रमाणें, हे राजा, मान्धात्रीच्या जन्माच्या वेळेला अत्यंत शुभ असे ग्रह एकत्र आले होते त्याचप्रमाणें आज ह्या मुलाच्या जन्माचे वेळीं आले आहेत ! सम्राट होण्यासाठींच कीं काय पुन्हां ह्या साऱ्या ग्रहांची कृपादृष्टि एकत्र होऊन आपल्या पुत्रावर पडलेली आहे ह्यांत संशय नाहीं. कारण अशाप्रकारें ग्रह एकत्र आले असतां जन्म घेण्याचें भाग्य लाभणें हें केवळ दुरापास्तच नव्हे तर अशक्य आहे. दैवी संपत्तीनें युक्त असलेल्या महापुरुषांचा जन्म अशावेळीं होतो. आणि हे राजा, भरत, अर्जुन, मांधात्रि, भगिरथ, युधिष्ठिर, सगर व नहूष या सहा लोकांनीं पराक्रम करून आपली कीर्ति ज्याप्रमाणें ह्या भूतलावर यावत्चंद्र-दिवाकरौ तळपत ठेवली त्याचप्रमाणें हा पराक्रम करून त्यांच्या मालिकेंत आपलें स्थान निश्चित करील ह्यांत तिळप्राय शंका नाहीं."

तारकाच्या ह्या भविष्यामुळें प्रभाकरवर्धनाला अतिशय आनंद झाला. आणि आपल्या कुळाचा अभिमान वाढविणाऱ्या, पराक्रमानें कुळाची कीर्ति जगांत पसविणाऱ्या व त्याबरोबरच समाजाला आणि भरतभूमींतील सर्व पुत्रांना आनंदित व सुखी करून त्यांच्या जीवनांत हर्ष निर्माण करणाऱ्या ह्या मुलाचें नामकरणहि राजानें श्रीहर्ष असें केलें असल्यास त्यांत नवल तें काय !

हळू हळू प्रतिपदेच्या चंद्राच्या कलेप्रमाणें हर्ष वाढू लागला आणि त्याच्या बाललीलांत यशोमती रमून गेली.

काळ थोडा पुढें सरकला आणि हर्षाबरोबर खेळण्यास त्याची बहीण राज्यश्री ही आली. दोन भाऊ आणि एक बहीण अशी तीन्हीं मुलें मोठ्या वैभवानें राजवाड्यांत वाढूं लागलीं, खेळूं लागलीं. आपल्या तीन्हीं मुलांशीं खेळण्यांकारितां यशोमतीनें आपल्या भावाचा मुलगा भंडी यांस स्थानेश्वर येथें

आणलें. या वेळीं भंडीचें वय आठ वर्षांचें म्हणजे जवळ जवळ राज्यवर्धना-इतकेंच होतें.

आणखी एक सुंदर योजना प्रभाकरवर्धनानें केली. आपल्या मुलांना चांगले मित्र मिळावेत, त्यांची सेवा उत्तमप्रकारें व्हावी व त्यांच्या शिक्षणाची गति वाढावी म्हणून त्यानें कुमार गुप्त व माधव गुप्त ह्या दोन मालवराजपुत्रांना त्यांच्या सहवासांत ठेवलें. त्यापैकीं माधवगुप्ताचें वर्णन करतांना बाण कवि म्हणतो, " त्याची मुद्रा भव्य होती. एखाद्या दगडाच्या शिळेप्रमाणें त्याची छाती रुंद होती. त्याचे डोळे अतिशय चकाकणारे व तेजस्वी होते. त्याचें नाक वराहाप्रमाणें होतें. बैलाप्रमाणें त्याच्या खांद्यांना पुष्टता आली होती. एखाद्या महाविक्राळ वाघाप्रमाणें त्याचे हात होते. सिंहासारखे त्याचे पंजे प्रबल होते. आणि त्याची चालण्याची गति एखाद्या हत्तीप्रमाणें होती. पाहणाऱ्याच्या मनांत भीतीनें थरकांप उडावा आणि जेथल्या तेथेंच त्यानें भिऊन जावें अशा प्रकारचा हा राजपुत्र होता. " आणि तोच श्रीहर्षाबरोबर राहून नानातऱ्हेचे विविध खेळ खेळे.

अशा प्रकारें या तिघांचें जीवन मोठ्या आनंदांत चाललें होतें यांत शंका नाहीं. आणि प्रभाकरवर्धनहि आपल्या भावी कुलदीपकांकडे मोठ्या आशेनें बघत होता. त्यांच्या शिक्षणासाठीं तत्कालीन पध्दतीला अनुसरून त्यानें योग्य गुरूंची नेमणूक केली. त्याप्रमाणें शस्त्रास्त्रांचेंहि शिक्षण पूर्णपणें देण्याकरितां पारंगत लोक नेमले. या साऱ्यांत श्रीहर्षाची शिकण्याची व आकलन करण्याची गति खरोखर मोठी विलोभनीय होती. सम्राट् पदाची ही पायाभरणी अत्यंत परिश्रमपूर्वक होत होती आणि यांतच भाग्यश्रीला वरण्याची सिध्दता केली गेली.

उपासनेचें सामर्थ्य किती अगाध असतें त्याचाच प्रत्यय प्रभाकरवर्धनाला आला ! सूर्यदेवतेची प्रार्थना करून प्राचीन ऋषिवर्यांनीं महत्पद प्राप्त करून घेतलें होतें.

प्रभाकरवर्धनानेंहि भरतभूमीला, राज्यवर्धन, हर्ष व राज्यश्री या मुलांना जन्म देऊन, हें महत्भाग्य प्राप्त करून घेतलें असें म्हणणें भाग आहे. राजा कालस्य कारणम् हेंच शेवटीं खरें !

# ५. राज्यश्री

निसर्गाच्या नियमानुसार राज्यश्रीची वाढ झपाट्यानें झाली आणि ज्याप्रमाणें एखादी जाई जुईची कळी हिरव्या परकरांतून पांढऱ्या साडींत प्रविष्ट होते तद्वतच राज्यश्रीहि वाढली. अर्थात नैसर्गिक वाढीबरोबर मानसिक, बौध्दिक वाढीसाठीं निरानिराळ्या भिन्न कलांचेंहि शिक्षण देण्याची व्यवस्था प्रभाकरवर्धनानें केली होती. ती लिहिणें वाचणें तर शिकलीच पण त्याचबरोबर गायन, नर्तन, वादन इत्यादि कलांचें शिक्षण घेऊन मानसिक वाढीला तिनें परिपुष्टता आणली. या कलांच्या शिक्षणानें जीवनाबद्दलची तिची दृष्टि विशाल झाली. परंतु एवढ्या शिक्षणानें भारतीय स्त्री म्हणून ती उभी राहूं शकली नसती आणि त्यासाठींच गृहिणीला आवश्यक असणारें सर्व शिक्षण राज्यश्रीनें अतिशय कौशल्यानें आत्मसात् केलें.

अशा प्रकारें शिक्षणानें व आपल्या तारुण्यानें परिपूर्ण झालेली ही नवयुवती अनेक राजांच्या इच्छेचा विषय झाली असल्यास नवल तें काय ? प्रभाकरवर्धन आणि यशोमती यांनाहि ती मोठी झाल्याची जाणीव झाली होती. "अर्थो हि कन्या परकीय एव" हें त्या दोघांना माहित होतें. परंतु तिच्यासाठीं वराण्याच्या प्रतिष्ठेला व कुळाला शोभेल, तोलेल आणि पेलेल असा कुणीतरी श्रेष्ठ मुलगा हवा होता. प्रभाकरवर्धनाकडे अनेक राजांनीं तिच्यासंबंधीं मागणी केली होती.

पण त्याचें लक्ष एकाच घराण्यावर केंद्रित झालें, आणि तें घराणेंहि खरोखर मातब्बर होतें. त्याची कीर्तीहि मोठी होती. असें तोलाचें आणि मोलाचें

घराणें म्हणजे मौखरी घराणें होय. या घराण्यांत त्यावेळीं अवन्तिवर्मा नांवाचा एक श्रेष्ठ राजा होता. त्याचा पुत्र गृहवर्मा. त्याला राज्यश्री द्यावी असा प्रभाकरवर्धनाचा विचार ठरला. त्याप्रमाणें त्यानें यशोमतीला विचारलें. असा सुंदर, श्रेष्ठ व चारित्र्यसंपन्न असलेला बहुगुणी पति आपल्या मुलीला मिळणार हें पाहून अंतःकरणांतील आनंदाच्या उर्मींच जणूं तिच्या डोळ्यांवाटे बाहेर पडल्या आणि त्यांनींच राजाला मूक उत्तर दिलें. राजा गहिंवरला, आणि आनंदलाहि.

लग्नाचा दिवस निश्चित झाला. आणि प्रभाकरवर्धन जोरानें तयारीला लागला. राजवाड्याची सजावट दिवसेंदिवस अधिकच शोभायमान स्वरूप धारण करूं लागली. वैभवानें तळपणाऱ्या त्या राजवाड्याकडे लोकहि आकृष्ट झाले. निरनिराळ्या कारागिरांनीं राजवाडा सुशोभित करण्याकरितां रात्रंदिवस कष्टाला राबविलें. भिंतींना रंग देऊन त्या इतक्या सुंदर करण्यांत आल्या कीं त्यांत जाणाऱ्यायेणाऱ्याचें प्रतिबिंब उमटावें. लांकडाला केलेलें नक्षीकाम पाहून अक्षरशः मयसुद्धां थक्क झाला असता. आणि राजवाड्यांतील झुंबरें, आरसे यांची शोभा राज्यश्रीसारख्या नववधूचें प्रतिबिंब ग्रहण करतां करतां अधिकच वर्धिष्णु होऊं लागली.

याबरोबरच राजवाड्याच्या भोंवतालची बागहि जास्तच सुशोभित करण्यांत आली. निरनिराळ्या फुलांचे गुच्छ पहांटेच्या मंद वाऱ्यावरोबर झोके घेत घेत आपल्याजवळील सुगंध मुक्त हस्तानें दाही दिशांना पखरण करण्याकरितां तत्पर झालेले दिसत होते. येणाऱ्याजाणाऱ्यांचें मन वेधून घेऊन मारून टाकावें म्हणून फुलांच्या रंगांत आणि त्यांच्या वासांत जणूं स्पर्धा लागली होती.

अशा प्रकारें अत्यंत कौशल्यानें, बुद्धीनें, परिश्रमानें सजविलेला तो राजवाडा आणि त्याचा परिसर हा जितका आकर्षक तितकाच सौंदर्यसंपन्न आणि म्हणूनच मोठा भव्य दिसत होता यांत शंका नाहीं.

या सजविलेल्या राजवाड्यांत लग्नाच्या दिवशीं खूपच गडबड उडाली. जो तो अत्यंत उत्साहानें व लगबगीनें कामें करीत होता. सगळेजण आनंदी होते. एक व्यक्ति मात्र मोठ्या द्विधा अंतःकरणानें या समारंभांत वावरत होती—

तिचें नांव यशोमती—यशोमती ? होय, तीच—राज्यश्रीची आई—एका डोळ्यांतून आनंदाश्रु तर दुसऱ्या डोळ्यांतून दुःखाश्रु यावेत अशी मोठी

दयनीय स्थिति त्या माऊलीची झाली होती. एकीकडे ती राजाकडे लक्ष देत होती, तर दुसरीकडे मुलीकडे पाहात होती. तेवढ्यांत आलेल्या नायकांची विचारपूस करीत होती आणि लगबगीनें दुसरीकडे दासदासींना काम करण्याकरितां भराभर आज्ञा देत होती. त्याच वेळीं तिचे डोळे निरनिराळ्या ठिकाणीं आंखून दिलेलीं कामें बरोबर चाललीं आहेत कीं नाहीं हें पाहाण्यांत गुंग झाले होते. आणि हें सर्व चालूं असतांना भावनांच्या पाझराला आवर घालतां घालतां यशोमतीला अतोनात कष्ट पडत होते.

तेवढ्यांत भटजी तेथें आले व त्यांनीं घटिका-यंत्र पाण्यांत बुडालें असून वेळ झाल्याचें सांगितलें. तेव्हां वरास वधूच्या घरीं नेण्यांत आलें. त्या



**आणि शुभमुहूर्तावर राज्यश्रीचा विवाह झाला.**

ठिकाणीं शास्त्रोक्त पद्धतीनें त्यांचा विवाह झाला. त्यावेळीं राज्यश्री किती सुंदर दिसत होती याचें वर्णन बाण कवीनें केलें आहे. तो म्हणतो, "पूर्वेच्या प्रभेप्रमाणें तिचें मुख आरक्त असून गुलाबी रंगाचा रक्तिमा जणूं तिच्या गालांवर पसरलेला होता. अत्यंत नाजूकपणामुळें स्त्रीचा विनयशील व

लज्जायुक्त भाव अधिकच उठावदारपणें तिच्या ठिकाणीं शोभायमान होत होता. आणि वराला माळ घालण्याच्या वेळीं, ज्याप्रमाणें पहांटेच्या वेळीं एकाद्या सरोवरांतील कमळाचें तांबडें फूल मंद मंद समीरणावर हलकें हलकें झोके घेत असतें त्याप्रमाणें, तिच्या अंगाला कंप सुटून झोके बसत होते. एवढेंच नव्हे तर लालसर असणाऱ्या रोहिणीची ज्याप्रमाणें ग्रहणाच्या वेळीं मोठी अनुकंपनीय स्थिति होते त्याचप्रमाणें राज्यश्रीची स्थिति त्यावेळीं झाली होती.

परंतु रतिप्रमाणें रूप असलेल्या राज्यश्रीच्या मागून प्रेमाचा झरा उदंडपणें वहात येत होता; आणि ज्याप्रमाणें एखादें रत्न आपल्या स्वाभाविक तेजानें उजळून दिसावें त्याप्रमाणें ती दिसत होती. या साऱ्या गोष्टींत तिच्या बुद्धिमत्तेची, प्रेमळपणाची, गोडपणाची आणि नाजुकपणाची भर पडल्यामुळें व कौस्तुभ रत्नाप्रमाणें तेजस्वी व चंद्राप्रमाणें शीतल अशा व्यक्तिमत्त्वामुळें ती जणुं समुद्रां-तून उत्पन्न झालेली दुसरी लक्ष्मीच कीं काय असें भासत होतें. ''

अशा या कन्येचा लग्नविधि यथासांग पार पडल्यामुळें प्रभाकरवर्धनाला व यशोमतीला अतिशय आनंद झाला; आणि श्रीहर्षहि त्यांत सहभागी होता. आपल्या बहिणीबद्दल त्याच्या मनांत गाढ प्रेम होतें आणि त्यामुळेंच ती सासरीं जातांना त्याच्या डोळ्याला पाणी आल्यावांचून राहिलें नाहीं.

● ● ●

# ६. महासती यशोमती

राज्यश्रीचा विवाह झाल्यावर कांहीं दिवस आनंदांत गेले. परंतु थोड्याच दिवसांनीं प्रभाकरवर्धनाच्या हेरांनीं एक अतिशय खात्रीलायक अशी खळबळजनक बातमी आणली, आणि ती बातमी म्हणजे हूण लोकांची ठाणेश्वरावर चाल करून येण्याविषयींची ! या बातमीनें प्रभाकरवर्धन अतिशय गरम झाला. हूणांना चांगला हात दाखविल्याशिवाय ते पुन्हां गप्प बसणार नाहींत आणि त्यांची रग जिरविल्याशिवाय त्यांच्या मातलेल्या अत्याचारांना आळाहि बसणार नाहीं हें जाणून त्यानें स्वारीची तयारी केली. पण—

पण प्रभाकरवर्धन आतां म्हातारा झाला होता. तारुण्यांतील पराक्रमाची पुन्हां एकदां सर येईल अशी ताकद त्याच्यापाशीं उरली नव्हती. त्यासाठींच वयांत आलेल्या राज्यवर्धनाला स्वारीवर पाठविण्याचा त्यानें बेत आंखला. शस्त्र-विद्येंत तो चांगला तरबेज झाला होता. पुत्राच्या पराक्रमाची त्याला तहान लागलेली होती आणि त्याला ही संधि अतिशय चांगली होती. शूरस्य मरणं तृणम् । या न्यायानें प्रभाकरवर्धनाचें अंतःकरण राज्यवर्धन स्वारीवर निघतांना आनंदानें भरून आलें.

प्रभाकरवर्धनानें राज्यवर्धनाला स्वारीची पूर्ण कल्पना दिली होती. त्याच्या हाताखालीं कसलेले सेनापति व सैन्य दिलें होतें आणि शिवाय पितृछायारूपानें आशीर्वादाचें छत्र डोक्यावर धरलें होतें. त्यामुळेंच राज्यवर्धन अतिशय आनंदित झाला होता. परंतु त्याच्या आनंदाला आणखी एक महत्त्वाचें कारण होतें आणि तें म्हणजे आपल्या पित्याला जातीनें शत्रूला तोंड देण्याची पाळी येऊं नये

अशी त्याची इच्छा होती; कारण तो आतां तरुण झाला होता. त्याचें वय १९ वर्षांचे होतें. हूणांचा सूड घेण्यासाठीं त्याचें रक्त नुसतें सळसळत होतें. त्यामुळें त्यानें शक्य तितक्या त्वरेनें पंजाबकडे धांव घेतली.

त्याच्याबरोबर श्रीहर्षही निघाला. परंतु अजून तो बाल होता. त्याची लढण्याची तयारी पूर्ण व्हावयाची होती आणि म्हणूनच हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या अरण्यांत मृगया करण्याच्या निमित्तानें तो थोड्याशा सैन्यासह राहिला. त्या ठिकाणीं त्यानें सिंह, शरभ, वाघ, डुक्कर यांच्या शिकारींत बरेच दिवस घालविले.

अशा प्रकारें आनंदांत दिवस जात असतां एके दिवशीं सकाळीं उठल्यापासून श्रीहर्षाला अपशकून घडूं लागले. त्याचा डावा डोळा सारखा लवत होता, अंतःकरणामध्यें अकारण भीति उत्पन्न झाल्यासारखें वाटत होतें आणि कांहीं तरी चमत्कारिक होणार असें वाटावयास लागून डोकें सुन्न झालें होतें. आणि झालेंहि तसेंच—



**वडील आजारी आहेत या बातमीनें श्रीहर्षाला मोठा धक्का बसला.**

एक जासूद दौडत आला. त्यानें श्रीहर्षाला बंद केलेला एक लखोटा सादर केला. तो उघडून वाचतांक्षणींच त्याचा चेहरा काळवंडला. वडील आजारी असल्याच्या त्या बातमीनें श्रीहर्षाला मोठा धक्का दिला. त्यानें ताप कसला आहे म्हणून जासूदाला विचारलें, परंतु तो एक विलक्षण मुदतीचा ताप आहे एवढ्या माहितीशिवाय अधिक कांहींच त्याच्या हातीं आलें नाहीं.

श्रीहर्षानें आपल्या सैन्याला तावडतोब सिद्ध होण्याचा आदेश दिला आणि बाकीचे सर्व कार्यक्रम रद्दबातल ठरवून त्यानें राजधानीकडे कूच केलें. अंतःकरणामध्यें विषाद उत्पन्न झाल्यामुळें जेवण घेण्याचेंहि भान त्याला राहिलें नाहीं.

एखाद्या तीरासारखा तो राजधानीकडे निघाला होता. वाटेंत अनेक अपशकून झाले. नागडा जैन एके ठिकाणीं दिसला तर कांहीं ठिकाणीं सतत कावळे आडवे जात होते, ओरडत होते. असें असलें तरी या गोष्टींकडे दुर्लक्ष करून दोन दिवसांत श्रीहर्षानें सारें अंतर कापलें आणि तो राजधानींत प्रविष्ट झाला.

सगळीकडे सामसूम होतें! व्यवहार चालले होते पण त्यांत उदासीनतेची छटा मिसळलेली होती. ज्या राजानें आपल्यावर बंधुवत् प्रेम करून अखंड प्रेमाच्या छत्राखालीं आपलें जीवन श्रेष्ठ केलें तो राजा आजारी पडल्यावर त्याच्या प्रजाजनांच्या दुःखालाहि पारावार राहूं नये यांत कसलेंच आश्चर्य नव्हतें!

राज्यवर्धन व श्रीहर्ष स्वारीवर गेल्यापासून प्रभाकरवर्धनाची प्रकृति खालावत गेली आणि शेवटीं तो विषमाच्या तापानें आजारी पडला. मरणापूर्वी आपल्या एका मुलाची तरी भेट व्हावी म्हणून राजानें श्रीहर्षाला बोलावणें पाठविलें आणि त्याप्रमाणें तो आलाही!

राजा डोळ्यांत प्राण आणून श्रीहर्षाची वाट पाहात होता! आतां तो फार थोड्या काळाचा सोबती होता. एखाद्या चातक पक्षाप्रमाणें पुत्राची वाट पाहणाऱ्या महाराजाधिराजाचें प्रेममय अंतःकरण पाहिल्यावर कोणाच्या हि भावना हेलावून जात!

शेवटीं श्रीहर्ष आला! त्यानें बापाला कडकडून मिठी मारली! स्वर्गीचें सुख हेंच असें जणूं प्रभाकरवर्धनाला वाटत होतें. आत्मा वै पुत्रनामासीत्।

अशी भारतीय संस्कृति ! तेव्हां या आत्म्याचें दर्शन, त्याची भेट घेण्यासाठींच प्रभाकरवर्धनाचें मन आसुसलेलें होतें. या भेटीनें त्याचें मन शांत झालें, सुखावलें. अंतःकरणामध्यें स्थिरता उत्पन्न झाली. आतां तो सुखानें मरण्यास सिध्द होता. पुत्रभेटीमुळें तशाहि त्या आजारांत थोडा उत्साह राजामध्यें निर्माण झाला.

आपल्या मुलाकडे पाहून तो म्हणाला, "तूं किती रे अशक्त दिसतोस !" त्याबरोबर भंडीनें उत्तर दिलें, "श्रीहर्षानें तीन दिवसांत जेवण घेतलेलें नाहीं." त्यावर प्रभाकरवर्धन म्हणाला, "माझ्याविषयीं तुझ्या अंतःकरणांत किती प्रेम आहे याची मला पूर्णपणें जाणीव आहे. अशा प्रकारच्या तुझ्या या प्रेमानें अत्यंत कठोर अंतःकरणाचा माणूससुद्धां विरघळून जाईल. हें जरी खरें असलें तरी तूं अशा प्रकारें स्वतःला त्रास करून घेतलास हें मात्र चांगलें नाहीं. ह्या तुझ्या नम्र व प्रेमळ कृत्यामुळें एखाद्या धारदार चाकूच्या जखमे-प्रमाणें माझें अंतःकरण विद्ध झालें आहे. तुझ्यावर तर माझें सारें यश, सुख व आनंद अवलंबून आहे. तेव्हां तूं आतां जेवण केल्याशिवाय मी पाण्याचा थेंबसुद्धां घेणार नाहीं."

पित्याच्या या प्रेमळ शब्दांनीं हर्षाचे डोळे पाणावले. आपण किती उदात्त व श्रेष्ठ कृपाछत्राखालीं वावरत आहोंत याची त्याला जाणीव झाली. पित्याच्या अकृत्रिम प्रेमाच्या अखंड झऱ्यांतून जितकें प्रेम चाखतां येईल तितकें चाखण्याची सारी धडपड श्रीहर्षाची चालली होती.

आणखी एक दिवस उलटला—प्रभाकरवर्धनाची स्थिति जास्तच चिंताजनक झाली. असाह्यतेनें त्याला आतां पूर्णपणें आपल्या कह्यांत घेतलें. त्रासानें त्याच्यावर आपलें जणूं अधिराज्यच स्थापन केलें. मृत्यूनें त्याच्याशीं एक दोन दिवसांसाठीं जणूं आस्यापास्याचा खेळ मांडला होता. प्रत्येक अवयव गलितगात्र होत होता. दैवानें हातचलाखी करण्यास सुरवात केली होती. शून्यानें त्याच्याभोंवतीं कडें केलें होतें. मृत्यु जीविताचें अखेरचें माप मोजीत दिवस भरल्याची ग्वाही देत होता.डोळे जड होऊन अनंतामध्यें विलीन होण्याची वाट पाहात होते; शतशः विदीर्ण झालेले ते विश्रांतीसाठीं धडपड करीत होते आणि श्वासोच्छ्वास मंदमंद होता.

ही सारी परिस्थिति शेजारींच बसलेली महाराणी यशोमती अत्यंत सूक्ष्मपणें अवलोकन करीत होती. राजाची क्षणाक्षणाला होत जाणारी कठीण अवस्था पाहून पुढील भावितव्याचें चित्र तिच्या मनापुढें उभें राहिलें. त्याबरोबर तिच्या अंगावर कांटा उभा राहिला. सारा जन्म सौभाग्यांत काढल्यावर उद्यां पांढरें कपाळ घेऊन मिरवूं! विधवा म्हणून राहूं !

छे—हें जमणार नाहीं ! सौभाग्य—अलंकार—मंडित वैभवानेंच मी मरणार ! हीच माझी इच्छा ! तिचें मन बोलत होतें ! एकीकडे शय्येवर पडलेल्या राजाकडे लक्ष तर दुसरीकडे मनाशीं द्वंद्व ! हा तिच्या जीवनांतील मोठाच समरप्रसंग होता !

ती तेथून उठली आणि अंतःपुरांत गेली. परंतु तिच्या मनांतील भावनांना तिला आवर घालतां आला नाहीं. तिनें अश्रूंना वाट मोकळी करून दिली. पण थोडा वेळच !

आणि ती निर्धारानें उठली ! निश्चयानें तिनें त्या पतीच्या मागून सती जाण्याचें ठरविलें ! धैर्याला तिला साथ देण्यावांचून गत्यंतरच नव्हतें आणि आश्चर्य हें अवाक्‌पणें नुसतें पहात राहिलें—

महाराणी यशोमती सती जाणार ! तिनें मनाशीं पक्का निश्चय केला. जगाच्या पुढें जणूं आदर्शवत् असणाऱ्या त्या स्त्रीनें त्या आदर्शांत आणखीनच भर घालण्याचें ठरविलें.

एका परिचारिकेनें ही बातमी श्रीहर्षास सांगितली. त्याबरोबर एखाद्या तापलेल्या सळईनें अंतःकरणावर डाग द्यावा, तें भाजून काढावें तसें श्रीहर्षाला झालें. आपल्या पित्याच्या शय्येपासून तो हळूंच उठला आणि तडक आईच्या महालाकडे जाण्यास निघाला.

तो महालांत आला आणि पाहतो तों आईनें सगळे दागिने उतरविले असून अग्नीमध्यें शिरण्याची निःशंकपणें ती तयारी करीत आहे असें त्याला दिसलें.

तें पाहून श्रीहर्षाला अक्षरशः रडूं कोसळलें. त्यानें आईच्या पायाला मिठी घातली, आणि तिची अत्यंत करुणपणें विनवणी केली, “ तूं मला एकट्याला या जगांत टाकून जाणार ? जरा दयाळू हो. मागें फिर. ”

त्याच्या त्या करुण विनवणीमुळें इतक्या वेळपर्यंत अत्यंत कठोरपणें मनाला घातलेला बांध ढासळला. आणि एखादी नदी प्रचंड धरणीकंपानें कांहीं काळ आपली दिशा बदलते त्याप्रमाणें त्याच्या करुण उद्गारानें तिच्या अंतःकरणामध्यें भावावेग उत्पन्न झाला आणि क्षणभर कठोरता पूर्णपणें वितळली. तिनें त्याला वर उठविलें आणि अत्यंत प्रेमानें हृदयाशीं धरुन त्याच्यावर प्रेमाश्रूंचें जणूं सिंचन केलें.

बराच वेळपर्यंत तिनें एखाद्या सामान्य स्त्रीप्रमाणें विलाप केला. आणि त्याला हृदयाशीं धरलेलें असतांनाच लहानपणापासून आतांपर्यंतचें त्याचें सारें जीवन तिच्यापुढें उभें राहिलें. त्याबरोबरच राज्यवर्धनाची आणि राज्यश्रीची आठवण झाली. राज्यवर्धनाची आणि आपली आतां भेट होणार नाहीं या कल्पनेनें तिला अधिकच हेलावल्यासारखें झालें. दुसऱ्या कोणत्याहि स्त्रीला असें दुःख झालें नसेल असेंच तिला वाटूं लागलें.

परंतु हा शोक तिनें आवरला आणि ती श्रीहर्षाला म्हणाली, " तुझ्यावर माझें प्रेम नाहीं, तुझें पुढील वैभव आणि पराक्रमी कृत्यें पाहण्याची माझी इच्छा नाहीं असें नाहीं. परंतु कर्तव्य फार कठोर असतें. कर्तव्याला चुकणारे लोक जगताला केव्हांही ललामभूत होत नसतात. आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी कीं मी कांहीं सामान्य कुळांतील स्त्री नव्हे. माझा जन्म फार मोठ्या घराण्यांत झाला आहे. त्या घराण्याला शोभेल, त्याची कीर्ति वाढेल आणि माझ्या पतीचीही कीर्ति वाढेल असेंच वागणें मला भाग आहे. परंतु ह्या गोष्टींपेक्षां एक महत्त्वाची गोष्ट आहे. हिंदु स्त्री ही नेहमीं अखंड सौभाग्याचीच इच्छा मनांत बाळगते. त्या सौभाग्यापुढें साऱ्या विश्वाचें अधिराज्य तुच्छ आहे असें तिला वाटतें. आणि मी तर त्याची सदैव भुकेली ! तेव्हां मला आधीं गेलेंच पाहिजे !

आणि हे हर्षा, वैधव्याची कल्पना मला सहनच होत नाहीं. त्या कल्पनेनें जणूं माझ्या काळजाचे तुकडे तुकडे होतील असें वाटतें. तेव्हां मी जाणार," यशोमतीनें पुन्हां आपलें मन कठोर केलें आणि ती म्हणूं लागली, " मी निश्चित जाणार. हें आतां त्रिकालाबाधित सत्य आहे. स्वर्गांत जाऊन तेथें पतीच्या आगमनाची वर्दी मी साऱ्या देवादिकांना देईन. आणि त्या ठिकाणीं पंचारती ओवाळण्यासाठीं सिद्ध राहीन. मी जर सती गेले नाहीं तर अनंत

जन्मांतील सौख्याला मी मुकेन. हे हर्षा, जगून जी अपकीर्ति पदरांत पडेल त्यापेक्षां माझ्या मरणानें मी कायमची अमर होईन. कारण श्रेष्ठांना अकीर्ति ही मरणाहून अधिक दुःखदायक आहे. ''

अशा प्रकारें आवेगानें बोलतां बोलतां ती धाड्दिशीं खालीं कोसळली. श्रीहर्षानें तिला ताबडतोब सांवरली आणि आतां या पुढें तिला तिच्या निश्चयापासून दूर करणें म्हणजे तिच्या मनाला हात घालणें होय आणि अधिकच दुःख देणें होय असें त्याला वाटलें. त्याबरोबरच त्याला तिच्या करारी स्वभावाचीहि जाणीव होती. निश्चयाचा जणूं महामेरू असलेली ती स्त्री आतां तसूंभरही ढळणार नाहीं असें जाणल्यावर श्रीहर्ष अत्यंत शांतपणें तिच्या पायाकडे पाहात स्वस्थ उभा राहिला.

थोड्याच वेळांत महाराणी राजाच्या शय्येपाशीं आली. तिथें तिनें त्याचें शेवटचें दर्शन घेतलें. प्रभाकरवर्धनानें शांतचित्तानें तिला निरोप दिला. आणि नंतर ती हातामध्यें पतीचें एक चित्र घेऊन निघाली. तिच्यासाठीं चंदनाची चिता सिद्ध करण्यांत आली होती. पायीं जाणाऱ्या आपल्या महाराणीकडे साऱ्या प्रजाजनांचें लक्ष लागून राहिलें होतें. त्या महासती, महासाध्वी, पवित्र व तेजोमय स्त्रीकडे पाहतां पाहतां सामान्यांना आपल्या जन्माचें सार्थक झाल्यासारखें वाटत होतें. थोरांचें दर्शन देवदुर्लभ असतें. आणि हें थोर स्वरूप आज चालत्या बोलत्या रूपानें दिव्य करण्यास निघालें होतें.

लोक यशोमतीवर फुलें उधळीत होते. परंतु यशोमतीचें सारें लक्ष पतीच्या चित्रावरच केंद्रित झालें होतें. तिच्या पदकमलांची धूळ, तिचे चरणरज आपल्या मस्तकावर पडावेत म्हणून लोक वांकून नमस्कार करीत होते आणि त्यामुळें रस्त्यामध्यें अतोनात गर्दी झाली होती. या गर्दीमधून वाट काढीत काढीत ती महासती चंदनाच्या चितेजवळ येऊन पोहोंचली. तेथें तर हजारोंनीं लोक जमले होते ! तो पवित्र समारंभ पाहण्यासाठीं ! आपल्या महाराणीचें, आवडत्या राणीचें अखेरचें दर्शन घेण्यासाठीं !

तिनें अग्नीची यथासांग पूजा केली ! अग्नीला नमस्कार केला ! जमलेल्या प्रजाजनांना नमस्कार केला ! आपल्या पुत्राकडे एक प्रेमपूर्ण दृष्टिक्षेप टाकला !!

श्रीहर्षानें मातेला वांकून नमस्कार केला आणि यशोमती चितेवर चढली.

आपली माता–आई–डोळ्यांदेखत भस्मीभूत होणार हें पाहून त्याला दुःखाचा आवेग सहन होईना. त्यानें अश्रूंना वाट दिली.

तो शोकावेग पाहून इतरांचेहि डोळे पाणावले. परंतु यशोमती मोठ्या आनंदानें चितेवर चढली होती. तिच्या मुद्रेवर लोकविलक्षण तेज दृष्टीस पडत होतें. त्या ठिकाणीं दुःखाची यत्किंचितहि छटा नव्हती. तेजःपुंज दिसणारा तिचा चेहरा पावित्र्यानें अधिकच उजळून दिसत होता.

आणि इतक्यांत धड धड करीत चितेनें पेट घेतला. साक्षात् लक्ष्मीच्या रूपानें अवतरलेल्या यशोमतीला अग्नीनें तिच्या रती–तिलोत्तमेच्या सौंदर्या-सकट भस्म करण्यास सुरवात केली. तिच्या चंद्रासारख्या सौम्य व शांत दिसणाऱ्या मुखावरून जेव्हां अग्नीच्या ज्वाळा जाऊं लागल्या तेव्हां त्यांच्याहि दाहकतेला सौम्याचा आणि शीतलतेचा स्पर्श जाणविल्याशिवाय राहिला नाहीं.

आसिंधुसिंधुपर्यंत, हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या या भारत देशांत कुंतीच्या, द्रौपदीच्या, सीतेच्या जोडीला बसण्याइतकें दिव्य सामर्थ्य यशोमतीनें प्रकट केलें. भारतीय संस्कृतीचा स्त्रीचा आदर्श म्हणून शोभेल एवढें महान् अग्निदिव्य तिनें केलें. आहिल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी यांच्याच पंक्तीला बसण्याचा मान तिनें मिळविला. हिंदू स्त्रीचा एक परमोच्च असा आदर्श जर कोठें पहावयाचा असेल तर तो यशोमतीच्या ठिकाणींच ! साऱ्या जगानें अत्यंत लीनभावानें वंदन करून तिच्या चरणरजाची अपेक्षा करावी एवढें सामर्थ्य आणि एवढी पवित्रता तिनें दाखविली ! हेंच आर्यत्व ! हेंच श्रेष्ठत्व !

कांहीं दिवस गेले. राजाचे डोळे हळू हळू मिटत चालले होते. श्रीहर्षानें प्रभाकरवर्धनाची प्रकृति पाहण्याकरितां पुनर्वसूंच्या घराण्यांतील रसायन नांवाच्या एका अत्यंत विख्यात व शास्त्रपारंगत वैद्याची जातीनें नेमणूक केली होती. तो राजाकडे अतिशय काळजीपूर्वक लक्ष देत असे. त्याचें वय अवघें अठरा वर्षांचें होतें. परंतु आपल्या असामान्य बुद्धीच्या जोरावर लहानपणींच अष्टांग आयुर्वेदाचा त्यानें सांगोपांग अभ्यास करून त्यांत एवढी पारंगतता मिळविली होती कीं सबंध स्थानेश्वरमध्यें त्याच्या हाताशीं स्पर्धा करणारा एकहि वैद्य नव्हता.

आणि आपल्या अतीव बुद्धिसामर्थ्याचा उपयोग करूनहि प्रभाकरवर्धनाचा मृत्यु जवळ आला आहे असें पाहिल्यावर व श्रीहर्षानें त्यासंबंधीं निश्चित काय

तें विचारल्यावर त्यानें अत्यंत स्पष्टपणें प्रभाकरवर्धन दोन दिवस जगेल असें सांगितलें व तो पुढील औषधाच्या व्यवस्थेला लागला.

दोन दिवसांनीं प्रभाकरवर्धनानें श्रीहर्षाला जवळ बोलावलें आणि अत्यंत क्षीण झालेल्या आवाजानें तो श्रीहर्षाला म्हणाला, " कोणत्याहि परिस्थितींत तुला गलितधैर्य होण्याचें कारण नाहीं. आत्मविश्वासाचा महामंत्र तूं आतां मोठ्या प्रमाणांत शिकावयास हवा. " उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत " हाच तो महामंत्र होय. याचा विसर पडूं देऊं नको ! तूं खरोखर माझ्या वंशाचा दिवा आहेस. तो आपल्या स्वतःच्या प्रकाशानें उजळून निघावा, त्याची दीप्ति आसमंतांत पसरून साऱ्या दशदिशा प्रकाशित व्हाव्यात अशी माझी तळमळ आहे. तूं सिंहाचा छावा आहेस हें ध्यानांत घे. आपल्या सामर्थ्यानें तूं जगाचे डोळे दिपवशील अशी मला आशा आहे.

त्याचप्रमाणें दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे थोरल्या भावाच्या आज्ञेंत वाग. त्याच्या आज्ञेचें उल्लंघन करूं नकोस. सदैव त्याच्या चित्ताला समाधान दे. त्याला ज्याप्रमाणें समाधान देशील त्याचप्रमाणें प्रजाजनांनाहि तुझ्या अंतःकरणांत सदैव स्थान असूं देत. त्यामुळेंच तुझें कल्याण होणार आहे. शेवटीं एवढेंच सांगावयाचें आहे कीं तूं इंद्रियजित हो. कोठल्याहि प्रकारच्या विकाराला बळी पडूं नकोस. बस्स—इतकेंच—"

आणि एवढें एका दमांत बोलल्यामुळें प्रभाकरवर्धनाला अतिशय दम लागला. परंतु अंतःकरणांतील भाव श्रीहर्षाच्या पुढें उघडे केले, त्याला चार शब्द सांगितले या भावनेमुळें त्याला एक प्रकारचा आनंद झाला आणि त्या आनंदाच्या गुंगींतच प्रभाकरवर्धनानें प्राण सोडले.

आई वडिलांच्या सुखाला आंचवलेला श्रीहर्ष अत्यंत उदासवाणा वागूं लागला. त्याला कशांतच गोडी वाटेना. मातापितरांचें कृपाछत्र गमाविल्यानंतर तिन्हीं जगांचें स्वामित्वहि त्याला फिकें वाटूं लागलें. अशाप्रकारच्या विषण्ण मनस्थितींत दिवस जात होते. श्रीहर्ष आतां राज्यवर्धनाची वाट पाहात होता. दुःखामध्यें वाटेकरी असला म्हणजे दुःख हलकें होतें आणि म्हणूनच राज्यवर्धन जितक्या लवकर राजधानीस परत येईल तितकें बरें असें श्रीहर्षाला वाटत होतें !

• • •

## ७. खून-खून-

श्रीहर्ष आपल्या वडिलांच्या मंत्र्यांच्या सल्ल्यानें राज्यकारभार चालवीत होता. पण त्याचें सारें लक्ष राज्यवर्धनाकडे लागलें होतें. इकडे हूणांचा बंदोबस्त करून राज्यवर्धन पुन्हां राजधानीस येण्यास निघालाहि होता. आपल्या वडिलांच्या मृत्यूची व आई सती गेल्याची बातमी त्याला कळली होती. आणि यामुळेंच केव्हां एकदां राजधानीला परत येतो आणि श्रीहर्षाची भेट घेतो असें त्याला झालें होतें. हूणांचा प्रचंड पराभव करून त्यांना जेरीस आणून त्यांची चांगली खोड मोडली या एका आनंदांत तो होता तर मातापित्यांची शेवटची भेटहि होऊं शकली नाहीं या गोष्टीमुळें त्याच्या अंतःकरणामध्यें शोकाचा नुसता कोलाहल माजला होता.

अशा मनःस्थितींत राज्यवर्धन ठाणेश्वरास परत आला. त्याचें स्वतःच्या कपड्यांकडे, शरीराकडे किंवा दुसऱ्या कशाकडे लक्षच नव्हतें. त्याचें सर्व शरीर धुळीनें माखलेलें होतें. ठिकठिकाणीं शरीरावर झालेल्या बाणांच्या जखमा बांधल्यामुळें विचित्रपणांत आणखीनच भर पडलेली होती. त्याची कारुण्यपूर्ण व उद्वेगपूर्ण दृष्टि पाहून शहरांतील प्रजाजनांचीं अंतःकरणें विद्ध झालीं. त्या पराक्रमी राजपुत्राचें स्वागत त्यांनींहि व्यथित व जड अशा अंतःकरणानेंच केलें.

राज्यवर्धन राजवाड्यांत आल्याबरोबर श्रीहर्ष धांवत त्याच्याजवळ गेला. आपला परमप्रिय भाऊ पाहतांच इतक्या दिवसांचा उदासपणा पार निघून



**राज्यवर्धन राजवाड्यांत आल्याबरोबर श्रीहर्ष धांवत त्याच्याजवळ गेला.**

गेला आणि त्यानें त्याला कडकडून मिठी मारली; आणि इतके दिवस आटलेले दोघांचेहि अश्रु एखाद्या गुप्त झऱ्यांतून पाणी यावें तसें खळखळत बाहेर पडले. दोघेहि एकमेकांच्या गळां पडून मातापित्यांची छाया गेली म्हणून रडत होते. तें दृश्य पाहून सारे सरदार व मंत्रि दुःखित झाले. त्या करूण दृश्यानें सर्वांचीं अंतःकरणें हेलावून गेलीं.

परंतु राज्यवर्धनानें आपला शोक आवरला. अशा प्रकारें आपण जास्त शोकमग्न झालों तर मोठी चमत्कारिक परिस्थिति ओढवेल याची त्याला कल्पना आली आणि म्हणूनच तो हर्षाला म्हणाला, "कांहीं झालें तरी आपण आपला शोक आवरलाच पाहिजे. अशा प्रकारें जास्त शोक हा भित्रेपणाला कारणीभूत झाल्याशिवाय राहाणार नाहीं. रघूनें दिलीप गेल्यावर जसा शोक आवरला तसें आपल्यालाहि केलें पाहिजे. दुष्यंताच्या स्वर्गवासा-

अनुक्रम २९४९७ दि: ... २२
क्रमांक ... नों: दि: ...

नंतर भरतानें संयमानें मनाला अडसर घालून ज्याप्रमाणें पुढें पाऊल टाकलें त्याप्रमाणेंच आपणहि पुढें गेलें पाहिजे. एवढेंच काय पण दशरथ गेल्यावर श्रीरामांना काय दुःख झालें नसेल ? पण संयम हा चिरस्थायी उपयोगी ठरतो म्हणून दुःख आवरणें हेंच योग्य !"

अशा प्रकारें दुःखाला आवर घालत असतांना राज्यवर्धनाच्या डोळ्यांतील पाण्याचे पाट मात्र कांहीं आटत नव्हते. तो उदास झाला होता. खिन्नतेनें त्याला ग्रासून टाकलें होतें. तो भव्य राजवाडा आईवडिलांच्या शिवाय जणू भकास तुरुंगासारखा त्याला वाटत होता. ह्या नरकांत राहण्यापेक्षां आपण एखाद्या अरण्यांत जाऊन झोपडी बांधून राहावें व त्या ठिकाणीं आनंदानें कालक्रमणा करावी अशी त्याच्या मनानें उचल खाल्ली आणि श्रीहर्षाला ही आपली मनःस्थिति सांगून तो त्याला म्हणाला, " माझ्या हातून तूं ह्या परंपरागत, श्रेष्ठ व वैभवशाली राज्याचा स्वीकार कर व ह्या पदावर बैस. तूं जर ह्या जबाबदारींतून मला मुक्त करशील तर मला अत्यंत आनंद होईल. आतां खरोखरच राज्य, लढाया या सर्वांचा वीट आला आहे. बुध्दाप्रमाणें विरक्त व्हावें असें मला वाटतें."

या भाषणामुळें श्रीहर्षाचें अंतःकरण विदीर्ण झालें. अशा प्रकारें बोलून हा आपली परीक्षा पाहतो असेंच त्याला वाटलें. श्रीहर्ष त्याला म्हणाला, "तुझ्या मनगटांत इतकें प्रचंड सामर्थ्य असतांना, आणि तूंच ह्या राज्याचा आतां वास्तविक अधिकारी असतांना तूं ह्या सर्वांचा त्याग करावा हें कितपत उचित ठरेल ? मला तर......"

श्रीहर्ष एवढें बोलत असतांनाच राज्यश्रीचा संवाहक नांवाचा एक दूत त्या ठिकाणीं आला. पण तो तेथें नुसता उभाच राहिला. त्याच्या तोंडून शब्द फुटेना. राज्यवर्धन म्हणाला, " संवाहका, काय बातमी आहे ? बोल." शेवटीं तो म्हणाला, " महाराजाधिराज प्रभाकरवर्धन गेल्याची संधि साधून व तुमच्यापैकीं येथें कोणी नाहीं हें पाहून कनोजवर मालवराज गुप्तानें स्वारी केली. अत्यंत अमानुषपणें त्यानें राजे गृहवर्मा यांचा वध केला आणि राज्यश्रीला त्यांनीं कैदेंत टाकलें. आतां तो ठाणेश्वरावर स्वारी करण्याच्या विचारांत आहे !"

संवाहकाच्या ह्या बातमीमुळें राज्यवर्धनाच्या आणि श्रीहर्षाच्या संवादांत

खंड पडला आणि राज्यवर्धनाचे मघाचे विचारहि लुप्त झाले. त्यांच्या विचारांना आतां एक नवीनच वळण लागलें. आपल्या सोन्यासारख्या लाडक्या बहिणीला विधवा करून कैदेंत टाकलें ही बातमीच इतकी भयंकर होती कीं दोघेहि भाऊ अत्यंत संतप्त झाले. राज्यवर्धन तर संतापानें अतिशय लाल झाला. तो श्रीहर्षाला म्हणाला, " या खुनाचा सूड घेतलाच पाहिजे. माळव्याच्या राजांना पूर्णपणें धुळीस मिळविल्याशिवाय मला बरें वाटणार नाहीं. पुष्यभूतीच्या वंशाला नेस्तनाबूत करून टाकूं अशी त्यांना घमेंड आहे. त्यांचा पूर्ण नक्षा उतरविल्याशिवाय माझ्या अंतःकरणाला शांति लाभणार नाहीं. " आणि त्यानें पडघमवर टिपरी टाकण्यास सैनिकाला हुकूमहि दिला---

माळव्यांतील गुप्तांचें व कनोजच्या मौखरी घराण्याचें पिढीजात शत्रुत्व होतें. देवगुप्त तर गृहवर्म्याला खाऊं कीं गिळूं असें करीत होता आणि त्याला तशी संधीहि मिळाली. इतक्या दिवस प्रभाकरवर्धनाची व राज्यवर्धनाची त्याला भीति वाटत असे. पण प्रभाकरवर्धन वारल्यामुळें आणि राज्यवर्धन पंजाबकडे स्वारीवर गेलेला आहे हें पाहून त्यानें गृहवर्म्यावर बरोबर सूड उगविला.

या सूडाचा सूड घेण्याचीच राज्यवर्धनाची मनीषा होती आणि त्यामुळेंच राज्य सोडून देण्याची व विरक्ततेची भाषा नाहींशी झाली. पराक्रमाचें रक्त पुन्हां त्याच्या धमन्यांतून सळसळूं लागलें. तेजाचा सात्त्विक अहंकार पुनरपि जागृत होऊन शत्रूचे बळी घेण्यास सिद्ध झाला ! यामध्यें आणखी भर म्हणूनच कीं काय देवगुप्ताला बंगालच्या शशांक राजानें सहाय्य केलें आहे हें राज्यवर्धनाला कळलें आणि तो अधिकच संतप्त झाला. या साऱ्या गोष्टींचा शेवट काय होणार याची त्याला कांहींच कल्पना येईना. पण त्यानें स्वारीवर जाण्याची जोराची तयारी सुरू केली.

त्याच वेळेस श्रीहर्ष त्याला म्हणाला, " मीहि तुझ्याबरोबर येतो." परंतु राज्यवर्धनानें त्याचें म्हणणें नाकारलें. त्याबरोबर श्रीहर्ष उसळून म्हणाला, " माझ्या येण्यानें तुला कोणता अडथळा येणार आहे ? उलट मी तुझें एखाद्या पिंजऱ्याप्रमाणें रक्षण करीन. तुझ्याबरोबर कष्ट करीन. तूं जर असें म्हणशील कीं लढाईंतील कष्ट जास्त असतात तर मग माझ्या दृष्टीनें मी लढाईला न येण्यानेंच मला अति कष्ट होतील. एखाद्या स्त्रीप्रमाणें घरीं बसणें मला बिलकूल पसंत नाहीं. राज्यश्रीला कारागृहांतून सोडवून आणून गृहवर्म्याच्या

खुनाचा सूड तूं घेत असतांना मी त्यांत सहभागी व्हावें असेंच मला वाटतें. माझ्यावरील बंधुप्रेमानें जर तूं मला घरीं बस म्हणत असशील तर तो भित्रेपणा होईल. तेव्हां तूं थोडा उदार हो आणि मला तुझ्याबरोबर घेऊन चल."

परंतु राज्यवर्धन श्रीहर्षाला नेण्यास तयार होईना. आपल्यामागें ठाणेश्वराला कोणीतरी जबाबदार माणूस पाहिजेच अशी त्याची ठाम समजूत होती, आणि म्हणूनच मी लढाईला गेल्यावर तूं राजधानींत राहून इतर सर्व गोष्टी नीटपणें चालव आणि सगळीकडे काळजीपूर्वक लक्ष दे म्हणून राज्यवर्धनानें त्याला सांगितलें आणि तो लढाईवर निघाला.

राज्यवर्धनाचा मामेभाऊ भंडी हा दहा बारा हजारांच्या सैन्याचा सेनापति होता. लहानपणापासून भंडी त्याच्याबरोबर खेळला असल्यामुळें त्याच्याबद्दल राज्यवर्धनाला पूर्ण खात्री व विश्वास होता. असल्या कसलेल्या सेनापतीच्या व आत्मविश्वाससंपन्न सैन्याच्या जोरावर राज्यवर्धन माळव्याच्या देवगुप्तावर घसरला.

देवगुप्ताला त्याची बातमी होती. तो या लढाईस सिद्धहि होता. परंतु राज्यवर्धनापुढें त्याचा पाड लागला नाहीं. आगींत पतंगानें जळावें त्याप्रमाणें तो नष्ट झाला. देवगुप्त लढाईत मारला गेल्यामुळें व त्याचा पूर्ण पराभव झाल्यानें आपल्या मेव्हण्याच्या वधाचा सूड घेतल्याचें त्याला समाधान लाभलें. परंतु हें समाधान एक तृतीयांश इतकेंच होतें कारण उरलेलें दोन तृतीयांश काम म्हणजे शशांकाचा पराभव व राज्यश्रीची सुटका हें राहिलेंच होतें.

राज्यवर्धनानें आपला मोर्चा आतां तिकडे वळविला. शशांक त्यावेळीं कनोजजवळ होता. देवगुप्ताची स्थिति कळल्यावर शशांकाला धडकीच भरली. राज्यवर्धनाच्या प्रचंड सैन्यापुढें आपला टिकाव लागणार नाहीं, आपण पूर्ण धुळीस मिळूं ह्याबद्दल त्याची पक्की खात्री झाली आणि तो विचार करूं लागला. लढाई कशी जिंकावी ? सामना देणें म्हणजे यमराजाची वाटचाल होती; प्रत्यक्ष मृत्यूला आपणहून मिठी मारण्यासारखें होतें. हें धाडस अर्थातच शशांकाच्या अंगांत नव्हतें. त्याचें डोकें विचारांच्या भोवऱ्यांत अडकलें.

हं ! सुचलें ! असेंच करावें–बस्स ठरलें ! राज्यवर्धनाला कपटानें मारावें. अशा प्रकारें त्याला मारल्याशिवाय गत्यंतर नाहीं. कपटनीतीचा अवलंब त्यानें केला आणि राज्यवर्धनाशीं वरकरणी समेटाचें बोलणें लावण्याचें ठरलें.

राज्यवर्धन त्याच्यावर येऊन धडकला. त्यानें कनोजच्या अलिकडेच कांहीं मैल आपला तळ ठोकला. त्या तळावर दुसऱ्याच दिवशीं शशांकाचे हस्तक राज्यवर्धनाशीं बोलणें करण्यास आले. त्यांच्या गोड बोलण्याला, नम्रतेला आणि मवाळपणाला राज्यवर्धन बळी पडला.

वरकरणी ते सारखे दाखवीत होते कीं शशांक फार घाबरला आहे. त्यांनीं राज्यवर्धनाला सांगितलें कीं, महाराज म्हणतात, " कृत अपराधाची क्षमा करावी. मला त्यावेळेस पोंच राहिला नाहीं आणि त्यामुळें माझ्या हातून चूक घडली. आपण फार उदार आहांत ! क्षमा ही आपली दासी आहे. तेव्हां आपण मजवर कृपा करावी. हा दास आपल्या पायाचा दास होण्यास केव्हांही तयार आहे. आपल्या क्षमेवरच मी जगणार आहे. माझी सुंदर मुलगी मी प्रायश्चित्तादाखल आपणांस देण्यास तयार आहे. तेव्हां मज गारिबावर दया व्हावी." शशांकाच्या हस्तकांनीं अशा प्रकारें निरनिराळ्या नम्र गोष्टी सांगून राज्यवर्धनाचें मन भारून टाकलें आणि शेवटीं शशांकाच्या वतीनें त्यांनीं त्याला दुसऱ्या दिवशींच्या जेवणाचें आमंत्रण दिलें; आणि राज्यवर्धनानेंहि तें मोठ्या आनंदानें स्वीकारलें.

" दुर्जनः प्रियवादीति नैतद्विश्वासकारणम् । मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलम् ॥ " हा न्याय राज्यवर्धनाच्या ध्यानीं आला नाहीं. अविश्वासास पात्र असलेल्या शशांकाच्या गोड गोड बोलण्यानें तो शेवटीं फसला आणि हलाहलाच्या महाभयंकर विषांत पूर्णपणें बुडून जाऊन भस्म झाला !

दुसऱ्या दिवशीं राज्यवर्धन आपल्या छावणींतून मोठ्या आनंदांत निघाला. आपल्या कार्याचा दुसरा टप्पा आपण गांठला ह्याच भ्रमांत तो होता. राज्यश्रीचीहि सुटका होईल आणि मग सारेंच सुरळीत चालेल या हवेंतील किल्ल्यावर तो तरंगत होता. पण शेवटीं तो हवेंतील किल्लाच ठरला. शशांकाच्या मानभावी बोलण्यावर सरळ आणि भाबड्या राज्यवर्धनानें विश्वास ठेवावा यांत कोणतेंच आश्चर्य नव्हतें ! त्याला अजून जगाचा पूर्ण अनुभव नव्हता ! अशावेळीं तो या संकटांत सांपडला. राज्यवर्धनानें निघतांना शस्त्रेंहि हातीं घेतलीं नव्हतीं. निःशस्त्र होऊन एखाद्या मित्राच्या भेटीला जावें त्याप्रमाणें तो शत्रूच्या भेटीला—नव्हे काळाच्याच भेटीला गेला.

" मातुलो यस्य कृष्णश्च, पिता यस्य धनंजयः । अभिमन्योर्गतः प्राण :

कालस्य कुटिला गतिः" ह्याप्रमाणेंच राज्यवर्धनाची स्थिति झाली. त्याचें घराणें, वंशज, वडील श्रेष्ठ असूनहि अभिमन्यूप्रमाणें तो काळाच्या जबड्यांत जाऊन धडकला !

शशांकानें राज्यवर्धनाचें हंसून स्वागत केलें. त्याची बडदास्त उत्तम प्रकारें ठेवली आणि जेवण्याच्या वेळेपर्यंत त्यांनीं समेटाचा बराच खल केला. त्याच्या मधुर व गोड बोलण्यानें राज्यवर्धन फारच खूष झाला.



**आणि जेवण्याच्या वेळीं शशांकानें इषारा करतांच मारेकऱ्यांनीं राज्यवर्धनाचा खून केला.**

बराच वेळ गेल्यावर सर्व लोक जेवावयास बसले. शशांकानें मारेकरी आधींच तयार करून ठेवले होते. जेवणाच्या वेळीं त्यानें इषारा करतांच ते मारेकरी त्या ठिकाणीं धांवत आले आणि त्यांनीं राज्यवर्धनाचा खून केला. त्याला प्रतिकाराला सवड मिळाली नाहीं कीं प्रतिकार करतांहि आला नाहीं. निःशस्त्रपणें शशांकावर विश्वास ठेवून आलेल्या राज्यवर्धनाचा अत्यंत धूर्तपणें व पध्दतशीर रीतीनें शशांकानें कांटा काढला.

भंडी इकडे राज्यवर्धनाची वाट पाहात होता. परंतु आतां त्यांची भेट होणार नव्हती. शशांकानें अशा प्रकारें राज्यवर्धनाचा कांटा काढला खरा; परंतु भंडीबरोबरहि युद्ध खेळण्याचें त्याचें धैर्य होईना. राज्यवर्धनाच्या खुनाची बातमी त्याला कळली तर आपली धडगत नाहीं ह्याची त्याला पुरेपूर खात्री होती. भंडी हा कसलेला सेनापति आहे, त्याच्यापुढें आपण म्हणजे सूर्यापुढें काजवा आहोंत याची त्याला जाणीव होती आणि म्हणूनच त्यानें भंडीला तोंड दिलें नाहीं. ताबडतोब सर्व सैन्याची आवराआवर करून त्यानें गाजावाजा न करतां राज्यश्रीला कारागृहांतून बाहेर काढलें आणि भंडीला हुलकाविण्याकरितां तिची दूर रवानगी करून दिली व आपण दुसऱ्याच वाटेनें निघून गेला.

राज्यश्रीला कारागृहाबाहेर काढल्यावर तिची मोठी शोचनीय परिस्थिति झाली. राजवाड्यांत आनंदांत राहावें, सर्व तऱ्हेचीं सुखें अनुभवावींत आणि मोठ्या आनंदानें कालक्रमणा करावी अशी वास्तविक तिची स्थिति ! परंतु तिच्या हातांपायांत बेड्या ठोकल्या गेल्या ! सौभाग्यानें पाठ फिरविली ! आणि दैवानें, सूड उगविण्याचाच जणूं निश्चय केला. राज्यश्रीनें या सर्व संकटांना धीरानें तोंड देण्याचा निश्चय केला. परंतु तो वारंवार ढांसळला. तिचा स्वतःवरचा विश्वास उडाला आणि अशा स्थितींतच तिचा प्रवास सुरू झाला.

इकडे राज्यवर्धनाच्या खुनाची बातमी श्रीहर्षाला कळल्यावर त्याच्यावर अक्षरशः दुःखाचा डोंगर कोसळला. " विनाशकाले विपरीतबुद्धिः ! " असें होऊन भाऊ मरण पावला. पण एवढें एकच संकट श्रीहर्षाला खचाविण्यास खात्रितच कारण नव्हतें. एकामागें एक अशा संकटाच्या आणि विपत्तीच्या गोष्टी सारख्या त्याच्यावर जणूं चाल करून येत होत्या. आणि एकदां विपत्ति मनुष्यावर येऊं लागल्या म्हणजे त्या जशा एकट्या दुकट्या न येतां अनंत येतात तशाच त्या क्रमशः खंडित होऊन काल जाऊं न देतां अत्यंत गतिमान

पध्दतीनें मनुष्यावर येऊन धडकतात व माणसाला, एखाद्या प्रचंड हत्तीनें आपल्या संपूर्ण बळानें धडका दिलेल्या दरवाज्याप्रमाणें, पूर्ण खिळखिळा करून टाकतात. आई वडिलांच्या मृत्यूनें व्यथित झालेल्या श्रीहर्षाच्या अंतःकरणावरील जखम अजून सुकलीहि नव्हती—तोंच त्याच्या लाडक्या बहिणीच्या नवऱ्याचा खून झाला आणि ती कैदेंत पडली. त्यामुळें जखमेंतून भळाभळा रक्त वाहूं लागलें. आणि आतां थोरल्या भावाच्या मृत्यूनें तर अंतःकरणाचे शतशः तुकडे झाले. अंतःकरणांत दुःखाचा डोंब उसळला. पंधराव्या वर्षी हीं सारीं दुःखें सहन करण्याची शक्ति श्रीहर्षाला पूर्णपणें आली नव्हती.

आणि आतां तर सबंध राज्याची जबाबदारी त्याच्यावर येऊन पडली. भाऊ गेल्यानें शत्रू उचल खाणार याची त्याला जाणीव होती. परंतु या सर्व संकटांवर त्यानें मात करण्याचें टरविलें. तो मोठा हुषार होता. त्याची बुद्धि कुशाग्र होती. त्याच्या अंतःकरणामध्यें विश्वासाची, धैर्याची, आत्मसामर्थ्याची ज्योत तेवत होती. कोटल्याहि परिस्थितींतून आपण वाट काढूं अशी त्याला खात्री होती आणि राज्याचें संरक्षण करूं शकूं अशी त्याची उमेद होती.

श्रीहर्ष १६ व्या वर्षी गादीवर आला. त्यावेळीं त्याचा अनुभव तो किती असणार ? व्यवहार हा कांहीं कोणाचा दास नाहीं. तो अनुभवानें हस्तगत करावा लागतो. राज्यांतील जुने, अनुभवी व वृद्ध लोक व्यवहारानें परिपूर्ण असतात. त्यांचा सल्ला आपण घेतल्यास आपला मार्ग सुकर होईल ह्याची कल्पना श्रीहर्षाला आली. यासाटींच त्यानें सिंहनाद सेनापतीला जवळ केलें.

श्रीहर्षानें ज्याच्या सल्ल्याची निवड केली तो खरोखरच एक उत्तम पुरुष होता. सिंहनाद हा प्रभाकरवर्धनाचा एकनिष्ठ सेवक असून तो त्याच्या मर्जीतला जणूं एक मित्र होता. जरी त्याचे केस पांढरे झाले होते, शरीरावर वृद्धपणाची झांक मारीत होती आणि डोळे खोल गेले होते तरी पण त्याचा रुबाब कायम होता. त्याच्या शरीरांत ताठपणा शिल्लक होता. डोळ्यांतील भेदकता इतरांना खालीं पाहण्यास लावीत होती. कपाळाची भव्यता बुद्धीची चमक दाखवीत होती. गालांवरील सुरकुत्या वृद्धपणांतील ज्ञानाच्या झांकींत भरच टाकीत होत्या. मिशांच्या उग्रपणांत सेनापतीची श्रेष्ठता चमकून उठत होती आणि ओठांवरील हास्यांत श्रीहर्षावरील म्हणजेच पर्यायानें राज्यावरील निष्ठेची पराकाष्ठा सतत रेंगाळत होती. त्याच्या पांढऱ्या शुभ्र दाढीमुळें

व भरदार पोषाखामुळें त्याच्या व्यक्तिमत्त्वांत असामान्य भर पडली होती. त्याचा आवाज खरोखर त्याच्या नांवासारखा होता. हजारों तरुणांना लढाई-मध्यें उत्तेजन देणारा तो सिंहासारखा आवाज म्हणजे त्याच्या वैशिष्ट्याचा एक पैलू होता. भरदार छाती, अजस्र बाहु आणि भरलेले खांदे म्हातारपणींहि तारुण्याची साक्ष देत खडे उभे होते. शरीरावर निरनिराळ्या ठिकाणीं झालेल्या जखमा त्याच्या शौर्याची, धैर्याची, पराक्रमाची व सामर्थ्याची साक्ष मुलुख-इ-मैदानसारख्या तोफेप्रमाणें गर्जून सांगत होत्या. एकाच वाक्यांत म्हणजे सिंहनाद हा सिंहनाद होता. हर्षाचा सेनापति त्यानेंच शोभावें! इतरांचें तें कामच नव्हतें.

श्रीहर्षाला त्याच्या सल्ल्याचा अतिशय उपयोग झाला. तो म्हणाला, " हे राजाधिराज, आपण घाबरण्याचें कांहींच कारण नाहीं. शौर्य आणि धैर्य हेंच वीर पुरुषांचे नेहमीं साहाय्यक असतात. सावध राहणें हें आपलें काम आहे. अतिलोभी मथुरेचा राजा बृहद्रथ हा कृष्णपक्षांतील रात्रीं निधि खणत असतां विदूरथाच्या सैनिकांनीं खड्गांनीं त्याचा वध केला. उज्जयिनीचा राजा महासेन याचे सैनिकांनीं गजवनांत हत्तीस धांवण्याच्या नादीं लावून कृत्रिम गजेन्द्रांतून निघून वत्सराजास पकडलें. मित्रदेवानें नृत्यप्रिय अग्नि-मित्राचा मुलगा सुमित्र याचा रंगपटांत बसून शिरच्छेद केला. ह्या साऱ्या गोष्टी राजा, तुला माहित आहेत. एवढेंच काय पण अश्मकेश्वर शरभ हा वीणा-वाद्यप्रिय असल्यामुळें शत्रूंनीं तंबोऱ्यांत तलवारी ठेवून गवयांचे वेष घेऊन त्यास मारलें हें सर्वश्रुत नाहीं कां? आणि राज्यवर्धनाबद्दल मी सांगण्याचें कांहींच कारण नाहीं. तेव्हां राजा, सावध रहा हाच माझा उपदेश आहे. आतां या राज्याचा, आमचा व सर्वांचा तूं आधार आहेस. तेव्हां शांतचित्त होऊन तूं सर्वांचें रक्षण कर."

सिंहनादाच्या ह्या उपदेशामुळें श्रीहर्षाला बरें वाटलें. त्यानें मनाशीं एक निश्चय केला आणि तो सेनापतीस म्हणाला, " आपला उपदेश हा अनुभवांच्या कसोटीवर घांसलेला असल्यामुळें तो अधिक मोलाचा आहे. येवढेंच नव्हे तर आपल्या बुद्धीच्या प्रखरतेमुळें त्याला एक प्रकारचें महत्त्व आणि वैशिष्ट्यहि प्राप्त झालें आहे. आपल्या उपदेशाची मी वारंवार आठवण

ठेवीन. त्याचप्रमाणें मी कृतनिश्चय केला आहे कीं मी अत्यंत त्वरेनें शशांकाचा नाश करीन आणि ही सर्व भूमि स्वतंत्र करीन. ”

या प्रमाणें प्रतिज्ञा केल्यावर श्रीहर्षानें अवंती नांवाच्या आपल्या युद्ध व शांतता खात्याच्या मंत्र्याला युद्धाच्या पुढील सर्व तयारींसंबंधीं सूचना देण्यास सुरवात केली. जिकडे तिकडे दिग्विजयाची तयारी सुरू झाली आणि युद्धाच्या रणदुंदुभी वाजूं लागल्या !

● ● ●

## ८. दिग्विजय

युद्धाची तयारी जोरांत चालूं झाली, आणि श्रीहर्षहि प्रत्येक गोष्टीचा वेगानें विचार करण्यांत गढून गेला. दिग्विजयाची सारी आंखणी करतांना त्याचें मन मात्र एका निराळयाच गोष्टीकडे लागलें होतें. ती गोष्ट म्हणजे राज्यश्रीचें काय झालें ? बंदीवासांतून तिला कोठें नेलें ? परंतु माहिती-अभावीं नुसता विचार करणेंच त्याला भाग होतें.

युद्धाच्या प्रत्येक गोष्टीकडे त्यानें इतक्या बारकाईनें लक्ष पुरविलें कीं त्यांतच त्याच्या यशाचें गमक सांठविलें आहे असें वाटावें. निरनिराळ्या प्रकारचें सैन्य जमवून त्याची वर्गवारी त्यानें अतिशय उत्कृष्ट रीतीनें लावली. हत्ती, रथ, घोडेस्वार व पायदळ यांच्या भरण्यानें त्याच्या चतुरंग सेनेला एक मोठें भव्य स्वरूप आलें.

सैन्याची तयारी चालूं असतांनाच आपल्यामागें राज्यांत गडबड होऊन गोंधळ माजूं नये म्हणून त्यानें चोख व्यवस्था लावून दिली. त्याचप्रमाणें आपल्या प्रधानाकडून निरनिराळ्या राजांना शरण येण्याविषयींचीं पत्रें धाडलीं. याप्रमाणें प्रत्येक गोष्टीची तयारी त्यानें कांटेकोरपणें केली.

श्रीहर्षाला दिग्विजय करून पराक्रमाच्या जोरावर राज्यविस्तार करण्याची मोठी महत्त्वाकांक्षा होती. आपण पुष्पभूतीच्या घराण्यांतील आहोंत, आपले वडील महाराजाधिराज होते याची त्याला सतत जाणीव असे. परंतु घराणें, वडील व कुळ यांच्या कीर्तीवरच आपला अधिकार सांगण्याइतका तो मूर्ख नव्हता. आपल्या मनगटाच्या जोरावर इतर सर्व राजांना आपल्या

अधिसत्तेखालीं आणून सर्व हिंदुस्थानांत एक सुसूत्र, सुव्यवस्थित व सुसंबध्द असें अखंड राज्य निर्माण करावें अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. या महत्त्वाकांक्षेच्या मागें सामर्थ्य होतें; आणि म्हणून वयाच्या १६ व्या वर्षी गादीवर बसल्यावरहि त्यानें आपल्या पराक्रमाच्या व तेजाच्या जोरावर पृथ्वीला नमविलें यांत शंका नाहीं. श्रीहर्षानें आपल्यापाशीं जी महत्त्वाकांक्षा बाळगली होती ती फार उच्च होती. ती महत्त्वाकांक्षा म्हणजे सम्राट् होण्याची. खरोखरच सर्व दृष्टीनें सम्राट् होण्याला तो लायक होता. फक्त ती सिध्द करणें एवढेंच त्याचें काम होतें आणि त्यासाठींच हा खटाटोप चाललेला होता.

दिग्विजयाला निघण्यासाठीं अनेक ज्योतिषांना श्रीहर्षानें चांगला मुहूर्त शोधण्यास सांगितलें होतें. त्याप्रमाणें त्यांनीं दिवसहि निश्चित केला. त्यामुळेंच आज राजवाड्यांत गडबड उडाली होती. सकाळपासून सनई आणि चौघडा यांचा आवाज घुमत होता. त्या आवाजाच्या घोषांतच राजानें सोन्या-चांदीच्या घंगाळांतून स्नान केलें. त्यानंतर त्यानें अत्यंत शुभ्र वस्त्रें परिधान केलीं आणि ब्राह्मणांना दक्षिणा वाटली. ब्राह्मणांनीं वेदमंत्रांचा घोष करून त्याला आशीर्वाद दिला व दिग्विजयासाठीं शुभचिंतन केलें. त्यानंतर, मुख्य पुरोहितानें दुर्वा पाण्यांत बुडवून त्याच्या अंगावर सिंचन केलें व त्याचें अभीष्ट-चिंतन केलें. अशा प्रकारें सर्व ब्राह्मणांना, विद्वानांना, ज्योतिषांना दक्षिणा वाटून त्यानें संतुष्ट केलें व त्यांचे आशीर्वाद घेऊन श्रीहर्ष शंकराच्या देवालयाकडे निघाला ! शंभुमहादेवाच्या पूजेशिवाय सिध्दि कोठली ? उमेचा पति हाच सर्व अशुभ गोष्टींचा नाश करणारा असून तो आपल्याला मदत करणारा एकमेव त्राता आहे अशी त्याची दृढ भावना होती.

तो देवळांत आला. अत्यंत विनम्र होऊन त्यानें आपल्या दैवताचें पूजन केलें. भगवान् शंकराच्या पूजेनें तो अतिशय प्रसन्न झाला. अंतःकरणांतील त्या प्रसन्न भावानें तो पुन्हां राजवाड्यांत आला आणि त्यानें युद्धाचा पोषाख केला. इतक्यांत त्याचा उजवा दंड स्फुरण पावूं लागला. त्यामुळें श्रीहर्ष अतिशय आनंदित झाला. अशाप्रकारचा शुभशकून म्हणजे आपल्या यशस्वी कार्याचा पाया असेंच त्याला वाटलें.

श्रीहर्ष राजवाड्यांतून बाहेर पडला. त्याच्या स्वागताला लोक सिद्ध होते. आपला राजा दिग्विजय करावयाला जाणार हें पाहून कोणत्या प्रजेला आनंद

होणार नाहीं ? प्रजाजनांनीं त्याच्या अंगावर फुलांची वृष्टि केली आणि त्याच्या नांवाचा मोठमोठ्यानें जयजयकार केला. प्रजाजनांच्या आशीर्वादानें आणि प्रेमानें राजाचे अंगावर रोमांच उभे राहिले! तो अगदीं आनंदून गेला.




**श्रीहर्ष निघाला. दिग्विजयाच्या दुंदुभी आणि रणभेदी वाजूं लागल्या. दशदिशा घोषामुळें भरून गेल्या.**

श्रीहर्ष निघाला. दिग्विजयाच्या दुंदुभी आणि रणभेदी वाजूं लागल्या. दशदिशा घोषामुळें भरून गेल्या. वातावरण आरोळ्यांनीं दुमदुमून गेलें. सैन्याचा पहिला मुक्काम सरस्वती नदीच्या कांठीं पडला.

ह्या पहिला मुक्काम ज्या गांवाजवळ पडला होता तेथील पाटील अतिशय आनंदित झाला. आपला राजा दिग्विजयाला निघालेला आहे या समाधानानें त्याचें मन भरून गेलें होतें. त्यांतच त्याचा पहिला मुक्काम आपल्या गांवाजवळ पडलेला पाहून त्याला विशेष आनंदाचें भरतें आलें होतें. आतां आपल्याला राजाचा सत्कार करतां येईल, त्याची योग्य संभावना करून

त्याच्या कार्याला आपला शुभाशीर्वाद देतां येईल हाहि विचार सुखद रीतीनें त्याच्या अंतःकरणावर रेंगाळत होता.

पाटलानें राजाची भेट घेण्याचें ठरविलें. भेटीचा दिवस निश्चित झाला. त्याप्रमाणें पाटील राजाच्या भेटीस आला. त्यानें राजाला एक नवीनच भेट आणली होती. सगळेजण पाटील काय देतो आहे म्हणून उत्सुकतेनें पाहात होते. पाटलानें एक मोहोर काढली. सोन्याची ती चकचकीत नवी मोहोर होती. त्यावर वृषभाचें चित्र काढलेलें होतें. ती नवीन छापाची मोहोर होती. राज्यांतील नवीन नाण्याचें अशाप्रकारें राजाच्या हस्तें उद्घाटन होत आहे हें पाहून पाटलाला आनंद झाला —पण—



पण ती मोहोर पाटलाच्या हातून घेत असतां एकदम निसटली आणि जमिनीवर पडली.

पण ती मोहोर पाटलाच्या हातून घेत असतां एकदम निसटली आणि जमिनीवर पडली. श्रीहर्षाच्या हातून मोहोर निसटली ! आसपास उभे असलेले सर्व लोक कावरे बावरे झाले ! राजाच्या हातून मोहोर निसटली ! केवढा अपशकून ! दिग्विजय होणार कसा ? राजा लढाया जिंकणार कसा ? सर्व लोकांच्या मनांत एका क्षणांत विचारांची प्रचंड खळबळ उडाली. त्यांचीं डोकीं सुन्न झालीं. त्या अपशकुनानें ते अक्षरशः घाबरून गेले. परंतु पडेल त्या प्रसंगाशीं तोंड देण्याची श्रीहर्षाची आतां तयारी झाली होती. मोहोर खालीं पडल्यावर लोकांच्या चेहऱ्यावरील भाव त्यानें जाणले. त्यांच्या अंतःकरणांतील खळबळीचा त्याला जणूं ठाव लागला आणि अपशकुनानें भांबावलेल्या लोकांना पूर्ववत् जाग्यावर आणले नाहीं तर तें योग्य होणार नाहीं हें जाणून तो चटकन् खालीं वाकला आणि त्यानें ती मोहोर हातांत उचलून धरली; आणि हंसत हंसत म्हणाला, " लोकहो, तुम्ही ह्या गोष्टीला इतके घाबरला ? तुम्हांला हा अपशकून वाटला ? खरोखरच यांत घाबरण्यासारखें कांहीं नाहीं. वास्तविक पाहतां ही पृथ्वी माझ्या मुद्रांकित झाली आहे. तिनें जमिनीवर आपला ठसा उमटवला आहे. त्या अर्थी आतां लवकरच सर्व भूमीवर माझ्या अधिराज्याचा छाप बसेल यांत संशय नाहीं. तेव्हां परमेश्वरानें हा मोठा शुभशकूनच केला म्हणावयाचा ! अशाप्रकारें परमेश्वराचा माझ्यावर झालेला अनुग्रह पाहून मला मोठा आनंद झाला आहे. "

ह्या भाषणानें लोकांच्या मनांतील किल्मिष पार धुवून गेलें. त्यांची चिंता दूर पळाली. आपल्याला झालेल्या या शुभशकुनाबद्दल श्रीहर्षानें ब्राह्मणांना शंभर गांवें इनाम दिलीं. या प्रकारानें सर्वच लोक संतुष्ट झाले. त्यांच्या मनांत उत्साह उत्पन्न झाला व दिग्विजयाच्या कार्यामध्यें सामर्थ्य निर्माण झालें.

श्रीहर्षाचा रोख प्रथम गौडाधिपति शशांकावर असल्यानें त्यानें पूर्वेकडे कूच केलें. तो वेगानें निघाला होता. त्याच्या स्वारीची बातमी निरनिराळ्या राजांना लागलेली होती. त्यांतील एका राजानें श्रीहर्षाशीं सख्य करण्याचें ठरविलें. तो राजा म्हणजे आसामचा राजकुमार भास्करवर्मा हा होय.

भास्करवर्म्यानें आपला हंसवेग नांवाचा दूत श्रीहर्षाकडे पाठविला व तहाची इच्छा प्रदर्शित केली. श्रीहर्षानें ती मोठ्या आनंदानें मान्य केली. श्रीहर्षाच्या स्वारींतील हा मोठाच विजय होता. भास्करवर्म्यानें श्रीहर्षाला

प्रथमच सम्राट् म्हणून मान्यता दिली. एवढेंच नव्हे तर सम्राटाचें चिन्ह म्हणून अभोग नांवाची अप्रतिम अशी रत्नजडित छत्री श्रीहर्षाला अर्पण केली. त्याबरोबरच त्यानें इतर अनेक मोठमोठ्या वस्तू त्याला नजराणा म्हणून पाठविल्या आणि या सर्व नजराण्याबरोबर भास्करवर्म्यानें मैत्रीची इच्छाहि प्रदर्शित केली. हंसवेगानें दिलेल्या वस्तूंचा स्वीकार करून व भास्करवर्म्याच्या मैत्रीला मान्यता देऊन श्रीहर्षानें त्याला परत पाठविलें ! श्रीहर्ष सम्राट्पदावर चढूं लागला; त्याला हा पहिला शुभशकून झाला होता.

श्रीहर्ष पुढें निघाला. त्याचें मन उत्साहानें ओसंडून चाललें होतें. तरी पण मनाच्या आंत खोल कुठेंतरी प्रचंड वादळ होत होतें आणि तें योग्यहि होतें. आपल्या बहिणीची आपण मुक्तता केली पाहिजे, तिला शत्रूच्या तडाख्यांतून वांचविली पाहिजे या विचारांचा खळबळाट चालला होता. आणि त्यासाठींच त्यानें आपला मोर्चा कनोजकडे वळविला. परंतु त्याच्या हेरांनीं निराळीच बातमी त्याला आणून दिली. आपला मामेभाऊ भंडी हा जवळच असून त्याच्या सैन्याचा तळ तेथें पडलेला आहे हें त्याला कळलें. त्या बातमीनें श्रीहर्षाला एकदम राज्यवर्धनाची आठवण झाली आणि त्याबरोबरच भंडीला भेटण्याचीहि तीव्र इच्छा निर्माण झाली. त्याला भेटण्याच्या भावनेची तीव्रता इतकी विलक्षण होती कीं तो ताबडतोब त्याच्या भेटीला गेला.

श्रीहर्ष भंडीला कडकडून भेटला. नंतर त्यानें राज्यवर्धन कसा मारला गेला याची सर्व हकीकत विचारली. भंडीनें घडलेला सर्व वृत्तांत त्याला अगदीं सविस्तरपणें कथन केला. त्या हकिगतीनें श्रीहर्षाला राज्यवर्धनाच्या मृत्यूनें शोक झाला आणि भंडीहि त्यांत सामील झाला. थोडा वेळ गेल्या-वर श्रीहर्षानें भंडीला अत्यंत उत्सुकतेनें राज्यश्रीची हकिगत विचारली. तेव्हां भंडी म्हणाला, " मला असें कळलें आहे कीं आपली कारागृहांत अधिकच विटंबना होईल म्हणून ती कैदेंतून पळून विन्ध्य पर्वताच्या आश्रयाला गेली आहे. मी तिचा शोध करण्याकरितां अनेक लोक पाठविले परंतु कांहींच पत्ता लागला नाहीं. "

भंडीनें राज्यश्रीच्या छळाबद्दल चांगलाच सूड उगविला होता. त्यानें मालव-राजाचा पराभव करून त्याचें हत्तींचें पथक आणि कोश स्वाधीन करून घेतले

होते व त्याच्या बायकामुलांना, नोकरचाकरांसह बंदिवान करून आणलें होतें. भंडीनें या सर्व वस्तू व माणसें श्रीहर्षाला दाखविलीं.

श्रीहर्षानें तें सर्व पाहिलें. परंतु त्याचें मन आतां आपल्या लाडक्या बहिणीकडे लागलें होतें. तिची सुटका कशी करतां येईल या एकाच विचारांत तो होता. सबंध रात्रभर त्यानें राज्यश्रीच्या शोधासंबंधीचा विचार केला, त्याचबरोबर दिग्विजयाचाहि विचार केला. स्वारीवर पुढें जावें की राज्यश्रीचा शोध करावा ? त्याच्या मनाचा निश्चय होईना. परंतु दोन्हीं पारड्यापैकीं शेवटीं राज्यश्रीचेंच पारडें प्रेमामुळें जड ठरलें आणि दिग्विजयाचें काम भंडीवर सोपाविण्याचें ठरवून आपण विन्ध्य पर्वतांत राज्यश्रीच्या शोधाला जावें असें त्यानें निश्चयानें ठरविलें.

दुसऱ्या दिवशीं भंडीला बोलावून आपला सगळा बेत श्रीहर्षानें त्याला सांगितला. भंडीनें त्याला मान्यता दिली. ताबडतोब दिग्विजयाची सर्व सूत्रें भंडीवर सोपवून व विशेषतः शशांकाची खोड मोडण्यासाठीं अधिक सैन्य देऊन मोठ्या सैन्यानिशीं श्रीहर्षानें त्याला रवाना केलें.

श्रीहर्षानें अशा प्रकारें स्वतःच्या दिग्विजयाचीं सूत्रें भंडीवर सोपविल्यानें त्याचा तो बेत जरी अपूर्ण राहिला तरी बहिणीचा शोध करणें हाहि एक मोठा दिग्विजयच ठरणार होता आणि हर्ष त्या एकाच उद्देशानें प्रेरित होऊन विन्ध्य पर्वताकडे निघाला. हळुहळू तो रानांत शिरूं लागला. डोंगर, कपाऱ्या ओलांडूं लागला. पण कसलाहि मागमूस लागेना. त्याची पायपीट दिवसेंदिवस वाढतच चालली. श्रीहर्षाचे सैनिकहि त्याच्या मदतीला होतेच. त्यांनींहि नेटानें प्रत्येक अरण्य धुंडण्याचा अचाट उपक्रम सुरू केला. परंतु राज्यश्रीचा पत्ता कोणालाहि लागला नाहीं. श्रीहर्ष निराश झाला. आपली बहीण आपल्याला कदाचित् सोडून गेली असेल, ती आपल्याला पुन्हां दिसणार नाहीं अशी शंकाहि त्याच्या मनाला चाटून गेली. परंतु त्या शंकेनें व्यथित होण्याइतकें त्याचें अंतःकरण लेचेपेचें नव्हतें आणि घेतलेलें कार्य अर्धवट सोडून द्यावें असें त्याच्या मनाला कधीं शिवलेंहि नाहीं. क्षत्रियाच्या धर्माला तें शोभणारें नव्हतें. श्रीहर्ष पुन्हां जोरानें तपासाला लागला.

ह्या तपासांत असतांना त्याला एक कल्पना सुचली. ती त्यानें ताबडतोब अमलांत आणली. त्या अरण्यांतील भिल्लांचा नायक व्याघ्रकेतु ह्याला त्यानें

बोलाविलें व आपल्या लाडक्या बहिणीचें वर्णन करून अशा प्रकारची स्त्री आढळांत आली किंवा काय याबद्दल चौकशी केली. परंतु श्रीहर्षाला निराश व्हावें लागलें. हातांत धनुष्यबाण घेतलेला, अंगावर फक्त वाघाचेंच कातडें पांघरलेला आणि काळाकाभिन्न असा तो पुरुष भिल्लांचा नायक असला तरी इतर जगाशीं त्याचा संबंध बिलकुल नव्हता. आणि त्याला कोणी आलें काय व गेलें काय त्याचीहि पर्वा नव्हती. तो आपल्याच कामांत गुंग ! परंतु श्रीहर्षाचें अंतःकरण त्यानें ओळखलें. त्याची दीन अवस्था पाहून व श्रीहर्षाचे त्याच्या बहिणीवरील प्रेमाची पराकोटी लक्षांत घेऊन आपणहि याला कांहीं मदत करावी अशी त्याला इच्छा उत्पन्न झाली. त्या दृष्टीनें त्या भिल्लानें विचार केला. परंतु तसा प्रत्यक्ष मार्ग कोणताहि सांपडेना. बराच वेळ गेल्यावर त्याला एकदम सुचलें कीं आपल्या पर्वताच्या एका टोकाला दिवाकर-मित्र नांवाचा एक बौद्ध भिक्षु राहतो. तो नेहमीं पर्वत संचार करीत असतो. त्याला कांहीं माहिती असण्याची शक्यता आहे. त्यानें ही शंका श्रीहर्षाजवळ बोलून दाखविली. त्याबरोबर श्रीहर्ष एकदम म्हणाला, “ कोणता भिक्षु ?” भिल्ल म्हणाला, “ दिवाकरमित्र. ”

“ दिवाकरमित्र ! ”—श्रीहर्ष पुन्हां तें नांव मनाशीं पुटपुटला. आपण हें नांव कोठेंतरी ऐकलें आहे, तें आपल्या कानांवरून गेलें आहे याची त्याला आठवण झाली. पण कोठें ?

हं, आठवलें ! श्रीहर्ष चटकन् हंसला. तें नांव त्यानें कोठें ऐकलें तें बरोबर आठवलें. राज्यश्रीचा पति गृहवर्मा याचा दिवाकरमित्र नांवाचा एक परमस्नेही लहानपणापासून होता हें त्याच्या ध्यानांत आलें. एवढेंच नव्हे तर कालांतरानें त्यानें बौद्ध धर्म स्वीकारला व कोठेंतरी निघून गेला ही बातमीहि त्याला स्मरली.

दिवाकरमित्राच्या नांवानें एक नवीनच शंका श्रीहर्षाच्या मनाला चाटून गेली. राज्यश्री आपल्या नवऱ्याच्या मित्राकडे आश्रयाला म्हणून निश्चितपणें आली असेल आणि त्या ठिकाणींच कदाचित् ती आपली कालक्रमणा करीत असेल असें त्याला वाटलें. त्या नुसत्या विचारानें त्याला आनंद झाला. बहीण

दिवाकरमित्राच्या आश्रमांत आहे व आपण तिकडे जाणार ही कल्पनाच त्यांलीं सुखावह होती.

तावडतोब श्रीहर्ष व्याघ्रकेतूला घेऊन दिवाकरमित्राच्या आश्रमाकडे निघाला. आश्रमाच्या दारांतच दिवाकरमित्र शांतपणें चिंतन करीत उभा होता. इतक्यांत भिल्ल व श्रीहर्ष यांना येतांना त्यानें पाहिलें. व्याघ्रकेतूला त्यानें ओळखलें. पण हा राजपुरुष कोण ?

ते दोघे आश्रमाजवळ आले. नंतर सगळेजण आंत गेले. स्थानापन्न झाल्यावर जेव्हां दिवाकरमित्रानें माहिती विचारली तेव्हां श्रीहर्षानें आपण कोण, कां आलों हें सर्व सांगितलें. त्याचें नांव ऐकतांच दिवाकरमित्रानें त्याला तावडतोब ओळखलें. मध्यंतरीं बराच काळ गेल्यानें लवकर ओळख पटली नाहीं. परंतु त्या भेटीनें दोघांच्याहि पूर्व स्मृति जागृत झाल्या.

दिवाकरमित्राचें शांत व सौम्य बोलणें, त्याची ती चिंतनशील व विचारी मुद्रा यामुळें श्रीहर्ष स्तब्धपणें त्याच्याकडे पाहात होता. त्या ठिकाणीं एक प्रकारें त्याचें अंतःकरण जरा विसांवलें. श्रीहर्षानें सर्व हकिगत दिवाकर-मित्राला इत्थंभूतपणें सांगितली. ती सर्व माहिती त्याला नवीन होती. अरण्यांत येऊन राहिल्यानें त्याचा बाह्यजगाशीं असलेला संबंध पूर्णपणें तुटला होता. श्रीहर्षानें सांगितलेली सर्व हाकिगत शोकजनक व कोणाच्याहि मनाला क्षतें पाडणारीच होती. दिवाकरमित्र बौद्ध होता तरी तो माणूस होता. त्यालाहि गृहवर्म्यासारख्या प्रेमळ, उदार व बहुगुणी अशा बालमित्राच्या वधाची बातमी ऐकून वाईट वाटलें. अशा प्रकारें अत्यंत विपरीतपणें आपला मित्र गेला हें पाहून तोहि हळहळला. परंतु राज्यश्रीची हकिगत त्यापेक्षांहि उद्वेगजनक व खेदकारक होती. आपल्या मित्राच्या बायकोवर अशाप्रकारें संकटांमागून संकटें कोसळावींत व भयंकर दुःख तिला सोसावें लागावें याचा त्याला अर्थच कळेना.

"सर्वं क्षणिकं सर्वं दुःखं" एवढेंच दिवाकरमित्र हलकेंच पुटपुटला. श्रीहर्ष स्वस्थ होता. दिवाकरमित्र राज्यश्रीला कशी शोधावी याचा विचार करूं लागला.

तेवढ्यांत एक शिष्य धांवत धांवत त्या ठिकाणीं येऊन उभा राहिला, आणि म्हणाला, "महंत, फारच विपरीत गोष्ट घडत आहे."

१८८



" कोणती गोष्ट ? "

परंतु धांवत आल्यामुळें शिष्याला दम लागला होता. त्याच्या तोंडांतून शब्दहि लवकर येईना. पुन्हां एकदां दिवाकरमित्र म्हणाला, " घाबरण्याचें कारण नाहीं. जरा शांतपणें सांग. "

त्यानें उत्तर दिलें, " पलीकडील रानांत कांहीं स्त्रिया जमलेल्या आहेत. त्यामध्यें एक स्त्री दिसावयास अत्यंत सुंदर असून ती फार दुःखित झाली आहे. कदाचित् ती राजघराण्यांतील असावी. तिला झालेल्या दुःखाचा परिहार म्हणूनच कीं काय तिनें अग्निकाष्ठभक्षण करण्याची तयारी चालविली आहे. आणि त्यासाठींच तिच्याबरोबर असलेल्या इतर स्त्रिया एक चिता तयार करीत आहेत. "

त्या बातमीसरशीं श्रीहर्ष ताडकन् उठून उभा राहिला. कदाचित् ती राज्यश्रीहि असेल अशी शंका त्याच्या मनाला चाटून गेली. तो त्या शिष्याला म्हणाला, " अजून ती जिवंत असेल ना ? तूं तिला बाकीची कांहीं माहिती विचारलीस कां ? "

शिष्य म्हणाला, " मी सकाळीं आन्हिक उरकल्यावर नदीकिनाऱ्यानें आश्रमाकडे येत होतो तों अरण्यांतून अत्यंत करुण असा विलाप ऐकूं आला. तो आवाज इतका व्यथित करणारा होता कीं कोणाचेंहि अंतःकरण पिळवटून निघावें. मी ताबडतोब त्या दिशेनें आंत गेलों. परंतु तेथील तें दृश्य पाहून मी कांहींच विचारूं शकलों नाहीं आणि म्हणूनच पळत पळत इकडे आलो ! "

आतां वेळ घालविण्यांत अर्थ नाहीं हें ओळखून श्रीहर्षानें दिवाकरमित्राला बरोबर घेतलें व शिष्याला वाटाड्या बनवून ते तडक त्या जागेकडे निघाले. एवढ्या वेळांत ती स्त्री सती तर गेली नसेल ना ? या एकाच विचारानें श्रीहर्षाचें अंतःकरण धडधड करीत होतें. ती स्त्री जर सती गेली असेल आणि ती जर खरोखरच राज्यश्री असेल तर ?

तर काय ? श्रीहर्षाचे विचारच या प्रश्नापाशीं खुंटले. तो तरी पुढें काय विचार करणार ? संकटपरंपरामालिका त्याच्या डोळ्यांपुढें क्षणांत चमकून गेली. परंतु जेव्हां त्यानें दिवाकरमित्राच्या चेहऱ्याकडे पाहिलें तेव्हां पुन्हां त्याच्या मनांत थोडी स्थिरता उत्पन्न झाली. तो शांत व अव्यथित, असा चेहरा पाहूनच श्रीहर्षाच्या मनांत समाधान उत्पन्न झालें व आपलें काम.....

एवढ्यांत ते त्या जागेजवळ आले. श्रीहर्ष भरभर पुढें गेला आणि पाहतो तों काय—

ती राज्यश्रीच होती ! ज्या राज्यश्रीच्या प्रेमासाठीं त्यानें विंध्यपर्वत पालथा घातला ती त्या ठिकाणीं झालेल्या सर्व दुःखाचा परिहार अग्नीच्या ज्वाळांकडून करून घेण्यासाठीं सिद्ध झाली होती. पण आपण अगदीं ऐन वेळेवर आल्यानें राज्यश्री आपल्याला परत मिळाली हें पाहून श्रीहर्षाला आनंद झाला. आपल्या लाडक्या बहिणीला त्यानें प्रेमानें आलिंगन दिलें. ज्या राज्यश्रीकरतां आपण दिग्विजयाची मोहीम बाजूला ठेविली ती अशा प्रकारें विपरीत प्रसंगांत कां होईना पण भेटली हा फारच मोठा दिग्विजय श्रीहर्षाला वाटला. त्यापुढें इतर सारे दिग्विजय फिके होते. त्याचें भगिनीवरील अपार प्रेम हें सूर्यासारखें लखलखीत होतें आणि त्यामुळेंच इतर दिग्विजयाची अभिलाषा काजव्यासारखी ठरावी ह्यांत कांहींच आश्चर्य नव्हतें !

आपला भाऊ अशा अचानक रीतीनें, इतक्या विलक्षण आणीबाणीच्या प्रसंगीं येथें येईल ही कल्पनासुद्धां राज्यश्रीच्या स्वप्नांत येणें शक्य नव्हतें. कल्पनेपेक्षां निर्माण झालेली परिस्थिति जास्त सत्य असते हेंच तिच्या तेव्हां ध्यानांत आलें. एका क्षणापूर्वी आपली मनस्थिति कोणती होती व आतां कोणती आहे ? या विचारानेंच राज्यश्रीचें मन बदललें.

तो देखावाच मोठा आश्चर्यकारक होता. एका बाजूला चिता आहे आणि त्याच्या शेजारींच हे बहीणभाऊ पवित्र अशा सुखाचा अनुभव घेत आहेत. मोठें मनोहर दृश्य होतें तें ! दिवाकरमित्राला तर अतिशय आनंद झाला. आपल्यावरील जबाबदारी इतक्या लवकर पार पडलेली पाहून त्याला बरें वाटलें. त्याचबरोबर राज्यश्री व हर्ष दोघेहि एकमेकांना भेटले हेंहि दृश्य त्याला मोठें सुखद वाटलें.

बुद्धं सरणं गच्छामि ॥
धम्मं सरणं गच्छामि ॥
संघं सरणं गच्छामि ॥

ही प्रार्थना करीत दिवाकरमित्र निघाला. त्याच्या मागोमाग श्रीहर्ष, राज्यश्री व इतरहि मंडळी आली.

सर्वजण आश्रमांत परत आले. आश्रमांतील पवित्र व मधुर वातावरणानें दोघा बहीणभावांना अतिशय बरें वाटलें. बराच वेळपर्यंत ते बोलत बसले. एकमेकांनीं एकमेकांच्याबद्दल सर्व माहिती विचारून घेतली.

तो दिवस पार पडला. आतां दुसऱ्या दिवशीं निघावयाचें ! दिवाकर-मित्रानेंहि त्याला संमति दिली होती ! परंतु एकाएकीं राज्यश्रीनें आपला एक नवीनच मनसुबा जाहीर केला.

ती म्हणाली, " हा आश्रम फारच सुंदर आहे. येथील वातावरण मला फारच आवडलें आहे आणि ह्या आश्रमाबद्दल मला एक प्रकारची आपुलकी वाटूं लागली आहे. दिवाकर मित्रासारख्या एका बुद्ध झालेल्या पवित्र माणसाच्या सहवासांत माझें जीवन व्यतीत करावें असें माझ्या मनाला वाटूं लागलें आहे. माझें जीवन अशा प्रकारें सार्थकीं लागेल तर आजपर्यंत सोसलेल्या दुःखांचा परिहारहि होईल व मनाला शांति लाभेल. उच्च वातावरणांत राहिल्यानें माणसाचें मनहि पवित्र होतें आणि साधूचा दुर्लभ सहवास मिळाल्यानें जीवनाची पातळी वरच्या दर्जाला जाते."

बोलतां बोलतां राज्यश्री अधिकच तेजस्वी दिसूं लागली. त्या बोलण्यानें श्रीहर्ष चकित झाला. तिच्या बोलण्यानें क्षणभर त्याचें अंतःकरण हेलावलें, आणि तिच्या उच्च विचारानें मन भारून गेलें. पण तें क्षणभरच ! आपण तिच्या दुःखाचा शेवट व्हावा यासाठींच धडपड केली, तिचा शोध लावला आणि आतां ही भिक्षुणी होण्यासंबंधीं गोष्टी करते. चंद्राचें शीतल चांदणें पडावें परंतु मधेंच काळ्या ढगाआड तें गुप्त व्हावें आणि जिकडे तिकडे अंधःकार पसरावा तशी त्याच्या मनाची स्थिति झाली. राज्यश्रीनें एक शुभ्र वस्त्र नेसलेलें आहे, खडतर तप चाललेलें आहे, तिचें शरीर शुष्क झालें आहे, असें राज्यश्री-बद्दलचें चित्र कल्पनेंत कां होईना! पण डोळ्यांसमोर उभें राहिल्यावर श्रीहर्षाच्या अंगावर कांटाच उभा राहिला.

तो एकदम राज्यश्रीला म्हणाला, " तुझा हा विचार दुःखांतून उत्पन्न झालेला आहे. तेव्हां तो अविचार आहे. तुला हीं व्रतें सहन होणार नाहींत. तेव्हां तूं हा विचार सोडून दे."

पण विरोध हा एखाद्या गोष्टीला बळकटी आणण्यास जसा कधीं कधीं

साहाय्यक ठरतो त्याचप्रमाणें राज्यश्रीच्या बाबतींत त्या वेळेस घडलें आणि ती अधिकच आग्रही बनली.

श्रीहर्ष पुन्हां विचारांत पडला. इतक्यांत दिवाकरमित्र त्या ठिकाणीं आला. त्यानें जेव्हां राज्यश्रीचा निश्चय ऐकला तेव्हां तोहि विचार करूं लागला आणि शेवटीं मोठ्या कळकळीनें त्यानें सांगितलें कीं, तुझा विचार स्तुत्य असला तरी तो तुला झेपणार नाहीं आणि प्रतिक्रियात्मक गोष्ट ही बहुधा अविचारी ठरते. तेव्हां तुझें मन शांत होऊं दे. मग आपण या गोष्टीचा विचार करूं.

परंतु राज्यश्री तिच्या निश्चयापासून ढळण्यास तयार होईना. भात्यांतील बाण शत्रूवर टाकून त्याला नामशेष करून जिंकूं पाहणारा योध्दा ज्याप्रमाणें शत्रू जिंकतां येत नाहीं असें पाहून वरचढ अस्त्रें फेंकण्यास सुरवात करतो व शेवटीं महास्त्र काढतो त्याचप्रमाणें श्रीहर्षाचे बाकी सर्व उपाय फुकट गेल्यावर त्यानें शेवटचा उपाय म्हणून राज्यश्रीला सांगितलें, " मीहि तुझ्याबरोबर बौद्ध भिक्षु होईन. परंतु माझी प्रतिज्ञा आधीं पुरी करणें आवश्यक आहे. तुझ्या नवऱ्याच्या व राज्यवर्धनाच्या वधाचा सूड घेतल्याशिवाय मी मागें फिरणार नाहीं. त्याचप्रमाणें अर्धवट सोडलेला दिग्विजयहि पुरा करणें आवश्यक आहे. सर्व कार्यें पार पडल्यावर मी आनंदानें तुझ्याबरोबर बौद्ध होईन. मग आपण सुखानें या ठिकाणीं येऊं व तपश्चर्या करूं. "

श्रीहर्षाची ही मात्रा बरोबर लागूं पडली. राज्यश्रीनें त्याच्याबरोबर पुन्हां परत येण्याचें ठरविलें व आपला निश्चय मागें घेतला. दोघेहि मोठ्या आनंदानें दिवाकरमित्राचा आशीर्वाद घेऊन निघाले ते गंगेच्या तीरावर श्रीहर्षाचे सैनिक होते त्यांना येऊन मिळाले. तेथून सर्व मंडळी कनोज येथें आली. दिग्विजयाचा एक भाग येथें पूर्ण झाला होता.

● ● ●

ग्रंथ संग्रहालय, ठा... स्थळप्रत
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

# १. शिलादित्य

राज्यश्री आणि श्रीहर्ष कनोजला परत आल्यामुळें प्रजेला आतिशय आनंद झाला. त्या आनंदांत श्रीहर्ष व राज्यश्री दोघेंहि निमग्न झालीं. राज्यांतील लोकांचें अपार प्रेम पाहून दोघांचेहि डोळे पाणावले. पहिले कांहीं दिवस असेंच गेले. पुढें कनोजच्या गादीवर कोणी बसावें हा महत्त्वाचा प्रश्न श्रीहर्षाच्या मनांत घोळत होता. त्याचप्रमाणें तो राज्यश्रीच्या व मंत्र्यांच्याहि मनांत होता. निरनिराळ्या प्रकारें विचार सुरू झाला. दुसरा अन्य वारस दत्तक घेऊन राज्य चालवावें अशी कांहींची कल्पना ! तर राज्यश्रीला गादीवर बसवावें अशी दुसरी कल्पना ! परंतु ती एकटी काय करणार ? मग श्रीहर्षालाच गादीवर बसवावें असें ठरलें. पण त्याला हें मान्य नव्हतें.

तेव्हां अशा तऱ्हेचा कांहीं विलक्षणच पेंच गादीसंबंधानें निर्माण झाला. शेवटीं विचारमंथनांतून कोठलीहि तड लागत नाहीं असें पाहून श्रीहर्षानें परमेश्वराचा आधार घेण्याचें ठरविलें. इतर सर्व लोकांनीं त्यास मान्यता दिली.

कनोज नगराच्या बाहेर अवलोकितेश्वराचें एक अत्यंत प्रचंड मंदिर होतें. त्या मंदिराची ख्याति दशदिशांना घुमत होती. तें एक अत्यंत जागृत असें देवस्थान आहे अशी लोकांची खात्री होती.

ठरल्याप्रमाणें अवलोकितेश्वराला कौल लावला. त्याप्रमाणें असें ठरलें कीं राज्यश्रीच्या नांवानें श्रीहर्षानें राज्यकारभार चालवावा आणि स्वतः सिंहासनारूढ न होतां किंवा कनोजाधिपति अशी पदवीहि न घेतां राजपुत्र शिलादित्य हें नांव धारण करून राज्यकारभार चालवावा. सगळ्यांनीं ह्या म्हणण्याला

संमति दिली आणि त्याप्रमाणें राज्यश्री गादीवर बसली. शिलादित्य हें नांव श्रीहर्षानें धारण केलें व युवराज या नात्यानें तो कनोजचा कारभार चालवूं लागला.

कनोजच्या व आपल्या राज्याची व्यवस्था उत्तम प्रकारें लावल्यावर व जिकडे तिकडे पुन्हां स्थिरस्थावर झाल्यावर श्रीहर्षाच्या मनांत अपुऱ्या राहिलेल्या दिग्विजयाची कल्पना चमकून गेली. त्याप्रमाणें त्यानें लगेच आपल्या व कनोजच्या सैन्याची जमवाजमव केली व तो दिग्विजयासाठीं पुन्हां बाहेर पडला.

त्याच्या स्वारीचें वर्णन करतांना बाणभट्ट कवीनें काव्यमय भाषा वापरून अतिशय सुंदर वर्णन केलें आहे. तो म्हणतो, " जसा हत्तीनें मोडलेल्या वृक्षाचा आवाज सिंहाच्या निद्राभंगाला कारण होऊन शेवटीं तो हत्तीच्या नाशासच कारण होतो त्याप्रमाणें श्रीहर्षाच्यामुळें इतर राजे व गौडाधिपति नष्ट झाले." याहीपुढें त्यानें असें वर्णन केलें आहे कीं, " प्रतिज्ञा केलेल्या श्रीहर्षासारख्या शूर पुरुषाला पृथ्वी जणूं अंगणासारखी वाटते. समुद्र हा अल्पशा नदीसारखा भासतो. आणि मेरू पर्वतासारखा प्रचंड पर्वतहि त्याला वारूळासारखा वाटतो. एवढेंच काय पण त्यानें हातांत धनुष्य धारण केल्यावर पर्वतसुद्धां नम्र होतात. मग बाकीच्यांची कथा तर विचारावयासच नको ! " श्रीहर्ष " हा बापानें म्हटल्याप्रमाणें खरोखर, " अंगणवधकलंकप्रक्षालनाकुलः " होता हें पटतें.

पर्वतावर पडलेलें पाणी वेगानें चोहोंबाजूला जावें तद्वतच श्रीहर्ष अत्यंत वेगानें उत्तर हिंदुस्थानांत फिरूं लागला. त्यानें प्रथम हूणांचा बंदोबस्त केला. श्रीहर्षासारख्या अल्पवयी राजाला पाहून त्यांना तोंड वर काढण्यास स्फुरण चढलें होतें. परंतु त्यांची सारी रग जेथल्या तेथेंच श्रीहर्षानें जिरवून टाकली. पुन्हां ते तोंड वर काढून एखाद्या नागाप्रमाणें उलटणार नाहींत एवढा प्रचंड बंदोबस्त श्रीहर्षानें केला. त्यानंतर माळव्यावर त्यानें आपला रोख वळविला. तोहि प्रांत त्याच्या ताब्यांत आला.

नंतर त्यानें नेपाळवर स्वारी केली. तो देश तर हां हां म्हणतां त्याच्या अंमलाखालीं आला. अशा रीतीनें एकामागून एक सर्व उत्तर हिंदुस्थान श्रीहर्षाच्या अधिपत्याखालीं आल्यानें तो जणूं उत्तर हिंदुस्थानचा परमेश्वरच बनला. सम्राट् हर्षवर्धन ह्या नांवाला तो आतां पात्र झाला होता.

दिग्विजय पुरा झाला ! रणचंडिकेच्या यज्ञांतून भूमि एकसंध करण्यांत आली ! सम्राट्पदानें श्रीहर्षाला भूषविलें ! आतां राज्याभिषेक ! मोठ्या

उत्साहानें राज्याभिषेकाची तयारी सुरू करण्यांत आली. या राज्याभिषेकाच्या वेळेला अनेक गोष्टी करण्याचें श्रीहर्षाच्या मनांत होतें. भारत भूमीसाठींच तर त्याचें जीवन होतें आणि आमरण तिची सेवा उत्कृष्ट कशी करतां येईल, लोक सुखी कसे होतील याचाच तो विचार करीत होता.

पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे राजधानीची ! ठाणेश्वर ही परंपरागत राजधानी होती आणि त्याबद्दल त्याला प्रेमहि होतें ! परंतु राज्यकारभारापुढें कर्तव्यापुढें व लोकांच्या व राज्याच्या सोयीपुढें त्यानें आपलें प्रेम बाजूस ठेवलें; आणि कनोज हेंच राजधानीला ठिकाण निवडलें. केवळ लहर म्हणून त्यानें असें केलें नाहीं. तर खरोखर कनोज हें अतिशय चांगलें असें ठिकाण होतें. त्यावेळेस उत्तर हिंदुस्थानांत त्या ठिकाणाइतकें प्रसिद्ध ठिकाण नव्हतें. धार्मिक दृष्टीनेंहि एक प्रकारचें वैशिष्ट्य कनोजला प्राप्त झालें होतें. एवढेंच नव्हे तर पश्चिमेस महापवित्र गंगानदी वहात होती व इतर तिन्ही दिशांना प्रचंड खंदक होते. तेव्हां लष्करी दृष्टीनेंहि तें शहर फारच मजबूत होते. एवढेंच काय पण संपूर्ण उत्तर हिंदुस्थानावर जर नजर ठेवावयाची असेल तर एखादें मध्यवर्ति ठिकाणहि श्रीहर्षाला आवश्यक होतें आणि त्या दृष्टीनें कनोज हें ठाणेश्वरपेक्षां जास्त सोयीस्कर व चांगलें होतें. या सर्व दृष्टींनीं योग्य असें हेंच ठिकाण श्रीहर्षानें राजधानासाठीं पसंत केलें. त्याच्या ह्या राजधानीचें, त्या काळांतील आलेला चीनी प्रवासी ह्यु-एन-त्संग यानें, जें वर्णन केलें आहे तें वाचलें म्हणजे श्रीहर्षाच्या पसंतीचें कौशल्य आपल्या ध्यानांत येतें. तो म्हणतो, " कान्यकुब्ज हें शहर गंगेच्या पश्चिम तीरावर आहे. ह्या शहराची लांबी तीन मैल व रुंदी एक मैल आहे. मुख्य शहराच्या सभोंवतीं तटबंदी असून खोल व रुंद खंदक आहेत. शहरांत सुंदर मंदिरें असून आंत आणि बाहेर बागबगीचे आहेत. स्वच्छ स्फटिकाप्रमाणें असणारे सुंदर सुंदर तलाव तर शहराच्या शोभेंत अधिकच भर घालतात. निरनिराळ्या बागा सर्वत्र विखुरलेल्या आहेत. त्यांतील फलपुष्पांच्या समृद्धीमुळें एकप्रकारें जणुं वसंत ऋतु बारा महिने आहे कीं काय असाच भास होतो. परदेशांतून आलेल्या मालाचे ढीगच्या ढीग लागलेले असतात." यामुळें कनोज ही श्रीहर्षाची राजधानी शोभून दिसत असेल यांत शंकाच नाहीं.

कनोज ! खरोखरच आश्चर्यकारक असें हें नांव आहे ! हें नांव कसें पडलें ?

या शहराचा इतिहास फार पुरातन आहे. पूर्वी या शहरास कुसुमपुर असें नांव होतें व ब्रम्हदत्त नांवाचा राजा राज्य करीत होता. तो अतिशय पराक्रमी होता. इतर सर्व राजे त्याला भीत असत.

या राजाला पुष्कळ पुत्र होते. त्याचप्रमाणें अनेक सुंदर कन्याहि होत्या.

कुसुमपुरानजिक गंगातटाकीं एक ऋषि तप करित असे. तो किती वर्षे तप करीत होता कोणास ठाउक ! कारण त्याच्या अंगाभोंवतीं वाल्मीकीप्रमाणें झाडेंझुडपेंही उगवलेलीं होतीं. यामुळें त्या ऋषीला महावृक्षर्षि असें संबोधण्यांत येई.

अशा प्रकारें तो ऋषि आपल्या समाधींत अनेक वर्षे होता. पुढें जेव्हां त्याची तपश्चर्या संपली व समाधि उतरली तेव्हां तो गंगास्नानास गेला. तो ज्यावेळीं तेथें गेला त्याचवेळीं ब्रह्मदत्ताच्या सुंदर कन्या तेथें आल्या होत्या. ह्या ऋषीच्या दृष्टीस त्या कन्या पडल्यावर त्याला लग्न करण्याची इच्छा उत्पन्न झाली. त्यानें त्यासंबंधीं जेव्हां चौकशी केली तेव्हां त्यास त्या ब्रह्मदत्ताच्या मुली आहेत असें समजलें.

हें समजल्यावर तो तडक राजवाड्यांत गेला व त्यानें राजाजवळ मुलींची मागणी केली. ऋषीच्या तपाचें सामर्थ्य व तेज पाहिल्यावर राजाला त्या ऋषीची याचना अमान्य करवेना, आणि याचकाला तृप्त न केल्याचें पापहि घेण्यास तो तयार नव्हता.

राजानें यासंबंधीं आपल्या मुलींना जेव्हां विचारलें तेव्हां त्यांनीं त्या ऋषीबरोबर लग्न करण्याची तयारी नसल्याचें सांगितलें. त्यांच्या नकारामुळें राजा चिंताग्रस्त झाला. त्याला काय करावें हेंच सुचेना. ऋषि क्रोधाविष्ट होईल आणि शाप देईल याची त्याला भीति वाटत होती. राजाची ती अनुकंपनीय स्थिति पाहिल्यावर त्याची सर्वांत धाकटी मुलगी त्या ऋषीबरोबर लग्न करण्यास तयार झाली, आणि त्याप्रमाणें तिनें राजास सांगितलेंहि. तिच्या या निश्चयानें राजाला बरें वाटलें. त्याची चिंता दूर झाली व काळजींतून तो मुक्त झाला.

ब्रम्हदत्तानें आपल्या मुलीस त्या महर्षीला अर्पण करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें तो त्या ऋषीकडे गेला. राजानें येण्याचें कारण सांगून आपली मुलगी त्याला अर्पण केली. तिच्याकडे पाहतांच ऋषीला संताप आला कारण

ती रूपानें साधारण होती. राजानें ही वाईट मुलगी बुद्धया आपल्याकडे आणली असावी अशी त्याची समजूत झाली. आणि तो रागानें राजाला म्हणाला—

" असली वाईट मुलगी देऊन तूं माझी समजूत करतोस काय ? "

त्यावर राजा नम्रतेनें म्हणाला, " ऋषिमहाराज, माझ्या सर्व कन्यांना मी आपली इच्छा सांगितली. परंतु त्या इच्छेप्रमाणें कोणीहि लग्न करण्यास तयार झालें नाहीं. ही एवढीच माझी मुलगी आपल्याला वरण्यास कबूल झाली; म्हणून तिला मी आपणाकडे आणलें आहे. "

राजाच्या या बोलण्यानें ऋषीचा राजावरील राग गेला खरा परंतु त्याच्या कन्यांनीं आपला अपमान केला हें पाहून तो एकदम संतप्त झाला आणि " इतर सर्व कन्या कुब्जा होतील व त्यांस कोणी वरणार नाहीं " असा शाप देऊन तो निघून गेला. कन्याकुब्जा यावरूनच कान्यकुब्ज हा शब्द तयार झाला व पुढें त्याचें कनोज असें रूप झालें.



श्रीहर्षाचा राज्याभिषेक समारंभ मोठ्या उत्साहानें साजरा झाला.

अशाप्रकारें राजधानी निवडल्यावर त्याठिकाणीं श्रीहर्षाचा राज्याभिषेक समारंभ मोठ्या उत्साहानें साजरा झाला. त्याच्या राज्याभिषेकाला सर्व मांडलिक राजे उपस्थित होते. त्यांनीं त्याला आपापल्या दर्जाप्रमाणें नजराणे सादर केले.

राज्याभिषेकाच्या वेळीं सम्राट् ह्या पदवीस शोभेल असाच त्यानें दानधर्म केला. त्याचप्रमाणें चंद्रगुप्त मौर्य, समुद्रगुप्त, विक्रमादित्य यांच्याप्रमाणेंच आपल्याहि नांवाचा शक सुरू केला. आपल्या राज्याभिषेकाच्या दिवसापासून हा शक सुरू झाला असें मानावयाचें हें त्यानें जाहीर केलें.

सम्राट्-निदर्शक-शक-सुरवात ही एक मोठी मानाची गोष्ट होती. अशा-प्रकारचा शक सुरू करण्याला त्या पाठीमागें सामर्थ्य लागतें; तें श्रीहर्षापाशीं पुरेपूर होतें. थोरांच्या परंपरेला कालाचें बंधन कधींहि पडत नाहीं. ‘ राजा कालस्य कारणम् ’ ही महाभारतोक्ति श्रीहर्षाच्या बाबतींतहि पूर्णपणें लागू होती.

● ● ●

# १०. दक्षिणेकडे झेप

श्रीहर्षानें सर्व उत्तर हिंदुस्थान जिंकला. आणि त्याच्याहि पलीकडे हिमालयाच्या आसपासचे नेपाळ, काश्मीर इत्यादि प्रदेश त्यानें आपल्या ताब्यांत आणले. परंतु हर्ष महत्त्वाकांक्षी होता. सर्व उत्तर हिंदुस्थान आपल्या हातांत आला म्हणून स्वस्थ बसणारा नव्हता. गरुडाप्रमाणें दक्षिणेकडे झेपावें आणि आसेतुहिमाचल एक वैभवसंपन्न राष्ट्र निर्माण करावें अशी त्याची मनीषा होती आणि यासाठींच त्याचें लक्ष नर्मदेपलीकडील प्रदेशावर लागलें होतें.

श्रीहर्षानें युद्धाची तयारी केली. राज्याभिषेकानंतर पुन्हां एकदां युद्धाच्या रणभेरी आकाशांत निनादू लागल्या. वीरांच्या उत्साहाला पणव आणि (आनक) जणूं खतच घालीत होतें. पराक्रमानें सारी पृथ्वी उजळून टाकण्याची तयारी वीर योद्धे करीत होते. विनासायास स्वर्गाचें द्वार यांच्यासाठीं उघडलें जाणार होतें आणि त्यामध्यें शिरण्याची ते मोठ्या उत्साहानें तयारी करीत होते.

श्रीहर्ष निघाला. त्यावेळीं इ. स. चें ६३६ वें वर्ष मार्ग आक्रमित होतें. मोठ्या उत्साहानें प्रेरित होऊन, महत्त्वाकांक्षेला आपली दासी बनवून तो निघाला.

या स्वारींतील हर्षाचें पहिलें लक्ष्य वल्लभीचा राजा ध्रुवसेन हा होता. श्रीहर्ष आपल्यावर चाल करून येत आहे असें पाहिल्यावर आणि आपण त्याला कोणत्याहि प्रकारचा विरोध करूं शकणार नाहीं हें लक्षांत घेऊन तो भडोचचा राजा दद्द याच्या आश्रयाला गेला. सिंहाला पहातांच हरणानें सैरावैरा पळत सुटावें त्याप्रमाणें त्याची स्थिति झाली. परंतु दद्दही आपली हद्द जाणून होता. बेडूक फुगला तरी त्याचा बैल होणार नाहीं याबद्दल त्याची खात्री होती, आणि म्हणूनच त्यानें श्रीहर्षाशीं सलोखा निर्माण करण्याचें ठरविलें. त्यानें मध्यस्थी केली व श्रीहर्षाचें मन वळविलें.

श्रीहर्ष हा कांहीं रक्तपिपासू नव्हता. लढाई टळून एक दक्षिणेकडील राजा शरण आला हें पाहून त्यानेंहि त्याच्याशीं सख्य जोडण्याचा निश्चय केला. परंतु शाब्दिक सख्य हें पाण्यांत टाकलेल्या साखरेप्रमाणें केव्हां विरघळेल याचा नेम नसतो म्हणून त्यानें आपली मुलगी ध्रुवसेनाला दिली. त्यामुळें रक्ताचें नातें निर्माण झालें. घनिष्ट संबंध उत्पन्न झाला आणि एक विरोधक पूर्णपणें आपलासा करून श्रीहर्ष पुढें निघाला.

आतां श्रीहर्षाला एका फार मोठ्या राजाशीं टक्कर द्यावयाची होती. श्रीहर्षाइतकाच तोहि पराक्रमी आणि शूर होता. त्याचीहि महत्त्वाकांक्षा आकाशाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करीत होती. शौर्याच्या बाबतींत तो प्रतिअर्जुन होता. त्याच्या घराण्याला पहिला पुलकेशी, कीर्तिवर्मा यासारख्या श्रेष्ठ पुरुषांनीं वैभव, श्रेष्ठता व मान्यता प्राप्त करून दिली होती. आणि यांच्याच वंशांतला महाराष्ट्र व कर्नाटक या भागावर राज्य करणारा एक श्रेष्ठ राजा होता.

भीम आणि अर्जुनाला शोभेलसा त्याचा पराक्रम होता. कर्णासारखा तो परोपकारी होता. त्याच्या हाताखालील सैन्य कसलेलें असून युद्धशास्त्रांत अत्यंत निपुण व वाकबगार होते. त्याचें नांव पुलकेशी–दुसरा पुलकेशी.



त्याच्यासंबंधीं व त्याच्या लोकासंबंधीं लिहितांना ह्यु एन त्संग हा त्याच काळांत आलेला चीनी प्रवासी म्हणतो, " येथले लोक मरण म्हणजे कःपदार्थ समजतात. ते सरळ वर्तनाचे आतिशय चाहते आहेत. त्यांचा राजा क्षत्रिय जातीचा असून, लढाऊ पेशाचा त्याला शोक आहे. आपल्यापाशीं फार मोठें शस्त्रागार आहे असें त्याला वाटतें. पायदळ व घोडदळ यांची तयारी हा राजा आतिशय कांटेकोरपणें ठेवतो. युद्धाचे नियम येथील सर्वांना माहीत आहेत. त्या नियमांचे पालनहि ते व्यवस्थित करतात. एखाद्या सरदाराचा किंवा सेनापतीचा युद्धांत पराभव झाला असतां तो त्यांना स्त्रियांचा पोषाख नेसावयास देत असे व त्यांचीं सैनिकी वस्त्रें काढून घेत असें. त्यामुळें त्यांना युद्धांतून परत फिरण्यापेक्षां त्यांतच मरणें हें अधिक बरें असें वाटत असे. एवढेंच नव्हे तर कित्येक सेनापति पुष्कळदां आत्महत्याहि

पुलकेशी–दुसरा पुलकेशी.

करीत. या राजाच्या पदरीं अनेक शूर सैनिक आहेत. आणि हजारों रानटी हत्ती आहेत. त्या हत्तींना तो युद्धाच्या वेळीं दारू पाजून मस्त करीत असे व शत्रूवर एकदम सोडून देत असे. त्यामुळें शत्रू पळून जाई. अर्थात् हा महाराष्ट्र देशाचा राजा इतर शेजारील राजांना काडीचीहि किंमत देत नाहीं. शिलादित्यासारखा पराक्रमी राजा व कुशल सेनापति हाताखालीं अनेक शूरवीर व श्रेष्ठ असे मातबर सरदार घेऊन चाल करून आला. परंतु (दुसऱ्या) पुलकेशी पुढें त्याचे कांहींहीं चाललें नाहीं. त्याची प्रतिज्ञा शून्य ठरली."

वर ह्यु एन त्संगानें वर्णन केल्याप्रमाणें श्रीहर्षाचा या लढाअींत पराभव झाला. उत्तर हिंदुस्थान आपण अत्यंत सहज रीतीनें पादाक्रांत केला तेव्हां दक्षिणेकडील प्रदेशहि हां हां म्हणतां जिंकूं अशी त्याची उमेद होती. परंतु त्याचा तर्क चुकला. त्याची घमेंड व्यर्थ ठरली. गरुडाच्या पंखांतील सामर्थ्य संपावें आणि त्यानें मटकन खालीं बसावें तशी स्थिति झाली. जगांत शेराला सव्वाशेर असतो हें त्याला पटलें! त्या प्रचंड पराभवामुळें त्याची हिंदुस्थान जिंकण्याची एक दुर्दम्य महत्त्वाकांक्षा विरघळून गेली. उत्तुंग शिखरावर चढतां चढतां उन्मादाच्या भरांत पाय घसरून खालीं पडावें आणि मग फक्त त्या शिखराची उंची मोजण्यांत व त्याच्या उत्तुंगत्वाची कल्पना करण्यांतच वेळ जावा त्याप्रमाणें त्याची स्थिति झाली.

असें जरी झालें तरी हर्ष विकल झाला नाहीं. पराभवानें रागांत रुपांतरित होण्याचें नाकारलें. उन्मादानें चिडीला आव्हान केलें नाहीं. श्रीहर्ष हुषार होता. त्याला आपली मर्यादा कोठपर्यंत आहे हें ध्यानांत आलें. ज्याप्रमाणें कुशल लेखकाला कोठें थांबावें हें कळतें त्याचप्रमाणें श्रीहर्षालाहि आपल्या पराक्रम; युध्द व राज्यमर्यादेची जाणीव झाली. कदाचित् तो स्वतः एक श्रेष्ठ कवि असल्यामुळें ती जाणीव जास्त उत्कटतेनें त्याला झाली असेल. एकाद्या मदोन्मत्त हत्तीचे मदाचे पाझर ओसरल्यावर ज्याप्रमाणें थंड होऊन तो मार्ग आक्रमूं लागतो त्याप्रमाणें अत्यंत शांत चित्तानें श्रीहर्ष पुन्हां राजधानीस परत आला आणि त्यानें राज्य करण्यास सुरवात केली.

• • •

# ११. गुणी गुणं वेत्ति

श्रीहर्षाचा कारभार अतिशय चांगला चालला होता. प्रजाजन त्याच्या कारभारामुळें सुखी होतें समाजामध्यें सुख, समृद्धि व समाधान नांदत होतें. अशावेळीं इ. स. ६२९ मध्यें भारतांत आलेल्या ह्यु एन त्संग नांवाच्या एका चीनी प्रवाशाशीं त्याची गांठ पडली. परंतु आपली श्रीहर्षाशीं गांठ पडणार आहे हें ह्यु एन त्संगला पूर्वींच कळलें होतें. तो निरनिराळ्या ठिकाणीं हिंडत असता त्याला वज्र नांवाचा एक नग्न निर्ग्रंथी भेटला. हे निर्ग्रंथी लोक ज्योतिष अतिशय चांगलें जाणतात हें त्याला माहीत होतें. म्हणून त्यानें त्या वज्राला आपली कुंडली मांडून भविष्य सांगण्यास सांगितलें. त्यावेळीं त्या ज्योतिषानें जमिनीवर ह्यु एनत्संगाची कुंडली मांडली आणि त्यानें सांगितलें कीं, तुम्ही



भारतांतच राहा. तुम्हांला योग चांगला आहे. तुम्ही अजून दहा वर्षें जगाल, मात्र सध्याची सुस्थिति किती दिवस टिकेल हें सांगता येणार नाहीं.

ह्यु एन संगनें त्याला विचारलें कीं मी जमा केलेल्या मूर्ति व पोथ्या या माझ्याबरोबर घेऊन माझ्या देशाला सुखरुप जाऊ शकेन काय ? त्यावर त्यानें उत्तर दिलें, " तुम्ही काळजी करूं नका. हिंदुस्थानांतील सुप्रसिध्द राजा श्रीहर्ष आणि कुमारराज हे तुम्हांला भेटतील आणि ते तुम्हांला सर्वतोपरी साहाय्य देतील. त्यांच्या साह्यानें तुम्ही स्वदेशी सुखरुप जाल. " आणि त्याच्या सांगण्याप्रमाणें श्रीहर्ष व कुमारराज ह्यांच्याशीं ह्यु एनत्संगची गांठ पडली.


ह्यु एनत्संग सारखा विद्वान व अभ्यासू पंडित पाहताच श्रीहर्षाला अतिशय आनंद झाला. त्याचें चीज करावें असें त्याच्या मनानें घेतलें. गुणो गुणं वेत्ति, हेंच शेवटीं खरें !

श्रीहर्षानें कनोज व प्रयाग येथील गंगातीरावर बुध्दाचा महोत्सव करण्याचें ठरविलें. त्या उत्सवांत एक मोठी धर्मसभा भरविली आणि महायान पंथाचें तत्त्वज्ञान पुन्हां एकदां प्रसृत करावें, वादविवाद करावा आणि मग ह्यु एनत्संगचा मोठा गौरव करावा, मानसन्मान करावा असें त्यानें मनाशी ठरविलें. ह्यु एनत्संग निश्चितपणें इतरांना वादांत जिंकेल अशी त्याची खात्री होती.

श्रीहर्षानें हा निश्चय केला व त्याप्रमाणें तो सोन्याच्या नौबती वाजवीत ह्यु एन त्संगकडे गेला. श्रीहर्षानें त्याला प्रणाम केला, फुलें वाहिलीं आणि नंतर महायान पंथाची श्रेष्ठता सिध्द करण्यासाठीं आपण तत्त्वज्ञान सांगावें अशी त्यानें त्याला विनती केली आणि ह्यु एनत्संगनें ती मोठ्या आनंदानें मान्य केली.

थोड्याच दिवसांत या उत्सवाची तयारी पूर्ण झाली. श्रीहर्ष प्रत्येक गोष्टींत जातीनें लक्ष घालीत होता. त्यामुळें प्रत्येक गोष्ट व्यवस्थित होत होती. उत्सवाचा दिवस उजाडला. कनोज शहरांत आज मोठी गडबड उडाली होती. देशोदेशीचें राजे जमा झाले होते. त्याचप्रमाणें सरदार, भिक्षु, ब्राह्मण, शास्त्री निर्ग्रंथी असें हजारो लोक व नालंद विद्यापीठांतील तीन हजार शास्त्री पंडित जमा झाले. ते सर्वच विद्वान होते. पंडित होते. विद्वत्तेच्या तेजानें उत्सवाच्या शोभेला तेज चढलें.

श्रीहर्षानें समारंभासाठीं खास इंद्राचा पोषाख केला. त्यानें बुद्धाची एक सुवर्णाची सोन्याची मूर्ति तयार केली होती. ती हत्तीच्या पाठीवर घालून वाजत गाजत त्यानें तिची मोठी मिरवणूक काढली. मिरवणुकींत श्रीहर्ष व कुमारराज



**श्रीहर्षानें बुद्धाच्या सुवर्णाच्या मूर्तीची हत्तीवरून मिरवणूक काढली. मिरवणुकींत श्रीहर्ष व कुमारराज यांनीं मूर्तीवर चवऱ्या ढाळल्या**

ह्या दोघांनीं त्या मूर्तीवर चवऱ्या ढाळल्या. त्या मिरवणुकींत ह्यु एनत्संग व देशोदेशींचे राजे सामील झालें होतें. शृंगारलेल्या हजारो हत्तींच्या मिरवणुकीचें तें दृश्य खरोखर नयनरम्य होतें. मिरवणूक सभास्थानाकडे आली. मोठ्या भक्तीपूर्वक बुद्धाच्या मूर्तीची स्थापना करण्यांत आली. बुद्धाच्या मूर्तिसाठीं एक

खास सिंहासन तयार करण्यांत आलें होतें. मूर्तीची स्थापना झाल्यावर राजांनीं मूर्तीवर सुवर्णाचीं फुलें उधळलीं. मोत्यांचा वर्षाव केला. अनंत हस्तानें लक्ष्मीनें बुद्धाच्या मूर्तीला स्नान घातलें. तारका लाजल्या. तेथील तें सौंदर्य, गांभीर्य, तेजस्वीता नव्हे साऱ्याच गोष्टी एखाद्याची दृष्टि आरपार भेदून टाकणाऱ्या होत्या. कुबेराचें साहित्य त्या ठिकाणीं लुटून आणल्याचा भास होत होता.

ह्यानंतर सभेस सुरवात झाली. ह्यु एनत्संगनें आपला महायान पंथाचा सिद्धांत मांडला आणि पंडितांना वादासाठीं आव्हान दिलें. एवढेच नव्हे तर त्यानें असें सांगितलें कीं "जो कोणी मला वादांत जिंकेल त्याला मी माझें शीर कापून देईन." त्याच्या ह्या आव्हानानें हीनयान पंथाचे लोक विचारांतच पडले. पहिल्या रात्रीं कोणीहि उत्तर दिलें नाहीं. अशाप्रकारें पांच दिवस गेलें. आपल्याला उत्तर देतां येत नाहीं असें पाहून हीनयान पंथांतील लोकांनीं ह्यु एनत्संगला मारण्याचा घाट घातला. परंतु कर्मधर्म संयोगानें श्रीहर्षाच्या उत्कृष्ट राज्यव्यवस्थेमुळें ही बातमी त्याला कळली. त्याबरोबर त्यानें दुसरे दिवशीं अशी घोषणा केली कीं, "ह्यु एनत्संगच्या केसाला धक्का लागला तर अपराध्याचें शीर तोडण्यांत येईल. एवढेच नव्हे तर त्याला भलभलतें बोलणाऱ्याची जीभ कापून टाकण्यांत येईल."

ही घोषणा केल्यानंतर एकाएकीं सबंध मंडपांत हलकल्लोळ माजला. विलक्षण गडबड उडाली. प्रथमदर्शनी कोणाच्याच कांहीं लक्षांत येईना.

तेवढ्यांत एक मनुष्य एकाएकी श्रीहर्षावर कट्यार उपसून धांवून गेला. कट्यार घेऊन चाल करून येणाऱ्या माणसाला पाहून श्रीहर्ष सावधानतेनें चटकन बाजूला सरकला त्यामुळें वार चुकला. आतां आपण पकडलें जाणार हें पाहून तो मनुष्य सैरावैरा पळत सुटला. शेवटीं त्यास पकडण्यांत आलें. इतर राजे व सरदार इतके चिडलें कीं ते त्या माणसाचा प्राणच घेणार होते. परंतु श्रीहर्षानें त्यांचें निवारण केलें. त्यामुळें 'ज्ञानमगर्व क्षमान्वितं शौर्यम्' ही सर्व थोरांची लक्षणें श्रीहर्षाच्या ठिकाणीं दिसून आलीं.

अशाप्रकारें अठरा दिवस गेलें परंतु ह्यु एनत्संगचें आव्हान कोणी स्वीकारलें नाहीं. त्यानंतर श्रीहर्षानें ह्यु एनत्संगला अजिंक्यपत्र मिळाल्याचें जाहीर केलें. त्याला मिळालेल्या ह्या सन्मानार्थ अनेक राजे लोकांनीं त्याच्यावर अक्षरशः

सोन्यारूप्याचा वर्षाव केला. परंतु निर्लोभी ह्यु एनत्संगानें त्याला बोटहि लावलें नाहीं.

त्यानंतर ह्यु एनत्संगला घेऊन श्रीहर्ष व कुमारराज प्रयागला आले आणि तेथें गंगायमुनांच्या तीरावर त्यांनी प्रचंड दानयज्ञ केला. विद्वान, पाखंडी पंडित, शास्त्री, गोरगरीब या सर्वांस द्रव्य, पोषाख व अलंकार यांच्या अमूप देणग्या दिल्या. हा यज्ञ आटोपल्यावर ह्यु एनत्संग स्वदेशी जाण्यास निघाला. तो नको म्हणत असतांना सुद्धां या दोन राजांनीं त्याच्या बरोबर पुष्कळच साहित्य दिलें. पुढें तो स्वदेशी गेला.

श्रीहर्षानें ज्याप्रमाणें ह्यु एनत्संगचे गुण जाणले त्याचप्रमाणें त्यानें दुसऱ्याहि एका श्रेष्ठ पुरुषाच्या बाबतींत अशीच तत्परता दाखवून त्याच्याकडून एक मोठी कामगिरी करून घेतली.



तो पुरुष म्हणजे बाणभट्ट कवि ! कादंबरी या ग्रंथाचा लेखक. बाणभट्ट म्हणजे महान् प्रज्ञा असलेला, साहित्याच्या क्षेत्रांतील त्या कालांतील मेरुमणी !! लेखणी त्याची दासी झाली होती. शब्द त्याचे सेवक होतें. सरस्वतीचा त्याच्या डोक्यावर वरदहस्त होता. त्यामुळें त्याला अमाप कीर्ति मिळाली होती.

परंतु त्याची ही कीर्ति समकालीन अशा कांहीं राजदरबारांतील कवींना व दुष्ट लोकांना पाहवली नाहीं. बाणभट्टाच्या कीर्तीचें पवाडे त्याच्या कानांना अगोड लागूं लागले. त्याच्या यशध्वजाची पताका फडफडतांना पाहून त्यांच्या अंतःकरणांला मत्सराच्या इंगळ्या डसूं लागल्या.

त्यांनीं श्रीहर्षाला हळुहळू प्रसंगाप्रसंगानें बाणभट्टाबद्दल वाटेल ते सांगितलें.

परंतु यांतील किती भाग खरा व किती खोटा झाला कांहींच प्रमाण नव्हतें" असें जरी असले तरी बाणभट्टाचे शत्रू वाटेल ते बोलण्यास कमी करत नसत" श्रीहर्ष तें ऐकत असें. गुणवान लोकांना अडथळ्यांचे डोंगर आडवे येतात, त्यांच्याबद्दल वाटेल ते सांगण्यांत येते असा जगाचा न्यायतन्त्र आहे !

राजदरबारांत बाणभट्टाच्या विरुद्ध जरी कांहीं लोक होतें तरी कृष्णराज हा असा एक गृहस्थ होता कीं त्याच्या मनांत बाणाबद्दल फार आदर होता. तो बाणांचा नातेवाईक होता. तो चतुर होता. लोकांच्या गुणांची पारख करणारा होता. त्याच्या मनांत बाणभट्ट श्रीहर्षाच्या पदरीं असावा असें होतें. श्रीहर्षाच्या पदरीं बाण म्हणजे समसमा संयोगच होता !

कृष्णराजानें त्या दृष्टीनें प्रयत्न सुरू केले. हळुहळू त्यानें बाणभट्टा विषयीं श्रीहर्षाजवळ चांगलें बोलण्यास सुरुवात केली व त्याच्या विषयीचा दुराग्रह काढून टाकला. "कालप्रयुक्ता खलु कार्यविद्भिर्विज्ञापना भर्तृषु सिद्धिमेति", यथाकालीं स्वामीजवळ विनंति केली असतां ती सिध्दीस जाते हा न्याय कृष्णराजाला चांगला माहीत होता. आणि त्याचा त्यानें बरोबर उपयोग करुन घेतला व श्रीहर्षाकडून बाणभट्टाला दरबारी आणण्याची परवानगी मिळविली. ताबडतोब कृष्णराजानें जासूदाबरोबर प्रीतीकूट गांवीं पत्र पाठवून बाणभट्टाला बोलवणें केलें.

तें उन्हाळ्याचे दिवस होतें. दुपारची वेळ होती. बाणभट्ट भोजन करुन दुपारची विश्रांति घेत स्वस्थ पडला होता.

इतक्यांत बाणाचा चंद्रसेन नांवाचा बंधु त्या ठिकाणीं घाईघाईनें आला व म्हणाला, "कृष्णराजाकडून दूत आला आहे !"

बाणभट्ट चटकन् उठून बसला. त्यानें दूताला आंत पाठवून देण्याविषयीं चंद्रसेनाला सांगितलें. चंद्रसेन बाहेर गेला व तो दूताला घेऊन आला.

दूतानें आंत आल्याबरोबर बाणभट्टाला नमन केलें व एक पत्र त्याला दिलें. त्यांत "मेखलक तोंडीं सर्व सांगेल. आपण कालक्षेप न करतां लवकर निघून यावे" एवढेंच लिहिलें होतें.

त्यावर बाणानें मेखलकास निरोप विचारला. तो म्हणाला, "कृष्णराजांनी असें सांगितलें कीं, "एक गोत्र, एक जात, एकत्र वाढणें, एकत्र सहवास, वारंवार भेटणें, एकमेकावर प्रेम करणें, उपकार करणें, समानशील असणें

इत्यादि गोष्टी स्नेह होण्यास कारणीभूत होतात. परंतु आपल्या दोघामध्यें यापैकीं एकहि गोष्ट घडली नाहीं. तरीहि जवळ असलेल्या बंधुप्रमाणें तुमच्यावर कारणांवाचून मला प्रेम करावेसें वाटतें. दुर्जनांनी तुमच्या लहानपणच्या स्वछंद वर्तनाबद्दल महाराजांच्या मनांत भलतेंच भरवून दिलें व त्यांचें मन कलुषित केलें. परंतु त्यांत कांहीं अर्थ नाहीं. आणि ज्याला शत्रु व मित्र नाहींत असा जगांत कोण आहे ? तेव्हां महाराजांकडे याचा बोल लावतां येणार नाही. आम्हीं या गोष्टीची पक्की चौकशी करुन तुमच्यासाठीं राजाधिराजांजवळ विनंति केली व मनांतील किंतू काढून टाकला.

त्याचप्रमाणें पूर्ववयांत सर्वांकडून कांहींतरी चुका घडतात हें महाराजास मान्य आहे. तरी आतां कालक्षेप न करतां राजदर्शनास लवकर यावें. राजाधिराजांचें दर्शन न घेतां निष्फळ वृक्षाप्रमाणें आपल्या घरीं बंधुजनांत राहून आपण काल व्यर्थ घालवावा हें आम्हांला तरी प्रशस्त वाटत नाहीं. परवशतेबद्दल किंवा राजाधिराजाजवळ गेलो असतां कसें होईल याबद्दल काळजी करूं नयें.

तेव्हां मनुष्य कुलीन व विद्वान असला तरी थोरा मोठ्याच्या सुसमागमानें तो पूज्य होतो हे ध्यानांत घ्यावें ऐवढेंच सागणें. ”

दूतानें आपला निरोप संपविला. त्यांतील कळकळ बाणभट्टाला अतिशय जाणवली. लवकरच त्यानें श्रीहर्षाकडे जाण्याचें ठरविलें.

आज बाणभट्ट श्रीहर्षाकडे जाणार होता. पहांटेच उठून बाणानें प्रातःस्नान व संध्यादिकर्में केल्यावर प्रथम शंकराचें दुग्धाभिषेक पूर्वक पूजन केलें. नंतर होमहवन करून ब्राह्मणांना दानधर्म केला व गाईला प्रदक्षिणा घातली. नंतर त्याची आत्या मालती हिनें त्याचें प्रस्थानमंगल केलें. पुढें बाणानें तिला व इतर गुरुजनांना नमस्कार केला, व शुभाशिर्वाद घेऊन तो निघाला.

बाणभट्ट आपल्या प्रीतिकूट गांवाहून निघाला तो प्रथम चंडिकावन ओलांडून मल्कूट ह्या गांवीं आला. तेथें जगत्पति या बाणाच्या नातेवाईकानें त्याचें चांगलें आदरातिथ्य केलें. दुसऱ्या दिवशीं भागरथी नदी उतरून तो यष्टिग्रह नांवाच्या गांवीं रात्री राहिला व तिसरे दिवशीं तो श्रीहर्षाकडे आला.

मेखलक व बाणभट्ट श्रीहर्षाच्या राहण्याच्या ठिकाणाजवळ आले. मेखलकानें आंत जाऊन राजास वर्दी दिली. राजानें त्याचा मुख्य चोपदार

परियात्र यास बाणभट्टास आंत आणण्यास सांगितलें.

परियात्रानें बाहेर येऊन बाणभट्टास मुजरा केला व तो म्हणाला, " महाराज प्रसन्न आहेत. ते आपली भेट घेण्यास उत्सुक आहेत. तरी दर्शनास चलावें "

तें ऐकून बाणास फारच आनंद झाला. कारण राजा प्रसादोन्मुख होता हा एक शुभशकुनच आहे असें बाणाला वाटलें.

कृष्णराजानें आपल्याकडून राजाच्या मनांतील बाणाबद्दलचा वाईट ग्रह काढून टाकण्याचा अटोकाट प्रयत्न केला होता. तरी बाणभट्ट समोर उभा राहिल्यावर श्रीहर्ष त्याच्या पूर्ववयांतील चुकीच्या गोष्टी लक्षांत घेऊन हा मोठा दुर्वृत्त आहे असें आपल्या जवळ बसलेल्या मालवराजास म्हणाला.

वरील उद्‌गार बाणास चांगलेंच झोंबले. त्याची मोठी चमत्कारिक स्थिति झाली. परंतु शेवटीं भीड न धरतां स्पष्टपणें तो श्रीहर्षाला म्हणाला—

" राजाधिराज ! माझ्या विषयींच्या अज्ञानानें व लोकांनीं आपल्या मनांत चमत्कारीक कांहीं तरी भरवून दिल्यामुळें आपण असें बोलत आहांत. परंतु थोरांनीं यथार्थ असेल तेंच लक्षांत घेतलें पाहिजे. तुमच्या या असल्या भाषणानें मला अतिशय वाईट वाटतें.

वास्तविक मी कोणी दुर्वृत्त नव्हे. सर्वत्र प्रसिध्द व अतिपवित्र अशा वात्स्यायन कुलांत माझा जन्म झाला. पुढें यथाकाली माझे सर्व संस्कार करण्यांत आले. त्याचप्रमाणें उपनयनानंतर मी सांग वेदाध्ययन व शास्त्राध्ययन केलें आहे. इहलोक व परलोक याला घातक असें कोणतेंहि वर्तन माझ्या हातून घडलेलें नाहीं. यांत कोणतीहि गोष्ट मी लपवीत नाहीं. तूं बुद्धासारखा शांत, मनुसारखा वर्णाश्रमांची व्यवस्था करणारा व यमधर्मासारखा शास्ता आहेस. तेव्हां माझ्याविषयींचा आपला ग्रह आपण बदलवा. आतां मी कसा आहे ते सहवासानें राजाधिराज आपणास कळेलच ! "

बाणभट्टानें अशाप्रकारे स्वतःबद्दलची ग्वाही दिल्यावर श्रीहर्षाला बरें वाटलें. व त्यानें त्यांस आपल्या दरबारांत राहण्याविषयीं सांगितलें. आणि तोहि मोठ्या आनंदानें कबुल झाला. श्रीहर्षासारखे गुणवान लोकच गुणी लोकांचे चीज करूं शकतात !

ह्याच बाणभट्टानें पुढें श्रीहर्षाचें चरित्र आपल्या अमोघ शब्दरत्नांनीं फुलवून व सजवून मांडलें.

● ● ●

## १२. उदार दाता

ह्यु एनत्संग स्वदेशी गेल्यानंतर श्रीहर्षानें पुन्हां राज्यकारभारांत आपलें लक्ष घातलें. प्रत्येक गोष्टीची कांटेकोर व्यवस्था ठेवण्याची त्याची धडपड खरोखरच अवर्णनीय होती आणि त्यांतच आपल्या राज्यांतील लोक सुखी व्हावेत ही त्याची मनिषा होती. त्यांच्या साठीं तो प्राणही देण्यास सिध्द होता.

आज त्याच्या राजधानींत गडबड उडाली होती. कसली गडबड बरें ? आज समारंभ होता. भगवान् सहस्त्ररश्मी सूर्यनारायण ज्याप्रमाणें आपली प्रकाशाची संपत्ति सर्व प्राणीमात्रास सारखीच व भेदभाव न ठेवता वाटतो त्याचप्रमाणें श्रीहर्ष आपली अलोट संपत्ति वाटणार होता.

दर पांच वर्षांनी हा समारंभ साजरा होत असें. त्या समारंभात श्रीहर्ष आपल्या सर्व संपत्तीचे दान करीत असें. तो उदार होता. त्याचें दातृत्व परंपरा गत उच्च अशा आर्यसंस्कृतीला शोभेल इतकें श्रेष्ठ होतें. त्याच्या ह्या दान-शूरपणाची नुसती कल्पनाच इतकी विशाल व भव्य होती कीं त्यामुळें मन आश्चर्यानें गुंग होऊन जातें. अशावेळीं अनंत हस्तानें दान करणाऱ्या या राजाकडून दान घेणारा दिङ्मूढ होत असेल हेंच खरें !

त्याचे भांडार कुबेराच्या नऊ पट होतें. असें असले तरी विद्युल्लतेप्रमाणें व पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणें संपत्ति ही चंचल आहे ह्याची त्याला पूर्ण खात्री होती व म्हणूनच अशा या लक्ष्मीचा दानधर्म करणें व यश संपादन करणें हेंच श्रेय आहे असें तो मानीत असें. वित्तस्य पात्रे व्ययः । या वचना-

प्रमाणें त्यानें आपलें सर्व धन दानांत वेचून जें यश संपादन केलें तें खरोखरीच अलौकिक व प्रशंसनीय आहे. बाणानें म्हटलें आहे कीं " हारमौक्तिकांची प्रभा हर्षाच्या अंगावर पडल्यामुळें यावज्जीव सर्वस्व दान करण्याचें त्यानें हें दीक्षावल्कलच धारण केलें आहे काय ? "

आणि खरोखरच त्याचा आजचा समारंभ वरील सर्व गोष्टी सिद्ध करण्यास समर्थ होता. या समारंभास विद्वान पंडित, शास्त्री, विशारद, धर्मपरायण, आस्तिक हें जसे होतें त्याचप्रमाणें सामान्य जन, अविद्वद्जन, नास्तिक हेंही होतें. त्यांत बौद्ध, हिंदु, जैन, सर्व होतें. एवंच सारा समाज त्या ठिकाणीं उपस्थित होता.

श्रीहर्षानें दानास सुरवात केली होती. मेघांतील पाणी सहस्त्रधारांनीं खालीं यावे आणि तें मोकळें व्हावेत त्याप्रमाणें हर्षाचा खजिना रिता होत होता. मेघ कदाचित् थोडे पाणी शिल्लक ठेवीत असतील पण श्रीहर्षाला असें करण्याची जरुरी नव्हती. मेघांनी त्याच्या खजिन्यांत समारंभाच्या शेवटीं दृष्टिक्षेप टाकला असतां तर लाजेनें ते पळून गेलें असतें. एखाद्या भव्य प्रपातानें आपल्या दिमाखाचा शोभेल, श्रेष्ठतेला महत्ता प्राप्त होईल, ऐश्वर्याला तेज येईल अशाप्रकारें धो धो पाणी टाकावें त्याप्रमाणें श्रीहर्षाचे चाललें होतें. त्यांत राखून ठेवण्याची भाषा नव्हती, आशा नव्हती. अपेक्षा आणि इच्छा ह्यांना तेथें शिरकण्यास वाट नव्हती ! !

" सकलभुवन कोशश्चाग्रजन्मनां विभक्त : | म्हणजे त्याचा सर्व खजिना ब्राह्मण व श्रमण इत्यादींना देण्यांतच जात असे " असें जें बाणानें म्हटलें आहे तें अक्षरशः खरें आहे. एवढेंच नव्हे तर बाणभट्ट पुढें म्हणतो आदानंहि विसर्गाय सतां वारिपुत्रामिव ! सज्जनांचा द्रव्यसंग्रह मेघांच्या जलसंचयासारखा परोपकाराकरितांच असतो.

श्रीहर्ष संपत्ति देत होता. त्यांत कोठल्याहि प्रकारचा अहंकार नव्हता. आढ्यता नव्हती, नम्रता होती. संपत्ति संपली. त्यानें वस्त्रें देण्यास सुरवात केली. आपला अलोट खजिना, त्यांतील मूल्यवान वस्त्रें सारी संपलीं. हळूं हळूं याचक कमी झालें. संध्याकाळची वेळ होत आली. जवळ जवळ सर्व समारंभ संपलाच होता. आतां कोणीहि येणार नव्हते—पण—

इतक्यांत—

इतक्यांत एक याचक आला. आतां हर्षाजवळ कांहींही शिल्लक नव्हते. तो काय देणार ?

त्याला विचार पडला ! पण क्षणभरच ! त्याचें लक्ष स्वतःच्या पोषाखाकडे, स्वतः घातलेल्या अलंकारांकडे गेलें.



**आणि त्या याचकाला श्रीहर्षानें आपल्या अंगावरील मूल्यवान अलंकार दिलें.**

आणि एका क्षणांत त्यानें तें अंगावरील सर्व मूल्यवान अलकार त्या याचकाच्या पदरांत टाकलें. त्याला आपल्या अंगावरील अमूल्य वस्त्रें दिलीं.

श्रीहर्ष निष्कांचन झाला. अतिथि देवो भव ही वेद वाणी सार्थ ठरली ! श्रीहर्ष आनंदसागरांत डुबून गेला होता. त्या दानाच्या परमावधीनें त्याच्या अंतःकरणावर आनंदाचे हजारो तरंग उमटत होतें !

उदारस्य तृणं वित्तं । ही म्हण एका हर्षालाच लागू पडते. अक्षरशः वित्त म्हणजे त्यानें तृण मानलें आणि त्याप्रमाणें त्याची खैरात केली. कालिदासानें म्हटल्याप्रमाणें तो त्या दिवशीं संपत्तीचा विनियोग करून शरीरानें मात्र अवशिष्ट राहिला.

कर्णाप्रमाणें उदार असलेल्या ह्या श्रेष्ठ पुरुषाचे वैभव अधिकच वाढलें. भर्तृहरि अशा लोकासंबंधीं म्हणतो कीं उदार पुरुष हे याचकांना सर्वस्व देण्यानें गतवैभव झाले तरी शोभून दिसतात.

तो याचक परत गेल्यावर श्रीहर्ष राजवाड्यांत परत आला. त्याच्या आनंदांत त्याची बहिण राज्यश्री हीहि सामील होती. आपल्या भावानें केलेल्या त्या उदार कृत्याला ती जणूं पाठिंबा देत होती. श्रीहर्षाच्या अकिंचन मुखावर जी प्रभा पसरली होती त्यावरून कोटी मोहरा ओवाळून टाकल्या असत्या तरी त्यांचे तेज फिकेंच पडलें असतें.

रात्रीची वेळ झाली आणि हर्ष राज्यश्रीकडे आला. आपले सर्वस्व देऊन टाकल्यामुळें त्याच्याजवळ वस्त्रसुद्धां शिल्लक राहिलें नव्हतें. त्यानें आपल्या बहिणीजवळ वस्त्राची भिक्षा मागितली. आणि तिनें दिलेल्या पटकुरावर अत्यंत शांतपणें व सुखासमाधानानें तो निद्रिस्त झाला.

• • •

ग्रंथ ठा स्थळप
वि ........
क्रमांक ... ........
नों. दि: ........

# १३. हर्षो हर्षः

श्रीहर्षानें ज्याप्रमाणें बाणभट्टास आश्रय देऊन त्याच्या गुणांचे चिज केलें त्याप्रमाणेंच त्यानें हरदत्त व जयसेन या विद्वानांनाहि आश्रय दिला. श्रीहर्षानें अशा प्रकारे विद्वानांना आश्रय देऊन आपल्या एका गुणाला तेज प्राप्त करून दिलें.

अशा प्रकारे दुसऱ्यांना आश्रय देणारा श्रीहर्ष स्वतः एक नाटककार व कवि होता. तो सिद्धहस्त होता. त्यानें नागानंद, रत्नावली व प्रियदर्शिका अशी तीन नाटकें लिहिलीं. आणि या तीनहि नाटकांचे ओळीनें एक एक दिवस त्याच्या राज्यामध्यें प्रयोग होणार होते. लोकांनीं तीं नाटकें पाहिलीं होती. परंतु तीं पुनः पुनः पहाण्यांतील गोडी कांहीं निराळीच होती. ती प्रत्यक्ष वाचण्यांतहि एक प्रकारचा रसिकपणा प्रकट होत असें.

आज पहिला दिवस होता. नागानंद नाटकाचा प्रयोग होता. श्रीहर्ष नाटकाचा प्रयोग पहाण्यास आला होता. अनेक लोकहि नाटक पहाण्यासाठीं जमलें होतें. नाटकगृह गच्च भरलें होतें. नाटकास सुरुवात झाली—कथानकाची गुंफण होऊं लागली.

विद्याधर जीमुतकेतु यांस जीमूतवाहन नांवाचा मुलगा होता. पुढें वडिलांनीं त्याला गादीवर बसविलें व तें आपल्या पत्नीला घेऊन हिमालयावर गेलें. पण राज्यसुखापेक्षां जीमूतवाहनाला आई वडिलांची सेवा करण्याची आवड असल्यामुळें तो राज्याची जबाबदारी मंत्र्यावर टाकून हिमालयांत गेला.

हिमालयावर राहात असतां एके दिवशीं जीमूतवाहनाच्या दृष्टीस सिद्ध-राजाची मुलगी मलयावती ही पडली. दोघांची दृष्टि एकमेकांकडे गेली व ते परस्परावर मोहित होऊन प्रेम करूं लागले.

या पूर्वीच सिद्धराजानें जीमूतवाहनाला आपली मुलगी देण्यांचे निश्चित केलें होतें. त्याप्रमाणें त्यानें जीमूतवाहनाला त्याबद्दल विचारलें. परंतु आपल्या दृष्टीस पडलेली सुंदर स्त्री ही मलयावती आहे हें जीमूतवाहनाला माहीत नसल्यामुळें त्यानें सिध्दराजाची मागणी धुडकावून लावली.

जीमूतवाहनाचा नकार ऐकतांच मलयावती अतिशय निराश झाली. तिची निराशा मरणाला कवटाळण्यास सिध्द झाली. तिनें स्वतःला गळफांस लावून घेण्याची तयारी केली. ज्याच्यावर आपलें प्रेम बसलें त्यानेंच आपल्यास नाकारल्यावर या जगांत जगण्यासारखें कांहीं शिल्लक आहे असें तिला वाटेना. तिचें प्रेम नुसतें वरवर नव्हतें, तें खरें होतें. कसोटीच्या वेळीं मरणाला भिक घालणारें नव्हतें.

तिच्या या कृत्याचा तिच्या दासीला पत्ता लागला. तिनें एकदम आरडा-ओरड करण्यांस सुरुवात केली. त्याच वेळीं कर्मधर्मसंयोगानें जीमूतवाहन त्या ठिकाणापासून जवळच होता. तो धांवतच त्या ठिकाणीं आला. फांस टांगलेला आहे आणि मलयावती मरणाला सिध्द झालेली आहे हें पाहून त्याच्या काळजाचें पाणी झालें.

त्याला कांहींच कळेना. आपण ज्या तरुणीवर मनापासून प्रेम केलें ती मरणाला कां सिध्द व्हावी ? पण जेव्हां झालेला घोटाळा दोघांच्या ध्यानांत आला तेव्हां त्यांना अतिशय आनंद झाला.

पुढें दोघांचे लग्न झालें. त्यानंतर थोड्याच दिवसांनीं जीमूतवाहनांचें राज्य शत्रूनीं घेतल्याची बातमी आली. परंतु त्याकडे त्यानें लक्ष दिलें नाहीं. त्यानें आई वडिलांच्या सेवेंतच आपला वेळ घालविण्याचें कायम केलें.

मध्यंतरी बराच काळ गेला. पुढें एकदां जीमूतवाहन हिमालय पर्वतावर हिंडत असतां त्याला नागांची हाडे दृष्टीस पडली. तेव्हां त्यास आश्चर्य वाटलें. त्या प्रकारासंबंधी त्यानें चौकशी केली. त्यावेळीं त्यास असें कळलें कीं आपल्या जातीचा नाश होऊं नये ती कायम टिकून राहावी यासाठीं

सर्पांचा राजा वासुकी यानें गरूडाला दररोज एक सर्प बळी म्हणून द्यावयाचा ठरविलें आहे व त्याप्रमाणें तो करीत आहे.

ही गोष्ट जीमूतवाहनांस कळल्यावर त्याच्या अंतःकरणांत सर्पांबद्दल कळ-वळा उत्पन्न झाला. आपण एका तरी नागाचा जीव वाचवावा या हेतुनें त्यानें स्वतःच बळी जाण्याचा निश्चय केला.

त्याप्रमाणें, त्या दिवशीं तो सर्पाच्या ठरलेल्या जागीं जाऊन बसला. त्या दिवशीं शंखचुड नांवाच्या सापाची पाळी होती. जीमूतवाहनाला त्या ठिकाणीं पाहिल्यावर गरूडानें त्याला सर्प समजून अनेक जखमा केल्या.

इतक्यांत शंखचूड त्या ठिकाणीं आला. त्याला पाहिल्याबरोबर गरूडाचें डोळें उघडलें. आपण भलत्याचा जीव घेतला हें पाहून गरूडाला अतिशय पश्चाताप झाला. हें पाप निस्तरण्यासाठीं त्यानें इंद्राची प्रार्थना केली व त्याला जीमूतवाहानावर अमृतवृष्टि करण्यास विनविलें.

इतका प्रकार होईपर्यंत जीमूतवाहनाला पाहात पाहत मलयावती व त्याचे आईबाप ही सर्व मंडळी तेथें आली. आपल्या पतीवरील संकट दूर होण्या-साठीं मलयावतीनेंहि गौरीची प्रार्थना केली. त्या आर्त प्रार्थनेंतील सामर्थ्यानें गौरीनें प्रकट होऊन तिला अभय दिलें.

इतक्यांत स्वर्गातून अमृतवृष्टि झाली. त्याबरोबर सर्व सर्प व जीमूतवाहनहि जीवंत झाला. मलयावतीला व त्याच्या आईवडिलांना अतिशय आनंद झाला. शेवट गोड झाला.

नाटकाचा पडदा पडला ! कथानकानें व पात्रांच्या काम करण्याच्या कौशल्यानें मोहित झालेले लोक श्रीहर्षाची स्तुति करीत हळुहळू आपापल्या घरीं परतले.

दुसरा दिवस उजाडला. रत्नावली नाटक आज होणार होतें.

सिंहलद्विपच्या राजाची रत्नावली नावांची एक कन्या होती. तिच्याशीं ज्याचा विवाह होईल तो सार्वभौम राजा होईल असें ज्योतिषानें भविष्य वर्तविलें होतें.

पुढें कौशाम्बीचा राजा उदयनवत्स यास तिला देण्याचें निश्चित करण्यांत आलें. प्रवासाची तयारी सुरू झाली. तिचा जहाजानें प्रवास होणार होता.

रत्नावलीचा प्रवास सुरू झाला. त्यांत तिचे जहाज एका खडकावर

आपटलें व फुटलें. सर्वत्र हाहाःकार उडाला. रत्नावली समुद्रांत फेंकली गेली. तिला जहाजाच्या एका फळीनें आश्रय दिला. त्याला धरुन ती तरंगत होती. अशा वेळीं कौशाम्बीच्या एका व्यापाऱ्यानें तिला वांचविलें व उदयनाच्याकडे आणलें. परंतु प्रत्यक्ष राजाची भेट झाली नाहीं म्हणून तिला वासवदत्तेच्या ताब्यांत देण्यांत आलें. रत्नावली बरोबर तिच्या देशाचा मंत्रि वसुभूति व उदयनाचा कञ्चुकी हें दोघें होतें. तेहि अपघांतातून कसबसें बचावलें. त्याच-वेळीं उदयानानें कोसल राजावर सैन्य धाडलें होतें. हे दोघेहि त्या सैन्यास जाऊन मिळालें. त्यामुळें त्यांची व रत्नावलीची ताटातूट झाली.

इकडे रत्नावलीची सागरांतून सुटका झाली म्हणून तिला सर्वजण सागरिका या नांवानें संबोधू लागलें.

एके दिवशीं सागरिकेच्या म्हणजे रत्नावलीच्या दृष्टीस उदयन राजा पडला. आपल्या वडिलांनी यासच आपल्याला दिलें आहे हें तिला समजलें. त्यामुळें तिचें राजावर मन गेलें व ती त्याच्यावर प्रेम करूं लागली.

कालांतरानें राजाची व तिची भेट झाली. राजा तिच्या रूपावर अतिशय भाळला. अशाप्रकारें दोघेहि एकमेकांवर प्रेम करूं लागली. ही हकीकत वासवदत्तेला समजली त्याबरोबर रागानें तिनें सागरिकेला कोंडून ठेवलें. एवढेच नव्हे तर सागरिकेला तिच्या बापाकडे पाठवून दिले असें खोटेंच उठविलें.

पुढें एके दिवशीं राजा गारूड्याचा खेळ पाहात होता. त्यावेळीं त्याचा सेनापति तेथें आला. त्यानें कोसल राजाच्या पराभवाची सर्व हकिकत राजास कथन केली. सेनापति बरोबर वसुभूति व कुञ्चुकी हे होतेंच !

त्यांचे लक्ष राजाच्या हाताकडे गेलें. राजाच्या हातांत एक रत्नाचा हार होता. तो हार रत्नावलीचा आहे हें त्यांनीं ओळखलें. रत्नावली येथें आहे हे पाहून त्यांना समाधान झालें.

इतक्यांत राजगृहाला आग लागली असें ओरडत वासवदत्ता त्या ठिकाणीं उपस्थित झाली. " मी सागरिकेला कोठडींत बांदिस्त केलें आहे तेव्हां तिची कशीहि करून सुटका करा. नाहीं तर ती मरण पावेल. " असें तिनें राजाला कळवळून सांगितलें. त्याबरोबर सर्व मंडळी तिकडे धांवत गेली.

परंतु ती आग खरी नव्हती. गारूड्यानें आगीचा भास केला होता. सागरिकेची सुटका झाली व तिला त्या ठिकाणीं आणण्यांत आलें. वसुभूतीनें

ग्रंथ संग्रहालय ... स्थळप्रत
अनुक्रमांक 21807 वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

तिला ताबडतोब ओळखलें. त्याचवेळीं वासवदत्तेला रत्नावली ही आपली मावसबहीण आहे हें समजलें. त्यामुळें द्वेष व मत्सर पार मावळून गेला. शेवटीं वासवदत्तेनें रत्नावलीचें पाणिग्रहण राजाकडून करविलें. शेवट गोड झाला.

आदल्या दिवशींच्या कथानकाशीच साम्य असलेलें प्रियदर्शीका नांवाचें नाटक आज तिसऱ्या दिवशीं अफाट जनसमुदायासमोर सादर केलें जात होतें.

अंगदेशाचा राजा दृढवर्मा याला प्रियदर्शिका या नांवाची एक सुंदर मुलगी होती. कलिंग देशाचा राजा कलिंग यानें तिला मागणी घातली होती. परंतु दृढवर्म्यानें ती मागणी डावलली आणि तीस कौशाम्बीचा राजा वत्स यास देण्याचे ठरविलें.

यामुळें कलिंगराजाला राग आला. त्यानें दृढवर्म्यावर स्वारी केली व त्याला बंदिवान करून नेलें. लढाईच्या धामधुमींत दृढवर्म्याच्या कंचुकीनें प्रियदर्शिकेची सुटका केली व आपल्या राजाचा स्नेही विंध्यकेतु राजा याच्यापाशी तिला आणून ठेवलें.

याच सुमारास वत्सराजानें विंध्यकेतूवर स्वारी करण्यासाठीं आपला सेनापति विजयसेन यास पाठविलें होतें. विजयसेनानें अतिव पराक्रमानें विंध्यकेतूचा पराभव केला व शेवटी त्याचा वधहि केला. त्याच्या हातीं प्रियदर्शिका लागली. ही विंध्यकेतूचीच मुलगी आहे असें समजून त्यानें तिला वत्सराजाकडे आणलें.

वत्सराजानें प्रियदर्शिकेला आपली राणी वासवदत्ता हिच्या ताब्यांत दिलें व तिला नृत्यगायनादि कलांचें शिक्षण देण्यास सांगितलें. यापुढें तिला आरण्यका या नांवानें संबोधण्यांत येऊं लागलें कारण ती आरण्यांत सांपडली होती.

प्रियदर्शिका ही वासवदत्तेची मावसबहीण होती. परंतु तिला विंध्यकेतूची मुलगी ठरविण्यांत आल्यामुळें हें नाते ध्यानांत आलें नाहीं व वासवदत्तेनें तिला आपली दासी म्हणून नेमलें.

पुढें एके दिवशीं आरण्यका ही बागेंत कमळें तोडण्यासाठीं गेली असतां ती वत्सराजाच्या दृष्टीस पडली. तिच्या अलौकिक तिलोत्तमास्वरूप लावण्यावर वत्स खूष झाला. अर्थात आपल्या वडिलांनीं आपणास ह्यासच देऊं केलें होतें असें जेव्हां आरण्यकेला कळलें तेव्हां तिचेहि राजावर प्रेम जडलें.

प्रेमाचा हा सर्व प्रकार राजाचा विदूषक वसंतक, आरण्यकेची सखी मनोरमा व राजघराण्यांतील एक वृद्ध स्त्री सांकृत्यायनी ह्यांना समजली. त्यांनीं ह्या दोघांचा विवाह जुळवून आणण्याचा घाट घातला.

त्यांनी यासाठीं एक नाटक करण्याचें ठरविलें. त्या नाटकांत वत्सराजानें प्रद्योत राजाच्या घरीं कैदेंत असतांना वासवदत्तेला कसें पळविलें हें दाखविलें होतें. हें नाटक वासवदत्तेसमोरच्च होणार होतें.

त्यांत आरण्यकेनें वासवदत्तेचें व मनोरमेनें वत्सराजाचें काम करण्याचें ठरलें. मात्र ऐन लग्नाच्या वेळीं स्वतः वत्सराजानें रंगभूमिवर येऊन भूमिका करावी आणि खेळांतल्या खेळांतच आरण्यकेचा व वत्सराजाचा गांधर्व विवाह करून टाकावा असें त्यांनीं ठरविलें. परंतु ऐनवेळीं सर्व बेत फिसकटला. वासवदत्तेला राजानेंच भूमिका घेतल्याबद्दल संशय आला व तिनें ताबडतोब खेळ बंद करून टाकला. आणि आरण्यकेला बंदित टाकलें.

पुढें वासवदत्तेच्या सांगण्यावरून वत्सराजानें कलिंग राजाचा पराभव केला व आपला सेनापति विजयसेन याला पाठवून दृढवर्म्याचें राज्य त्याला परत मिळवून दिलें. नंतर विजयसेन दृढवर्म्याच्या कञ्चुकीसह परत आला व त्यानें सर्व वृत्तांत राजाला निवेदन केला.

इकडे आपली सुटका होत नाहींसें पाहून आरण्यका जीवाला कंटाळली व तिनें विष प्राशन केलें. हें मनोरमेनें राजाला सांगितलें. राजाला विष उतरविण्याचा मंत्र माहीत होता. त्यानें तो मंत्र टाकतांच आरण्यकेचें विष उतरलें. त्याठिकाणीं दृढवर्म्याचा कंचुकी उभा होता. त्यानें प्रियदर्शिकेला तात्काळ ओळखलें व ही दृढवर्म्याची मुलगी आहे असें सांगितलें. त्यामुळें सर्वांना आनंद झाला.

वासवदत्तेनें अत्यंत प्रेमानें आपल्या मावस बहिणीचा हात राजाच्या हातांत दिला. शेवट गोड झाला.

तीन दिवस चाललेला नाटकांचा उत्सव संपला. करमणुकीनें लोकांची पोटें जणुं भरुन गेली होती. यामुळें ' हर्षो हर्षः ' असें म्हणून जयदेव कवीनें श्रीहर्षास श्रेष्ठ कविरत्नांच्या पंक्तीस बसविलें ते योग्यच झालें असें वाटूं लागते.

● ● ●

मराठी ग्रंथ सं... ठाणे . स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

# १४. काळाचा ओघ

काळाचा ओघ चालूच होता. श्रीहर्षाची तीस वर्षांचीं कारकीर्द अत्यंत शांततेंत गेली. त्यानें आपल्या कारकीर्दींत चीन तिबेट इत्यादि राष्ट्रांशी संबंध सुरु केले. एका ब्राह्मणाच्या हाताखालीं कांहीं मुत्सद्दी देऊन त्यानें चीनच्या बादशहाकडे वकील मंडळ पाठवून स्नेहसंबंध जोडला.

त्याची राज्यव्यवस्था अत्यंत सुंदर होती. तो जरी राजा असला तरी मंत्रिमंडळच त्याच्या राज्याचा गाडा हांकीत असत. सैन्याचें महत्त्व जाणून त्यानें आपलें सैन्य अत्यंत सुसज्ज व सुव्यवस्थित ठेवलें होतें.

श्रीहर्षानें सर्व धर्माबद्दल सारखाच आदर बाळगला. तो स्वतः बौध्द झाला तरी त्यानें इतरांबद्दल अनास्था दाखविली नाहीं.

काळाच्या ओघांत इ. स. ६४७ उजाडलें. अविरत चालणाऱ्या त्या ओघांत श्रीहर्षहि सांपडला. जो जन्माला येतो तो मरण पावतो हें खरें, परंतु रामदासांनीं म्हटल्याप्रमाणें ‘ मरावे परी कीर्तिरूपें उरावे ’ हें ध्यानांत ठेवून फारच थोडे वागतात ! श्रीहर्षानें हें वचन सिध्द केलें व तो काळाच्या ओघांत गडप झाला. भारतीय गौरवाचा शेवटचा किरण लुप्त झाला.

• • •

# आगामी प्रकाशनें

१ बाप्पा रावळ
२ सम्राट् राणा प्रताप
३ सम्राट् चंद्रगुप्त मौर्य
४ सम्राट् अशोक
५ आर्य चाणक्य
६ महान् भारतीय स्त्रिया

आवृत्ति पहिली, एप्रिल १९५७

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ]

चित्रकार—गंगाधर ताटके

ब्लॉक्स्—कलाप्रोसेस स्टुडिओ, ५८२ शनिवार, पुणें २

REFBK-0009482

प्रकाशक
अरविंद दुबळे
केदार प्रकाशन
१९७।३ ब सदाशिव, पुणें २

मुद्रक
चं. श्री. राजगुरु
कचेश्वर मुद्रणालय
टिळक रोड, पुणें २